# दिनांक 10.12.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत.

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे बुधवार दिनांक 10.12.2025 रोजी दुपारी 12.30 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. सदर सभेस मा.आयुक्त तथा प्रशासक, शहर अभियंता, मुख्यलेखापरिक्षक, मुख्यलेखाधिकारी, सहा.नगर रचना अधिकारी, नगरसचिव व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

नगरसचिव यांनी कार्यकारी अभियंता (1) यांचेकडील 2 विषय वेळेवर घेण्याकरीताचे पत्र असल्याचे सांगितले. आयुक्त तथा प्रशासक यांनी सदर विषय वेळेवर कार्यक्रम पत्रिकेवर घेण्यास मंजुरी देण्यात असल्याचे सांगितले.

**विषय क्रमांक 657 -** मागील स्थायी समिती सभा दि.04/12/2025 रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

**ठराव क्रमांक 657 -** मागील स्थायी समिती सभा दि.04/12/2025 रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्तांत वाचून कायम केले.

**विषय क्रमांक 652-** (दि.01.12.2025) मौजा बडनेरा येथील सर्व्हे नं. ३१८ अभिन्यासामधील ओपन स्पेस सार्वजनिक वापराच्या जागेमध्ये मनपा तर्फे बांधण्यात आलेली इमारत जेष्ठ नागरीकांना विरंगुळा सेंटर व्यायाम तथा सामाजीक कार्यासाठी तथा व्यवस्थेकरीता देणे बाबत.

सहा.नगर रचना अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. लेआऊट मंजुर असुन त्याच अभिन्यासातील जेष्ठ नागरीकांना विरंगुळा सेंटर व्यायाम तथा सामाजिक कार्यासाठी तथा व्यवस्थेकरीता मागणी केलेली आहे. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 652 -** मौजा बडनेरा येथील सर्व्हे नं. ३१८ अभिन्यासामधील ओपन स्पेस साईनगर, जुना बडनेरा रोड अमरावती या अभिन्यासा मधील सार्वजनिक वापराच्या जागेमध्ये महानगरपालिके कडुन इमारती चे बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर इमारत अध्यक्ष कृषीसागर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. अमरावती रजि. नं. ए.टी.आय./एच.एस.जी./९१८/८१, इमारत जेष्ठ नागरीकांना विरंगुळा सेंटर व्यायाम तथा सामाजिक कार्यासाठी तथा व्यवस्थेकरीता मागणी केलेली आहे.

१) अभिन्यासा मधील सार्वजनिक वापराच्या जागेवर/घोषीत झोपडपट्टी क्षेत्रात बांधण्यात आलेल्या /मनपा. कडे वर्ग असलेल्या इमारती व्यवस्थे करीता नोंदणीकृत संस्थेस देणे संबंधातील धोरणास सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५१ दि. १६/८/२०१९ अन्वये मंजुर आहे. या मंजुर धोरण प्रमाणे प्रकरणाची छानणी प्रशासना कडुन करण्यात आलेली आहे. सदर प्रकरण मंजुर धोरणा प्रमाणे अनुज्ञेय आहे.

२) सदर अभिन्यासातील भुखंड धारकांच्या हरकती संबंधात जाहीर सुचना दै. जनमाध्यम व अपना महाविदर्भ अमरावती मध्ये दि.१९ ऑग्रस्ट २०२५ ला प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच अर्जदार संस्थेने जाहीर सुचनेचे प्लेक्स प्रस्तावित इमारतीच्या दर्शनिय भागात लावुन प्रसिध्द केलेला आहे. विहित मुदतीस कुठलीही हरकत प्राप्त झालेली नाही.

३) मंजुर धोरणा प्रमाणे करारनामा ०३ वर्षाकरीता करण्याचे प्रस्तावित आहे.

४) सदर विद्यमान इमारतीचे बांधकाम क्षेत्र. २७.८८ चौ.मी. (३००.०० चौ. फुट) आहे. मंजुर धोरणा प्रमाणे सदर इमारतीचे नाममात्र वर्षीक भाडे रु. ६००/- प्रती वर्ष आकारण्यात येत आहे. तसेच अनामत रक्कम रु. १०,०००/- घेण्याचे प्रस्तावित आहे.

५) संबंधीत परिसरा मधील भुखंडधारकांची लेखी संमती पत्र (नोंटरी) सादर केलेली आहे.

सदर प्रकरणी नाममात्र वर्षीक भाडे रु.६००/- प्रती वर्ष व अनामत रक्कम रु. १०,०००/-आकारणी करुन परवानगी देण्याच्या प्रस्तावास स्थायी समितीची मान्यता घेणे संबंधात मा.आयुक्त यांनी दि.१३/११/२०२५ रोजीला मंजुरी दिलेली आहे.

परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक </u>658 – जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत महाराष्ट्र नगरोत्थान अभियानासाठी म.न.पा.ला अनुदाने शिर्षाअंतर्गत अमनपा क्षेत्रातील विकास कामे करणे या कामाचे कंत्राटदार शुभम गिरी यांचेशी करारनामा करण्याचे मंजुरीबाबत.

शहर अभियंता यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – सदर कामाची वर्क ऑर्डर तातडीने देण्यात यावी. विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 658</u> – "जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत महाराष्ट्र नगरोत्थान अभियानासाठी मनपाला अनुदाने शिर्षा अंतर्गत अमनपा क्षेत्रातील विकास कामे करणे या मंजूर कामाची ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेमधील या कामावर सहा निविदा प्राप्त झाल्या असुन या कामाची निविदा दि. ०७.११.२०२५ ला उघडण्यात आली होती. यामध्ये खालील प्रमाणे कंत्राटदार यांनी दर सादर केले आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदेची किंमत | कंत्राटदाराचे नांव | सर्वात कमी दराचे कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मनपा उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा जेवड, गोपाल नगर, येथील शाळेचे बांधकाम करण | 1,00,00,000.00 | 84,59,320.00 | 1. शुभम गिरी - 21.786% कमी<br>2. अमोल खेडकर - 21.100% कमी शुभम गिरी<br>3. जुझर इंफ्राप्रोजेक्टस 21.080% कमी<br>4. जफर शहा हनिफ शहा 16.860% कमी<br>5. संजय पिंपळे - 18.180% कमी<br>6. न्यु बालाजी कंस्ट्रक्शन 12.999% कमी | शुभम गिरी 21.786% कमी |

शुभम गिरी यांना मा. आयुक्त यांनी दि. २७.११.२०२५ रोजी मंजुरी दिल्याप्रमाणे कंत्राटदाराशी कामाचा करारनामा करण्याकरीता सदर विषय स्थायी समितीचे मंजुरीस्तव ठेवण्यात आला आहे परंतु सद्यास्थितीत स्थायी

समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक</u> 659 – अमरावती महानगरपालिकेतील विविध विभागाकरीता अनुभवी तज्ञ व्यक्ती/ संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन Empanelment तयार करणेबाबत.

शहर अभियंता यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 659</u> – अमरावती महानगरपालिकेच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनलवर रॉयल टिपस्टर कन्सल्टिंग प्रा.ली., पुणे यांना दिनांक ०९/१२/२०२२ रोजी पासून ३ वर्षा करिता नियुक्ती देण्यात आली होती. त्यांची मुदत दिनांक ०८/१२/२०२५ रोजी संपुष्टात आलेली आहे. रॉयल टिपस्टर कन्सल्टिंग प्रा.ली., पुणे यांनी त्यांचे पत्र दिनांक १५.१०.२०२५ अन्वये मुदतवाढ करिता अर्ज केलेला आहे.
प्राप्त विनंती अर्ज नुसार मा. आयुक्त यांनी दिनांक ०१.१२.२०२५ ला ३ वर्षा करिता मुदतवाढ प्रदान केली आहे.
विभागातील कामांची वर्गवारी करण्याकरीता तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना अदा करावयाचे मुल्य मा. आयुक्त यांनी खालीलप्रमाणे तक्त्यामध्ये नमुद केल्यानुसार निश्चित करण्यात आलेले आहे.

दिनांक ११.०७.२०२२ रोजी स्थायी समितीचा ठराव क्र ४५ अन्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना देण्यात येणाऱ्या निविदा रक्कमेच्या (Schedule-B) खर्चाच्या 1.50 टक्के शुल्काचे विवरण व देयक वेळापत्रक खालीलप्रमाणे

| अ.क्र. | विवरण | कालावधी | सल्लागार याना दयावयाचे शुल्क % |
|---|---|---|---|
| 01. | महानगरपालिकेतील विभागांनी सांगितलेल्या कामानुसार स्थळ पाहणी करणे, कामाचे Drawings/Sections तय्रार करुन त्याला प्रथम विभागप्रमुखाची मान्यता घेणे, कामाचे मंजूर झालेल्या Drawings/Sections नुसारच अंदाजपत्रक तयार करणे | कमाल 07 दिवस | 05% |
| 02. | अंदाजपत्रक संबंधित यंत्रणेकडुन मंजूर करुन घेणे, मंजूर अंदाजपत्रकाच्यों कामांचे निविदा दस्ताऐवज तयार करुन, निविदा प्रक्रिया राबविणे व निविदा अंतिम करुन देणे | कमाल 15 दिवस (निविदा प्रक्रीयेचे दिवस वगळुन) | 05% |
| 03. | कामाचा कार्यारंभ आदेश कंत्राटदारास दिल्यानंतर कामाचे स्थळावर किमान तीन वेळा प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करणे व कामाच्या गुणवत्ते बाबत अहवाल कंत्राटदराच्या देयका सोबत जोडणे, कामाचे देयके तयार करण्यास अभियंतास मदत करणे. कामाच्या अंतिम देयकाच्या वेळी देय रक्कम देण्यात येईल. | कार्यारंभआदेशाच्या कालावधी नुसार | 80% प्रत्येक R.A. बिलानुसार एकुण रक्कमेच्या प्रमाणात देय राहतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| 04. | संबंधित अभियंता कडुन काम पूर्ण झाल्याचे व काम समाधानकारक झाले असल्याचा दाखला मिळविल्यानंतर | काम पूर्ण झाल्याचा दाखला मिळाल्यानंतर | 10% |

कामाचे अंदाजपत्रक करण्यास दयावयाचे त्याचा पुर्ण अधिकार मा. आयुक्त यांचे राखीव राहील.

वरीलप्रमाणे कामाचे स्वरुप व सेवा शुल्क राहणार आहे. मा. आयुक्त यांनी दिनांक 01.12.2025 रोजी रॉयल टिपस्टर कन्सल्टिंग प्रा. ली., पुणे यांना ३ वर्षा करिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर विषय स्थायी समितीचे मंजुरीस्तव ठेवण्यात आला आहे परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**<u>विषय क्रमांक</u> 660-** दैनंदीन साफसफाई कंत्राटदार यांचे प्रलंबित देयकास मान्यता मिळण्याबाबत.
(प्रभाग क्र.01 व प्रभाग क्र.19 मधील प्रलंबित देयक )

वै.आरोग्य अधिकारी (स्वच्छता) यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – सदर प्रभागाचे देयके देण्यास विलंब का करण्यात आलेला आहे. वै.आरोग्य अधिकारी (स्वच्छता) – कंत्राटदाराने देयके विषयी माहिती देण्यास विलंब केलेला आहे. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 660</u>** – उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, मनपा लेखासंहीता 2011 चे नियम 168, मनपा लेखासंहीता 1971 चे नियम 44 (1) (3), नियम 45 अन्वये मा. आयुक्त महोदय यांनी दि. 02/12/2025 रोजी प्रभाग क्रमांक 01 व प्रभाग क्रमांक 19 येथील जुने कंत्राटदाराचे त्यांनी विलंबाने सादर केलेल्या देयकास मा. स्थायी समितीमध्ये ठेवण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

त्याअनुषंगाने प्रभाग क्रमांक 01 व प्रभाग क्रमांक 19 दैनंदिन साफ सफाई कंत्राटदारांचे देयक मान्यतेकरीता मा. स्थायी समिती सभेमध्ये मान्यतेकरीता ठेवण्यात येत आहे. तरी कृपया खालील प्रलंबित असलेल्या देयकास मान्यता प्रदान करावी हि विनंती.

| अ.क्र. | दैनंदिन साफ सफाई कंत्राटदार | माहे | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्रमांक ०१<br>श्री. साई सुशिक्षीत बेरो. नागरीक सेवा सहकारी संस्था | में 2023 | 7,85,000/- |
| 2 | | जुन 2023 | 7,85,000/- |
| 3 | | जुलै 2023 | 7,85,000/- |
| 4 | | ऑगस्ट 2023 | 7,85,000/- |
| | एकुण | | 31,40,000/- |
| 1 | प्रभाग क्रमांक १९ | में 2023 | 8,74,029/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | श्री. साई सुशिक्षीत बेरो. नागरीक सेवा सहकारी संस्था | जुन 2023 | 8,74,029/- |
| 3 | | जुलै 2023 | 8,74,029/- |
| 4 | | ऑगस्ट 2023 | 8,74,029/- |
| 5 | | सप्टेंबर 2023 | 8,74,029/- |
| 6 | | ऑक्टोंबर2023 | 8,74,029/- |
| 7 | | नोव्हेंबर 2023 | 8,74,029/- |
| 8 | | डिसेंबर 2023 | 8,74,029/- |
| 9 | | जानेवारी 2024 | 8,74,029/- |
| | एकुण | | 78,66,261/- |
| | प्रभाग क्रमांक ०१ व १९ एकुण रक्कम रूपये | | 1,10,06,261/- |

सदर विषय स्थायी समितीचे मंजुरीस्तव ठेवण्यात आला आहे परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**विषय क्रमांक 661** – "जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 अंतर्गत - नागरी दलीतेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा कार्यक्रम" शिर्षा अंतर्गत प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदांच्या कामांमध्ये प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दर असलेल्या निविदाधारक (कंत्राटदार) यांचेशी करारनामा करण्याचे मंजूरी बाबत.

शहर अभियंता यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – सदर कामाची वर्क ऑर्डर आजचे आज देण्यात यावी. विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 661** – "जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 अंतर्गत - नागरी दलीतेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा कार्यक्रम शिर्षा कामांच्या ई-निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदाची कामे व त्यामधील सर्वात कमी दराचे निविदाधारक (कंत्राटदार) याची यादी खालील प्रमाणे,

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची किंमत | कंत्राटदाराचे नांव | सर्वात कमी दराचे कंत्राटदार |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | प्रभाग क्र. 1 आशियाड कॉलनी ते हनुमान मंदिर पर्यंत रस्त्याचे कॉक्रीट रोडचे बांधकाम करणे | 40,67,512 | 1. नितीन अग्रवाल - 0.00 टक्के दराने<br>2. बिडोलीवाला कंस्ट्रक्शन कंपनी - 1.111 टक्के जास्त दराने | पूजा कंस्ट्रक्शन - 1.680 टक्के कमी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 3. पूजा कंस्ट्रक्शन - 1.680 टक्के कमी | |
| 2. | प्र क्र.7 जवाहर रोड अंतर्गत आदिवासी नगर महफिल हॉटेल मागे कॉंक्रिटीकरण रस्त्याचे बांधकम करणे | 25,05,988 | 1. संजय नागोराव पिंपळे - 1.010 टक्के कमी<br>2. प्रवीण पंडितराव शेलुकर- 0.550 टक्के कमी<br>3. राजेश शशिधर त्रिपाठी - 0.300 टक्के कमी | संजय नागोराव पिंपळे - 1.010 टक्के कमी |
| 3. | प्रभाग क्र.12 रुख्मीनी नगर अंतर्गत वर्धसा आप्पा दुकान ते नाल्या पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस पेव्हिंग ब्लॉक लावणे. | 52,65,659 | 1. संदीप मोहोड - 5.000 टक्के जास्त<br>2. अजय प्रकाशराव मोहोड - 5.500 टक्के जास्त<br>3. ज्योती इंजिनीरिंग एंड कंस्ट्रक्शन - 0.800 टक्के कमी | ज्योती इंजिनीरिंग एंड कंस्ट्रक्शन - 0.800 टक्के कमी |
| 4. | प्रभाग क्र. १३ अंबापेठ मधील पन्नालाल नगर येथिल प्रभात कॉलोनी कडे जाणारा मुख्य कॉक्रीट रस्ता व नालीचे बाधकाम करणे व पेविंग ब्लॉक बसविणे | 31,39,675 | 1. नितीन अग्रवाल - 1.340 टक्के कमी<br>2. मदनलाल एम मोंगा - 1.250 टक्के जास्त<br>3. बिडोलीवाला कंस्ट्रक्शन कंपनी- 1.111 टक्के जास्त | नितीन अग्रवाल - 1.340 टक्के कमी |
| 5. | प्रभाग क्र.13 अंबा पेठ अंतर्गत भुतेश्वेर चौक ते हिंदू स्मशान भुमी पर्यंत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे | 33,05,274 | 1. अंश कंस्ट्रक्शन - 4.990 टक्के जास्त<br>2. अजय कुमार रमेशकुमार हेडा - 0.110 टक्के कमी<br>3. मनीष देशमुख - 2.270 टक्के जास्त | अजय कुमार रमेशकुमार हेडा - 0.110 टक्के कमी |
| 6. | प्रभाग क्र. 6 मसानगंज अंतर्गत मुख्य रस्त्याचे रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | 28,82,194 | 1.वीर हनुमानजी कंस्ट्रक्शन - 0.599 टक्के कमी<br>2. न्यू बालाजी कंस्ट्रक्शन - 6.000 टक्के जास्त | वीर हनुमानजी कंस्ट्रक्शन - 0.599 टक्के कमी |

स्तंभ 5 मधील निविदाधारक (कंत्राटदार) यांनी सादर केलेल्या दरांस मा. आयुक्त यांनी दि. 08.12.2025 रोजी मंजुरी दिल्याप्रमाणे कंत्राटदाराशी कामाचा करारनामा करण्याकरीता सदर विषय स्थायी समितीचे मंजुरीस्तव ठेवण्यात

आला आहे परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक 662</u> – "जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 अंतर्गत - महाराष्ट्र नगरोत्थान अभियाना साठी मनपाना अनुदाने" शिर्षा अंतर्गत प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदांच्या कामांमध्ये प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दर असलेल्या निविदाधारक (कंत्राटदार) यांचेशी करारनामा करण्याचे मंजूरी बाबत.

शहर अभियंता यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – सदर कामाची वर्क ऑर्डर आजचे आज देण्यात यावी. विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 662</u> – "जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 अंतर्गत - महाराष्ट्र नगरोत्थान अभियाना साठी मनपाना अनुदाने शिर्षा अंतर्गत कामांच्या ई-निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदाची कामे व त्यामधील सर्वात कमी दराचे निविदाधारक (कंत्राटदार) याची यादी खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची किंमत | कंत्राटदाराचे नांव | सर्वात कमी दराचे कंत्राटदार |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | प्रभाग क्र.१ अनगड नगर अंतर्गत मनपा च्या ओपन स्पेस ला चेनलिंग फेंसिंग करणे | 42,24,832 | 1.संजय नागोराव पिंपळे – 0.200 टक्के कमी<br>2. निलेश चौरसिया - 5.000 टक्के जास्त<br>3. वीर हनुमानजी कन्स्ट्रक्शन कं - 3.599 टक्के जास्त<br>4. न्यू बालाजी कन्स्ट्रक्शन - 1.100 टक्के कमी | न्यू बालाजी कन्स्ट्रक्शन - 1.100 टक्के कमी |
| 2. | प्रभाग क्र. 3 हीबा कॉलनी येथील काझी साहेब यांचा घरा समोरील मनपच्या ओपन स्पेस मध्ये चेनलिंग फेंसिंग करणे. | 27,18,705 | 1. मे. आशा कंस्ट्रक्शन – 6.600 टक्के जास्त<br>2. असरार अहमद शेख मेहमुद - 0.500 टक्के कमी<br>3. अजय थुल - 5.500 टक्के जास्त<br>4. मो. ईषाद अब्दुल सत्तार - 3.330 टक्के कमी | मो. ईषाद अब्दुल सत्तार - 3.330 टक्के कमी |
| 3. | प्रभाग क्र.6 सहकार नगर मधील मैदानच्या संभोवताल पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | 28,21,190 | 1.वीर हनुमानजी कंस्ट्रक्शन कं. – 4.599 टक्के जास्त<br>2. राजीव क्रिष्णराव ठवरे - 0.425 टक्के कमी | राजीव क्रिष्णराव ठवरे - 0.425 टक्के कमी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 3. अंश कंस्ट्रक्शन - 3.300 टक्के जास्त | |
| 4. | प्रभाग क्र. 13 अंबापेठ मधील महाकाली मंदिर जवळ पुलाचे बांधकाम करणे. | 69,49,679 | 1. मे. आशा कंस्ट्रक्शन – 2.000 टक्के जास्त<br>2. नितीन अग्रवाल - 1.000 टक्के जास्त<br>3. मदनलाल एम मोंगा - 1.000 टक्के कमी | मदनलाल एम मोंगा - 1.000 टक्के कमी |
| 5. | अमरावती मतदार संघातील रस्ते दुभाजकावर झाडे लावून सौंदर्यीकरण करण्याबाबत | 35,00,693 | 1. मे. आशा कंस्ट्रक्शन – 6.600 टक्के जास्त<br>2. असरार अहमद शेख मेहमुद - 0.500 टक्के कमी<br>3. अजय थुल - 5.500 टक्के जास्त | असरार अहमद शेख मेहमुद - 0.500 टक्के कमी |
| 6. | मनपा मराठी शाळा शेगाव येथील कंपाऊंड वॉल व वर्ग खोल्याचे बांधकाम करणे. | 33,05,647 | 1. संजय नागोराव पिंपळे – 0.440 टक्के कमी<br>2. नरेंद्र सहदेवराव मांडवगडे - 1.010 टक्के कमी<br>3. स्वराज ठाकरे - 0.150 टक्के कमी | नरेंद्र सहदेवराव मांडवगडे - 1.010 टक्के कमी |
| 7. | मनपा शाळा नूर नगर येथील वर्ग खोल्याचे बांधकाम करणे. | 33,05,633 | 1. संजय नागोराव पिंपळे – 0.200 टक्के कमी<br>2. मे. जी. एच. खंडेलवाल - 1.000 टक्के कमी | मे. जी. एच. खंडेलवाल - 1.000 टक्के कमी |
| 8. | मनपा शाळा वडाळी येथील कंपाऊंड वॉल व वर्ग खोल्याचे बांधकाम करणे. | 33,05,647 | 1. जुझर इंफ्राप्रोजेक्ट – 0.010 टक्के कमी<br>2. संदीप मोहोड - 5.000 टक्के जास्त<br>3. अब्दुल मोईल अब्दुल गफ्फुर - 4.900 टक्के जास्त | जुझर इंफ्राप्रोजेक्ट – 0.010 टक्के कमी |
| 9. | मनपा उच्च प्राथमिक मराठी शाळा बुधवारा येथील वर्ग खोल्याचे बांधकाम करणे. | 33,05,633 | 1. अंश कंस्ट्रक्शन – 0.990 टक्के जास्त<br>2. एस. एम. खंडेलवाल - 1.080 टक्के कमी<br>3. शैलेष सुरेशचंद्र साहू - 3.000 टक्के जास्त | एस. एम. खंडेलवाल - 1.080 टक्के कमी |
| 10 | मनपा हिंदी शाळा क्रमांक 7 विलास नगर येथील वर्ग खोल्याचे बांधकाम करणे. | 33,05,633 | 1. साई ट्रेडर्स – 0.500 टक्के कमी<br>2. एस. आर. इंटरप्राजेस - 1.500 टक्के जास्त | साई ट्रेडर्स – 0.500 टक्के कमी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 3. एच. हिरालाल - 2.390 टक्के जास्त | |
| 11 | प्रभाग क्र १ विद्या वैभव कॉलनी अंतर्गत श्री तुळजा भवानी मंदिरास सभागृहाचे व मंदिराच्या खुल्या जागेस कंपाऊंड करणे | 37,52,890 | 1. वीर हनुमानजी कंस्ट्रक्शन कं. – 4.599 टक्के जास्त<br>2. राजीव क्रिष्णराव ठवरे - 0.425 टक्के कमी<br>3. अंश कंस्ट्रक्शन - 3.300 टक्के जास्त | राजीव क्रिष्णराव ठवरे - 0.425 टक्के कमी |
| 12 | प्रभाग क्र. ८ मधील व्यैक्यापुरा (शिकस्त सार्वजनिक संडास च्या जागेवर) वाचनालय/अभ्यासिक करिता इमारत बांधणे. | 53,59,434 | 1. संजय नागोराव पिंपळे – 0.220 टक्के कमी<br>2. मे. आशा कंस्ट्रक्शन - 6.600 टक्के जास्त<br>3. प्रदिप मालविय - 1.220 टक्के कमी | प्रदिप मालविय - 1.220 टक्के कमी |
| 13 | प्र.क्र. 10 येथील दस्तुर नगर चौक ते छत्री तलाव पर्यंत डिवायडरमध्ये योगाचे स्टॅचु उभारुन सौदर्याकरण करणे. | 26,89,311 | १.संजय नागोराव पिंपळे -1.150 टक्के कमी<br>२.आशा कन्स्ट्रक्शन - 6.360 टक्के जास्त<br>३.अमोल खेडकर - 3.300 टक्के जास्त | संजय नागोराव पिंपळे - 1.150 टक्के कमी |
| 14 | प्र.क्र.20 येथील एम.आय.डी.सी चौक ते दस्तुर नगर चौक पर्यंत डिवायडरमध्ये विविध पक्षांचे व प्राण्यांचे स्टॅचु उभारुन सौदर्याकरण करणे | 26,92,753 | १.एच हिरालाल = -0.900 टक्के कमी<br>२.साई ट्रेडर्स = 1.500 टक्के जास्त<br>३.एस.आर. एंटरप्रायझेस - 1.000 टक्के जास्त | एच हिरालाल - 0.900 टक्के कमी |
| 15 | प्र क्र 21 येथील पांचबंगला नाल्याला संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे. | 84,68,929 | १.जुझार इन्फ्राप्रोजेक्ट्स - 5.060 टक्के जास्त<br>२.संदीप मोहोड - 1.500 टक्के कमी<br>३.प्रदीप मालवीय - 2.000 टक्के जास्त | संदीप मोहोड - 1.500 टक्के कमी |
| 16 | प्र.क्र.09 येथील दस्तुर नगर छत्री तलाब चौक येथे सौदर्गीकरण करणे | 39,40,220 | १.नितीन आर अग्रवाल - 1.000 टक्के जास्त<br>२.बिडोलीवाला कन्स्ट्रक्शन कंपनी - 1.110 टक्के कमी<br>३.पूजा कन्स्ट्रक्शन - 2.000 टक्के जास्त | बिडोलीवाला कन्स्ट्रक्शन कंपनी -1.110 टक्के कमी |

स्तंभ 5 मधील निविदाधारक (कंत्राटदार) यांनी सादर केलेल्या दरांस मा. आयुक्त यांनी दि. 08.12.2025 रोजी मंजुरी दिल्याप्रमाणे कंत्राटदाराशी कामाचा करारनामा करण्याकरीता सदर विषय स्थायी समितीचे मंजुरीस्तव ठेवण्यात आला आहे परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

-स्वा-
(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक,
महानगरपालिका अमरावती

दिनांक 04.12.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत.

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे गुरुवार दिनांक 04.12.2025 रोजी दुपारी 12.00 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. सदर सभेस मा.आयुक्त तथा प्रशासक, मा.अति.आयुक्त (1), उपायुक्त (3), मुख्यलेखापरिक्षक, सहा.नगर रचना अधिकारी, पशुशल्य चिकित्सक वैद्यकिय अधिकारी, नगरसचिव व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

नगरसचिव यांनी वै.आरोग्य अधिकारी यांचेकडील 1 विषय वेळेवर घेण्याकरीताचे पत्र असल्याचे सांगितले. आयुक्त तथा प्रशासक यांनी सदर विषय वेळेवर कार्यक्रम पत्रिकेवर घेण्यास मंजुरी देण्यात असल्याचे सांगितले.

**विषय क्रमांक 651** - मागील सभा दि. २७/११/२०२५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत वाचुन कायम करणे.

**ठराव क्रमांक 651** - मागील सभा दि. २७/११/२०२५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत वाचुन कायम केले.

**विषय क्रमांक 652-** (दि.01.12.2025) मौजा बडनेरा येथील सर्व्हे नं. ३१८ अभिन्यासामधील ओपन स्पेस सार्वजनिक वापराच्या जागेमध्ये मनपा तर्फे बांधण्यात आलेली इमारत जेष्ठ नागरीकांना विरंगुळा सेंटर व्यायाम तथा सामाजीक कार्यासाठी तथा व्यवस्थेकरीता देणे बाबत.

सहा.नगर रचना अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – सभागृहाचे बांधकाम कोणत्या वर्षी झालेले आहे व याअगोदर सदर इमारत कोणत्या संस्थेला दिलेली होती काय. सहा.नगर रचना अधिकारी – सन 2018-19 ला बांधकाम झालेले आहे. सदर इमारत अद्यापपावेतो कोणत्याही संस्थेला देण्यात आलेली नाही. आयुक्त तथा प्रशासक – या इमारतीमध्ये संस्थे कशाकरीता उपयोग घेणार आहे. जेष्ठ नागरीकांकरीता कशाप्रकारे सुविधा देणार आहे. इमारत भाडे कोणत्या नियमाअंतर्गत निश्चित करण्यात आलेले आहे. पेपरमध्ये जाहीरात दिलेली आहे तर त्यावर हरकत आलेली आहे काय. सहा.नगर रचना अधिकारी – सदर संस्था त्याच कॉलनीतील असुन यावर हरकती प्राप्त झालेल्या नाही. सदर इमारत 3 वर्षाकरीता 600 रु.प्रतिमहा प्रमाणे देण्यात येणार आहे. आयुक्त तथा प्रशासक – ही संस्था कशापध्दतीने या इमारतीचा वापर करणार आहे. याठिकाणी कार्यक्रम करणार आहे काय. किती लक्ष रु.गुंतवणार आहे याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. तोपर्यंत विषय स्थगीत ठेवण्यात येत आहे.

**विषय क्रमांक 653-** (दि.01.12.2025) मौजा अकोली साहे क्र. १०/२, भुखंड क्र. ५७ मधील खाजगी जागा १८.०० मी. रुंदीच्या रस्त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियम कलम ७८ अंतर्गत संपादित करणे बाबत.

सहा.नगर रचना अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. कलम 127 अंतर्गत नोटीस दिलेली होती. न्यायालयाचे निकालानुसार आरक्षण व्यपगत करण्यात आले होते. आपण सदर नोटीस खारीज केलेली आहे. आयुक्त तथा प्रशासक – ही जागा प्रायव्हेट लॅन्ड आहे काय. सदर विषयास मान्यता दिल्यानंतर कारवाई काय करणार आहात. सहा.नगर रचना अधिकारी – डि.पी.रोड असल्यामुळे भुसंपादन करण्याकरीता मागणी करणार आहे. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 653-** अमरावती शहराची सुधारीत विकास योजने मध्ये मौजा अकोली सव्व्हे क्र. १०/२, या मंजुर अभिन्यासा मधील भुखंड क्र. ५६व ५७ मधुन १८.०० मी. रुंद वि.यो. रस्ता प्रस्तावित होते. उक्त वि.यो. १८.०० मी.

रुंदीच्या रस्त्याने बांधीत झालेल्या उपराक्त भुखंडा म.प्रा.नि.व न.र.१९६६चे कलम १२७ अंतर्गत सुचना दि.७/१०/२०१३ रोजीला महानगरपालिकेस दिलेली होती. तद्नंतर मा. उच्च न्यायालया मध्ये W.P.N०.८०३१/२०१८ केलेला होता. W.PN०.८०३१/२०१८ मध्ये दि.१५/०९/२०२२ रोजीला मा.उच्च न्यायालयाने उक्त विकास योजना रस्त्याचे आरक्षण व्यपगत्त झाल्याचा निर्णय दिला आहे. दि. १५/०९/२०२२ रोजीचे न्यायालयीन निर्णया विरोधात मा. सर्वोच न्यायालयामध्ये S.LP. (C)N०.००३८३१/२०२३ अन्वये महानगरपालिकेकडून अपील दाखल करण्यात आली तसेच महानगरपालिके कडुन म.प्रा.नि.व.न.र.अधि. १९६६ चे कलम १२६ अंतर्गत सदर्हु जागेचा भुसंपादन प्रस्ताव पत्र क्र.२०३६ दि. १४/०२/२०२३ जिल्हा प्रशासना कडे सादर केलेला होता.

सदर अपील SL.P. (c) N०.००३८३१/२०२३ मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२०/०२/२०२३ रोजी बारीज केली आहे. उक्त न्यायालयीन निर्णया नुसार शासन स्तरावरुन म.प्रा.नि.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२७(२) अंतर्गत उक्त जागेवरील १८.०० मी. रुंद रस्त्याचे (भागश:) आरक्षण व्यपगत झाले बाबत आदेश शासन निर्णय क. टिपीएस-३०२२/१०४३/प्र.क्र.६२/२०२३/नवि-३० दि. १९/१२/२०२३ अन्वये निर्गमीत केलेले आहे.

विकास योजना अहवाला नुसार भुखंड क्र.५७ हा १८.०० मी. रुंदीच्या रस्त्याने बाधीत होते. सदर परिसरातील भुखंड क्र.५६ व ५७ मधील १८.०० मी. रुंद रस्त्याचे भागशः आरक्षण व्यपगत झाले असलेतरी लगतच्या जागेवर १८०० मी. रुंदीच्या रस्त्याचे आरक्षण कायम आहे. १८.०० मी. रस्त्याची सलंग्नता राखण्या करीता उक्त भुखंड क्र.५७ मधील जागा १८.०० मी. रुंदीच्या रस्त्याकरीता आवश्यक असल्याने, त्या अनुषंगाने मनपा पॅनल ॲड, श्री कासट यांचे मत मागणी केले असता, त्यांनी दि. ३/८/२०२५ रोजीचे पत्रा नुसार the planning authority/AMC has every authority and power to acqure the land required for the 18 Mtr development plan road out of Plot No.56 and 57 Survey No. १०/२ of Mouze Akoli under the new Land Acquisition Act, २०१३ and such action by the AMC shall not amount to Contempt of the judgement Writ Petition No. ८०३१/२०१८, however such proposal for acquisition shall be under Chapter Vill of the MMC, Act and not under the MRTP, Act. १९६६, असे मत दिले आहे. कायदेशिर मता नुसार जागेची आवश्यकता असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७८ अंतर्गत भुसंपादनाची कार्यवाही महानगरपालिकेस करता येते. त्या मुळे उक्त न्यायालयीन निर्णयाचे अवमात होत नाही, असे ॲड. श्री. कासट यांचे मत प्राप्त आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७८ अंतर्गत भुसंपादन प्रस्तावा द्वारे जागा संपादीत करणे करीता स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. स्थायी समितीच्या मान्यता नंतर भुसपादन प्रस्ताव जिल्हा प्रशासना कडे सादर करण्यात येईल.

मौजा अकोली सर्व्हे क्र.१०/२, भुखंड क.५७ मधील खाजगी जागा १८.०० मी. रुंदीच्या रस्त्याकरीता भुसंपादन प्रस्तावाद्वारे संपादीत करणेचे प्रस्तावास स्थायी समितीची मंजुरी घेणे बाबत मा.आयुक्त यांनी दि. २७/११/२०२५ रोजीला मान्यता दिलेली आहे.

परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**विषय क्रमांक 654** –(दि.03.12.2025) पशुवैद्यकिय विभागाअंतर्गत ई-निविदा क्र.-2025 C-1217594-1 मनुष्य व कुत्रा संघर्ष कमी करणे संदर्भामध्ये हिंसक, रेबीजग्रस्त, पिसाळलेले श्वानांना बंदिस्त करणे संदर्भामध्ये निविदा मंजुर करुन करारनामा करणेकरीता मान्यतेबाबत.

संदर्भः- मा. आयुक्त यांचे दि. १/१२/२०२५ रोजी चे मंजुरीस अनुसरुन.

नगरसचिवांनी पशुवैद्यकिय अधिकारी यांचेकडुन सादर करण्यात आलेली टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 654** – उपरोक्त विषयास अनुसरुन मा. सर्वोच्च न्यायालय यांचे भटक्या व रेबीजग्रस्त श्वान याचे बाबत प्राप्त निर्देशानुसार, मनपा क्षेत्रातील कुत्रा व मनुष्य संघर्ष कमी करणे तसेच, लहान मुले, नागरीक यांचे वर श्वानांमार्फत होणारे हिंसक हल्ले व गंभीर आजार यांपासुन संरक्षण होणे जिवीतहानी होणार नाही याकरीतासदर कामाबाबत Minimum Wages Act उपायुक्त कामगार कार्यालय याचे मार्फत तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय अमरावती यांचे द्वारे वाहनाचे दर प्राप्त करुन निवीदा करण्यात आली.

कोंडवाडा विभागाअंतर्गत मोकाट व हिंसक तसेच रेबीजग्रस्त श्वान पकडणे Tender ID-२०२५ AMC-१२१७५९४-१ २ वाहन टाटा-एस व १० मजुर पुरवीण्याबाबत ई-निवीदा लावण्यात आली होती. सदर ई-निवीदे मध्ये १. ॲनिमल शेल्टर बहुउद्देशिय संस्था अमरावती २. नवयुवक नागरीकसेवा सहकारी संस्था अमरावती ३. जिवन रक्षा बहुउद्देशिय संस्था अमरावती या तिन संस्थेने सहभाग घेतला होता. छाननी समितीने तिन ही संस्थेची तात्रिक तपासणी केली असता १. ॲनिमल शेल्टर बहुउद्देशिय संस्था अमरावती, २. नवयुवक नागरी सेवा सहकारी संस्था अमरावती हे पात्र झाल्या असुन सदर संस्थेचा आर्थिक लिफाफा उघडण्यात आला. १. ॲनिमल शेल्टर बहुउद्देशिय संस्था अमरावती या संस्थेने रु ४१,००,५००/- काम करण्याबाबत दर दिले आहेत. तसेच नवयुवक नागरीक सेवा सहकारी संस्थेचे रु. ४३,४०,०००/- इतके दर दिले असुन, कमी दर ॲनिमल शेल्टर बहुउद्देशिय संस्थेचे असल्यामुळे सदर संस्था पात्र करण्यात आली, परंतु मा. अतिरीक्त आयुक्त -२ यांनी सदर संस्थेसोबत दि. १४/११/२०२५ रोजी वाटाघाटी करण्यात आली. २ टाटा-एस वाहन रु. २४०० प्रतिवाहन, प्रति दिवस १० मजुर प्रति दिवस, प्रति मजुर रु.६०० प्रति दिवस याप्रमाणे दर मान्य करुन करारनाम्याच्या अटी व शर्तीमध्ये GPS प्रणाली लावणे Scope Of Work वाढविणे या अटी शर्तीवर सदर संस्थेने काम करण्याचे मान्य केले. सदर संस्थेने वरिल वाटाघाटीनुसार काम वरील प्रमाणे मान्य केले असुन संस्थेने मान्य केलेल्या दरानुसार काम करण्यास पत्र दिले आहे.

मा. सर्वोच्चन्यायालय यांचे आदेशानुसार मनपा स्तरावरुन श्वान उत्पत्ती नियंत्रण उपक्रम तथा संबंधित यंत्रणा ठेवणेसंबंधी कार्यवाही व अत्यावश्यक सेवा असल्यामुळे सदर कामासंबंधी १वर्षाकरीता मंजुरी व करारनामा करणे करीता परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**विषय क्रमांक 655** –(दि.03.12.2025) महानगरपालिका अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ची नेमणूक करणे बाबत.

**संदर्भ :-** १) दिनांक १९/०९/२०२५ रोजीची वरिल विषयाचे कामाची ई. निविदा क्र. 2025_AMC_1220439_1

२) मा. आयुक्त यांनी दि. १४/११/२०२५ रोजी L1 प्राप्त निविदेस दिलेल्या प्रशासकीय मंजुरी प्रमाणे.

शहर अभियंता यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – निविदा बोलाविली होती काय. शहर अभियंता – 10 लक्ष.रु.चे काम असल्यामुळे ई-निविदा बोलाविण्यात आलेली होती. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 655** –प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या योजनेची अंमलबजावणीसाठी योजनेच्या भागीदारी मध्ये परवडणारे सदनिका (AHP) तसेच वैय्यक्तिक स्वरूपाचे घरकुल (BLC) घटकांतील अर्जदारांचे व प्रस्तावित बांधकामच्या जागेचे सर्वेक्षण करणे, जिओ टॅगिंग करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व मंजूर प्रकल्पाचे घरकुलांचे बांधकामाची देखरेख करणे, महानगरपालिका कार्यालयास योजनेच्या ईतर कामात मदत करणे या कामाकरिता ई- निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेत एकूण ५ सल्लागार संस्थांनी सहभाग घेतला असून तांत्रिक रित्या पात्रतेनंतर खाली नमूद केल्या प्रमाणे आर्थिक प्राप्त झालेले आहेत.

| अनु. क्र | निविदा धारक | दर (% प्रकल्प किंमतीच्या) | निविदा क्र. |
|---|---|---|---|
| १ | **मास्टिफ सोल्यूशन्स प्रा. लि.** | ०.७० | L1 |
| २ | वास्तू क्रीयेशंस | ०.९८ | L2 |
| ३ | महेंद्र दवे आणि अस्सोसिअट | १.०१७ | L3 |
| ४ | व्हिआरपी अस्सोसियेशन | १.०१८ | L4 |
| ५ | नवनिर्माण महिला बहुउद्देशीय संस्था | १.२१० | L5 |

वरिल प्रमाणे सल्लागार संस्था मास्टिफ सोल्यूशन्स प्रा. लि. अमरावती यांनी सर्वात कमी म्हणजेच प्रकल्प किंमतीच्या ०.७०% दर सादर केला असून सदर दरास मा. आयुक्त यांनी दि. १४/११/२०२५ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

वरिल प्रमाणे सदर दरात संस्थेसोबत निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे करारनामा करणेकरिता मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे परंतु सध्यस्थितीत स्थायी समिती अस्तिवात नसल्याने व समितीचे अधिकार मा. प्रशासक यांना असल्याने सदर कामासाठी संस्था मास्टिफ सोल्यूशन्स प्रा. लि. अमरावती यांच्याशी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(क) अन्वये करारनामा करण्यास परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

यानंतर वेळेवरील विषय चर्चेकरीता घेण्यात आला.

**विषय क्रमांक 656** –(दि.04.12.2025). आरोग्य विभाग महानगरपालिका, अमरावती मार्फत देण्यात येणा-या विवाह नोंदणी प्रमाणपत्र करीता सुविधा शुल्क (Convenience Fee) आकारण्यास मंजुरात प्रदान करणेबाबत.

संदर्भ :- १. मा. संचालक, आरोग्य सेवा तथा निबंधक विवाह मंडळ व विवाह नोंदणी (राज्यस्तर), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र. आमाजीआ/कक्ष-८२/विवाह नोंदणी शुल्क /१२३६४-४६१/२०२५ दिनांक ११५/०९/२०२५

२. मा.आयुक्त यांचे दिनांक २३/०९/२०२५ रोजीचे बैठकीमधील निर्देश.

**<u>ठराव क्रमांक 656</u>** –अमरावती महानगपालिका कार्यक्षेत्रांत पाचही प्रशासकीय झोन कार्यालयामार्फत विवाह नोंदणी करण्याचे काम नियमितपणे सुरु असून सद्यस्थितीत त्याकरीता संदर्भ पत्र क्र.१ मध्ये शासन निर्देशानुसार खालील प्रमाणे दर आकारण्याबाबत नमुद आहे.

| तक्ता क्र.१ | विवाह नोंदणी नोंदणी शुल्क | कालावधी | नियम | शुल्क | ज्ञापन शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| ५ (२) | रु.१५/- | | अधिक कालावधीनुसार खालील प्रमाणे शुल्क | विवाह झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आंत शास्ती | रु.५०/- |
| ५ (२) | | ९० दिवस ते १ वर्षाच्या आंत शास्ती | ७ (१) | | रु.१००/- |
| | | १ वर्षापेक्षा जास्त कालावधी नंतर शास्ती | ७ (२) | विवाह नोंदवही तपासणी | रु.२००/- |
| ११ (१) | रु.१५/- | नोंदवहितील प्रमाणित प्रत मिळविण्यासाठी | | | |
| ११ (२) | रु.२०/- | | | | |

तसेच विवाह नोंदणी प्रमाणपत्र हे ऑनलाईन ब्लॉकचेन पध्दतीने देण्यात येत असून त्याकरीता लागणारा खर्च हा मोठ्या प्रमाणात आहे. सार्थ. आरोग्य विभागामार्फत वर नमुद तक्ता क्र.१ मध्ये नमुद नूसार शुल्क आकारण्यात येते. परंतु देण्यात येत असलेल्या सुविधेकरीता कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. अमरावती महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता सुविधा शुल्क (Convenience Fee) वसुल केल्यास अमरावती महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारेल व नागरिकांना चांगल्या प्रमाणात सुविधा सुध्दा उपलब्ध करुन देता येतील करिता वर नमूद तक्ता क्र.३ मध्ये नमुद शुल्का व्यतिरीक्त रु.२५/- सुविधा शुल्क म्हणून आकारणे उचित राहील. करिता सुविधा शुल्क रु.२५/- (Convenience Fee) वसुल करण्याकरीता मा. आयुक्त महोदया यांनी मंजुरात प्रदान केलेली आहे.

परंतु सद्यस्थितीत स्थायी समिती अस्तित्यात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकीत टिप्पणीन्वये प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करावी हि विनंती.

**-स्वा-**
**(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**महानगरपालिका अमरावती**

<u>दिनांक 27.11.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत.</u>

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे गुरुवार दिनांक 27.11.2025 रोजी सकाळी 11 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. आयुक्त तथा प्रशासक, मुख्यलेखापरिक्षक, सिस्टीम मॅनेजर, पशुशल्य आरोग्य अधिकारी, नगरसचिव व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

नगरसचिव यांनी पशुवैद्यकिय अधिकारी यांचेकडील 1 विषय वेळेवर घेण्याकरीताचे पत्र असल्याचे सांगितले. आयुक्त तथा प्रशासक यांनी सदर विषय वेळेवर कार्यक्रम पत्रिकेवर घेण्यास मंजुरी देण्यात असल्याचे सांगितले.

**<u>विषय क्रमांक</u> 645 -** मागील दि. 19/11/2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत वाचुन कायम करणे.

**<u>ठराव क्रमांक</u> 645 -** मागील दि. 19/11/2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत वाचुन कायम केले.

**<u>विषय क्रमांक</u> 627 -** (दि.06.11.2025) कोंडवाडा विभागाअंतर्गत मोकाट जनावरे पकडणे झोन क्र.२.३ व ४ Tender ID-2025 AMC-1220109-1 ई-निवीदा मंजुर करुन करारनामा करणेबाबत.
संदर्भः- मा. आयुक्त यांचे दि. २०/११/२०२५ रोजीचे मंजुरी आदेश.

पशुवैद्यकिय अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – चर्चा झाल्यानुसार मंजुरी देण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 627</u> -** उपरोक्त विषयास अनुसरुन कोंडवाडा विभागाअंतर्गत जनावरे पकडणे संबंधी ई-निवीदा ३ री वेळ झोन क्र.२,३व ४ Tender ID- २०२५ AMC_१२२०१०९_१, एक मोठेवाहन ६ चाकी, २ बाहन टाटा-एस व १० मजुर पुरवीण्याबाबत ई-निवीदा लावण्यात आली होती. सदर ई-निवीदे मध्ये २ संस्थेने भाग घेतलेला असुन १. नुरेन सुशिक्षीत बेरोजगार संस्था व २. सम्राट अशोक क्रियेचर वेलफेअर संस्था अमरावती या दोन संस्थेने भाग घेतला होता. छानणी समितीने दोन ही संस्थेची तांत्रिक दस्ताऐवजाची तपासणी केली असता L1 सम्राट अशोक क्रियेचर बेलफेअर सोसायटी, अमरावती पात्र आहे.

मा. आयुक्त यांनी L1 संस्थेच्या दराबाबत वाटाघाटी करण्याचे आदेशीत केले होते त्या अनुषंगाने दि. १९/११/२०२५ रोजी मा. आयुक्त यांचे सोबत झोन क्र.२, ३व ४ Tender ID- २०२५ AMC_१२२०१०९०१ या निवीदेच्या वाहने व मणुष्य बळ यांचे दराबाबत ३ प्रकारे माहिती सादर करण्यात आली त्यानुसार कंत्राटदार सम्राटअशोक बेलफेअर सोसायटी, अमरावती यांचे सोबत वाटाघाटी करुन मणुष्यबळ वाहने यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त दर टाटा-एस २४००रु प्रतिदिवस (एकुण २ वाहने), प्रतिमजुर ६७० रु. दराने Minimum Wages Act नुसार तसेच मिनी ट्रक ६चाकी ४०००रू प्रति दिवस याप्रमाणे दर मान्य कारुन करारनाम्याच्या अटी व शर्तीमध्ये GPS प्रणाली लावणे Scope Of Work वाडविणे या अटी शर्तीवर १ ट्रक, २ टाटा-एस व १० मणुष्यबळ यांचे सहाय्याने झोन क्र. २.३व ४ मधिल मोकाट व उपद्रवी जनावरांसंबंधी कार्यवाही करण्याकरीता निवीदार्किमत रु.६२,४१,५०० असून निवीदा किंमतीपेक्षा कमी दर रु. ५६,५७,५०० या दराला मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली असुन त्यानुसार बाटाघाटी नंतर कंत्राटदार यांचे सोबत करारनामा करणे करीता मा. स्थायी समिती सभा यांचे मंजुरीस्तव सविनय सादर,

सदर कामाबाबत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दि. ०७/११/२०२५ रोजीच्या आदेशातील मोकाट जनावरे हटविणे संबंधी दि. १८/११/२०२५ रोजीचे नगरपरिषद संचलनालय द्वारे प्राप्त पत्रास अनुसरुन तरतुदीचे काटेकोरपणे

अनुपालन करणे करीता सदर कामाबाबत प्रशासकीय विषय मान्यतेस व मंजुरीस सादर केल्यानुसार, परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक 646</u> - (दि.20.11.2025) अमरावती महानगरपालीका क्षेत्राअंतर्गत मोकाट श्वान पकडणे संबंधी संस्थेला मुदतवाढ देण्याबाबत.
संदर्भः- मा. आयुक्त यांचे दि. २०/११/२०२५ रोजीचे मंजुरी आदेश.

पशुवैद्यकिय अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. 30 तारखेपर्यंत सदर कामास मुदतवाढ देण्यात यावी. आयुक्त तथा प्रशासक – सदर फाईल कंत्राट संपुष्टात यायचे अगोदरच मंजुर करवुन घेणे आवश्यक आहे. पशुवैद्यकिय अधिकारी – सप्टेंबर महिन्यापर्यंत कंत्राट होता. त्यानंतर मुदतवाढ दयायची आहे. तरी 30 नोव्हेंबर पर्यंत सदर मुदतवाढ देण्यात यावी ही विनंती. आयुक्त तथा प्रशासक – सदर विषयास मंजुरी देण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 646</u> - उपरोक्त संदर्भाकित विषयास अनुसरुन अमरावती अमरावती महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत मोकाट श्वान पकडण्यासंबधी नव युवक नागरीक सेवा सहकारी संस्था अमरावती यांना ठराव क्र-२९ नुसार कंत्राट देण्यात आला होता. दि-३०/०६/२०२५ रोजी संस्थेचा कंत्राट संपुष्ठात आला आहे सदर ई निविदा पुर्ण करने, कार्यरंभ आदेश देणे व इतर प्रशासकिय बाबीची पुर्तता करने करीता लागणारा कालावधी पाहता ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पर्यंत सदर कामाकरीता जुन्या कराररनामानुसार कार्यवाही करने करीता व केलेल्या कामाबाबत कार्येत्तर मंजूरी करीता मा.आयुक्त यानी परवानगी वजा मंजुरी दिलेली असल्यामुळे दि. १९/११/२०२५ रोजीचे मान्यता प्रदान केल्यानुसार, परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक 647</u> - (दि.20.11.2025) अमरावती महानगरपालीका क्षेत्राअंतर्गत मोकाट जनावरे पकडणे संबंधी संस्थेला मुदतवाढ देण्याबाबत.

पशुवैद्यकिय अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. 30 तारखेपर्यंत सदर कामास मुदतवाढ देण्यात यावी. आयुक्त तथा प्रशासक – सदर विषयास मंजुरी देण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 647</u> – उपरोक्त संदर्भाकित विषयास अनुसरुन अमरावती अमरावती महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत मोकाट जनाबर पकडण्यासंबधी समाट अशोक क्रियेचर वेलफेअर सोसायटी यांना ठराव क्र-२८ नुसार कंत्राट देण्यात आला होता. दि. ३०/०६/२०२५ रोजी संस्थेचा कंत्राट संपुष्ठात आला आहे सदर ई निविदा पूर्ण करने, कार्यरंभ आदेश देणे व इतर प्रशासकिय बाबीची पुर्तता करने करीता लागणारा कालावधी पाहता ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पर्यंत सदर कामाकरीता जुन्या कराररनामानुसार कार्यवाही करने करीता व केलेल्या कामाबाबत कार्यत्तर मजुरी करीता मा आयुक्त यानी परवानगी वजा मंजुरी दिलेली असल्यामुळे दि १९/११/२०२५ रोजीचे मान्यता प्रदान केल्यानुसार, परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक 648</u> - (दि.20.11.2025) अमरावती महानगरपालीकेमध्ये Social Platform project राबविण्याबाबत Prachar Public Relations यांचे देयक रु. १,३६,२५०/- बाबत. (चौथा टप्पा )

सिस्टीम मॅनेजर यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – सदर विषयास मंजुरी देण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 648</u> - अमरावती महानगरपालिका अंतर्गत Social Platform प्रकल्प राबविण्याकरीता सदर कामाचे कंत्राट प्रचार पब्लिक रीलेशन, अमरावती यांना उपायुक्त यांच्या आदेशान्वये

जा.क्र.अमनपा/संवि/१४८६/२०२२, दि.२७/०९/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून सदर कंत्राटाची मुदद दि.२७/०९/२०२३ रोजी संपुष्टात आली असुन त्याबाबत अंतिम टप्याचे दिनांक 16/06/2023 ते 26/09/2023 चे देयक कार्यालय सदर केले असून प्रस्तावित करण्यात आले आहे.

प्रचार पब्लिक रीलेशन, अमरावती यांचे मार्फत सादर करण्यात आलेले देयकावर प्रशासक स्थायी समिती यांनी मान्यता प्रदान करावी व सदर देयक अदा करण्यास परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक 649</u> - (दि.24.11.2025) दि.२९/०९/२०२५ ते दि. १४/११/२०२५ या कालावधी मध्ये लेखापरिक्षण विभागाने अमरावती महानगरपालीका मधील लेख्यांची साप्ताहीक छाननीबाबत चे साप्ताहीक अहवाल सादर करणेबाबत.

मुख्यलेखापरिक्षक यांनी टिपणी वाचुन दाखविली. मुख्यलेखापरिक्षक विभागातील अंतर्गत ऑडीट अहवाल सादर करण्यात आलेला आहे. आयुक्त तथा प्रशासक – सदर विषयास मंजुरी देण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 649</u> - उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ (सुधारित २०१६) चे कलम १०५ व १०६ अन्वये महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरिक्षक यांनी लेख्यांची साप्ताहिक छाननीव तपासणी करुन साप्ताहिक अहवाल स्थायी समीती समक्ष सादर करण्याबाबत नमुद आहे.

| अनु. क्र. | साप्ताहीक अहवालाचा कालावधी |
|---|---|
| ०१ | दि.२९/०९/२०२५ ते दि.०३/१०/२०२५ |
| ०२. | दि.०६/१०/२०२५ ते दि.१०/१०/२०२५ |
| ०३. | दि.१३/१०/२०२५ ते दि.१७/१०/२०२५ |
| ०४. | दि.२०/१०/२०२५ ते दि.२४/१०/२०२५ |
| ०५. | दि.२७/१०/२०२५ ते दि.३१/१०/२०२५ |
| ०६. | दि.०३/११/२०२५ ते दि.०७/११/२०२५ |
| ०७. | दि.१०/११/२०२५ ते दि. १४/११/२०२५ |

त्यास अनुसरुन लेखापरिक्षण विभागाने दि. २९/०९/२०२५ ते दि. १४/११/ २०२५ रोजी केलेल्या लेख्यांची साप्ताहिक तपासणी बाबतचा अहवाल सोबत संलग्न आहे. परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती यांनी सदर उपरोक्त अहवालाचे अवलोकन केले.

यानंतर वेळेवरील विषय चर्चेकरीता घेण्यात आला.

<u>विषय क्रमांक 650</u> - (दि.27.11.2025) कोंडवाडा विभागाअंतर्गत मोकाट जनावरे पकडणे झोन क्र.1 व 5 Tender ID-2025 AMC-1217994-1 ई-निवीदा मंजुर करुन करारनामा करणेबाबत.

संदर्भः- मा. आयुक्त यांचे दि. २०/११/२०२५ रोजीचे मंजुरी आदेश.

पशुवैद्यकिय अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – सदर विषयास मंजुरी देण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 650</u> - उपरोक्त विषयास अनुसरुन कोंडवाडा विभागाअंतर्गत जनावरे पकडणे संबंधी ई-निवीदा 2 री वेळ झोन क्र.1व 5 Tender ID- 2025 AMC_1217994- 1, एक मोठेवाहन ६ चाकी, २ बाहन टाटा-एस व १० मजुर पुरवीण्याबाबत ई-निवीदा लावण्यात आली होती. सदर ई-निवीदे मध्ये 4 संस्थेने भाग घेतलेला असुन १. नुरेन सुशिक्षीत बेरोजगार संस्था व २. सम्राट अशोक क्रियेचर वेलफेअर संस्था अमरावती, 3 बेरोजगारांची भारतीय महिला

सेवा सहकारी संस्था,अमरावती, 4. बेरोजगाराची समर सेवा सहकारी संस्था अमरावती या चार संस्थेने भाग घेतला होता. छानणी समितीने चारही संस्थेची तांत्रिक दस्ताऐवजाची तपासणी केली असता 1. सम्राट अशोक क्रियेचर बेलफेअर सोसायटी, अमरावती व 2. L1 बेरोजगाराची भारतीय महिला सेवा सहकारी संस्था, अमरावती पात्र होत्या. परंतु दोन्ही संस्थेचा आर्थिक लिफाफा उघडला असता कमी दर L1 बेरोजगारांची भारतीय महिला सेवा सहकारी संस्थेचे असल्यामुळे सदर संस्था पात्र ठरली.

मा. आयुक्त यांनी L1 संस्थेच्या दराबाबत वाटाघाटी करण्याचे आदेशीत केले होते त्या अनुषंगाने दि. १९/११/२०२५ रोजी मा. आयुक्त यांचे सोबत झोन क्र.1 व 9 Tender ID- 2025 AMC_1217994-1 या निवीदेच्या वाहने व मणुष्य बळ यांचे दराबाबत ३ प्रकारे माहिती सादर करण्यात आली त्यानुसार कंत्राटदार बेरोजगारांची भारतीय महिला सेवा सहकारी संस्था अमरावती यांचे सोबत वाटाघाटी करुन मणुष्यबळ वाहने यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त दर टाटा-एस २४००रु प्रतिदिवस (एकुण २ वाहने), प्रतिमजुर ६७० रु. दराने Minimum Wages Act नुसार तसेच मिनी ट्रक ६चाकी ४०००रू प्रति दिवस याप्रमाणे दर मान्य करुन करारनाम्याच्या अटी व शर्तीमध्ये GPS प्रणाली लावणे Scope Of Work वाढविणे या अटी शर्तीवर १ ट्रक, २ टाटा-एस व १० मणुष्यबळ यांचे सहाय्याने झोन क्र. 1 व 5 मधिल मोकाट व उपद्रवी जनावरांसंबंधी कार्यवाही करण्याकरीता निवीदार्किमत रु.६२,४१,५०० असून निवीदा किंमतीपेक्षा कमी दर रु. ५६,५७,५०० या दराला मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली असुन त्यानुसार वाटाघाटी नंतर कंत्राटदार यांचे सोबत करारनामा करणे करीता मा. स्थायी समिती सभा यांचे मंजुरीस्तव सविनय सादर,

सदर कामाबाबत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दि. ०७/११/२०२५ रोजीच्या आदेशातील मोकाट जनावरे हटविणे संबंधी दि. १८/११/२०२५ रोजीचे नगरपरिषद संचलनालय द्वारे प्राप्त पत्रास अनुसरुन तरतुदीचे काटेकोरपणे अनुपालन करणे करीता सदर कामाबाबत प्रशासकीय विषय मान्यतेस व मंजुरीस सादर केल्यानुसार, परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**-स्वा-**
**(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**महानगरपालिका अमरावती**

<u>दिनांक 19.11.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत.</u>

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे बुधवार दिनांक 19.11.2025 रोजी सकाळी 11 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. आयुक्त तथा प्रशासक, अति.आयुक्त (1), उपायुक्त (प्रशा), उपायुक्त (2), मुख्यलेखापरिक्षक, मुख्यलेखाधिकारी, शहर अभियंता, सिस्टीम मॅनेजर, पशुशल्य आरोग्य अधिकारी, उपअभियंता (कार्यशाळा), नगरसचिव व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

<u>विषय क्रमांक</u> 636 - मागील स्थायी समिती सभा दि.13/11/2015 रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

<u>ठराव क्रमांक</u> 636 - मागील स्थायी समिती सभा दि.13/11/2015 रोजी झालेल्या स्थायी समिती समिती सभेचे कार्यवृत्तांत सभेने वाचुन कायम केले.

<u>विषय क्रमांक</u> 627 - (दि.06.11.2025) कोंडवाडा विभागाअंतर्गत मोकाट जनावरे पकडणे झोन क्र.२.३ व ४ Tender ID-2025 AMC-1220109-1 ई-निवीदा मंजुर करुन करारनामा करणेबाबत.

आयुक्त तथा प्रशासक – टेंडर आलेले आहे ते मला दाखविण्यात यावे. तोपर्यंत विषय स्थगीत ठेवण्यात येत आहे.

<u>विषय क्रमांक</u> 637 - (दि.14.11.2025)उद्यान विभागातील tree branching चे कामाकरीता tree branching machine खरेदी करण्यास मंजुरात प्रदान करणेबाबत.

उपअभियंता (कार्यशाळा) यांनी टिपणी वाचुन दाखविली. प्रथमतः L-१ असलेले LOT International यांचेसोबत वाटाघाटी केली असता त्यांनी निविदेमध्ये भरलेले प्रति मशिन दर रु.२५,४०,५००/- यामध्ये कमी करण्यास असहमती दर्शविली तसे त्यांनी पत्राद्वारे कळविले आहे. सदर दर अमरावती महानगरपालिकेस परवडण्याजोगे नाही.

त्यामुळे L-२ असलेने Ashok Motors यांचेसोबत वाटाघाटी केली असता त्यांनी निविदेमध्ये भरलेले प्रति मशिन दर रु.२५,८५,६५०/- यामध्ये रु.९५,०००/- कमी रु.२४,९०,६५०/- मध्ये पुरवठा करण्यास सहमती दर्शविली. तसे त्यांनी पत्राद्वारे कळविले आहे. सदर दर GeM पोर्टलवरील प्रति मशिन रु.२४,१५,०००/- पेक्षा कमी आहेत. त्यामुळे L-२ असलेले Ashok Motors यांचे दर मंजुर करण्याकरीता विषय स्थायी समिती सभेच्या मंजुरीकरीता सादर. आयुक्त तथा प्रशासक – टिपणीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 637</u> – उद्यान विभागातील कामाचा व्याप अतिशय मोठा असून उपलब्ध यंत्रणा अतिशय तोकडी आहे. महानगरपालिका क्षेत्रात एकुण 205 उद्याने असून त्यापैकी 62 उद्याने कंत्राटावर देण्यात आली असून 143 उद्यानांची देखभाल मनपास करावी लागत आहे. महानगरपालिका क्षेत्रात मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, डिव्हायडर व उद्याने सर्व वापराच्या असंख्य खुल्या जागा असून त्यावरील झाडाचे branching करावे लागते. या कामाकरिता या विभागात फक्त दोन मशीन्स उपलब्ध असून त्यापैकी एक Expire for use होत आहे. या मशिनला नेहमी दुरुस्ती करावी लागत असून त्याचे सुटे भाग लोकल मार्केट ला उपलब्ध नसतात. त्यामुळे उद्यान विभागास नागरिक तसेच राजकीय पदाधिकारी यांचा प्रचंड रोष सहन करावा लागतो. तसेच विद्युत वाहिनीच्या खाली वाढणारे वृक्ष काढणे हा एक वेगळाच Task उद्यान विभागास करावा लागतो, ती एक तातडीची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी लागते, यंत्रणा अतिशय तोकडी असल्यामुळे उद्यान विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रचंड तणावाखाली काम करावे लागत आहे. या करिता उद्यान विभागाचे सक्षमीकरण करणे अतिशय आवश्यक आहे. पावसाळ्याच्या दिवसात म्हणजे जून ते नोव्हेंबर म्हणजे दिवाळी पर्यंत tree branching ची कामे करावीच लागतात, तोकड्या यंत्रणेमुळे अतिशय ओढताण होत असून नागरिक व राजकीय प्रतिनिधी यांचे सोबत रोजच कर्मचाऱ्यांना वादाच्या भांडणाच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागत आहे जी अतिशय गंभीर बाब आहे. मा. आयुक्त यांनी दि.1/08/2025 ला झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीच्या सभेमध्ये सदर मशिन `वृक्ष प्राधिकरण' या शिर्षातंर्गत जमा निधी/रक्कमे मधून नवीन मशीन खरेदी करणे संदर्भातील प्रस्ताव सादर करण्यास निर्देशित केले आहे. यापूर्वी मशीन्स खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव DPC मध्ये सादर करण्यात आला होता. परंतु तेथे सदर प्रस्ताव नामंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे सदर यंत्राची खरेदी मनपा शिर्ष किंवा इतर शासन शिर्षामधून करता येऊ शकेल. मा.मुख्यलेखापरिक्षक यांचेकडे चौकशी केली असता `वृक्ष प्राधिकरण' शिर्षातंर्गत पुरेसा निधी अंदाजे 1.5 कोटी रु. उपलब्ध आहे. या निधीमधून सदर खरेदीची कारवाई करता येईल. अमरावती मनपा क्षेत्रात एकूण दोन विधानसभा क्षेत्र येतात. प्रशासकीय कामाचे दृष्टीने एकंदर पाच झोन कार्यालये आहेत. प्रत्येक झोन कार्यालया करिता एक असे एकूण 5 (पाच) यंत्राची (शक्तिमान) उपलब्धता करणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या एक मशिन व्यवस्थित असून उर्वरीत 4 नग शक्तिमान मशीन खरेदीची प्रक्रिया करण्यास हरकत नाही, यंत्रसामुग्रीची खरेदी, देखभाल व दुरुस्ती ही कार्यशाळा विभागा कडून होत असते, त्यामुळे पुढील प्रशासकीय प्रक्रिया कार्यशाळा विभागाकडून करणेबाबत प्रस्ताव प्राप्त झाला होता.

त्यानुसार कार्यशाळा विभागाने मा. आयुक्त यांचे मंजुरीनुसार ट्री

कटर वाहने खरेदी करणेकरिता GeM पोर्टलवर निविदा प्रसिदध करण्यात आली होती. त्यामध्ये खालीलप्रमाणे एकुण तिन निविदा प्राप्त झाल्यात.

१.अशोक मोटर्स
२. लॉट इंटरनॅशनल
३. आर्या एजन्सिज

वरील प्राप्त निविदांचे कागदपत्रांची तपासणी करिता निविदा छाननी समितीची बैठक दिनांक १४/१०/२०२५ रोजी घेण्यात आली. त्यानुसार अशोक मोटर्स व लॉट इंटरनॅशनल हे निविदाधारक पात्र ठरत असुन आर्या एजन्सिज हे अपात्र ठरत होते. त्यामुळे वरील दोन पात्र निविदाधारकांचे आर्थिक लिफाफा उघडण्यात आले. त्यामध्ये खालीलप्रमाणे प्रति वाहन दर प्राप्त झालेत.

१. LOT International - Rs. २५,४०,०००/-

२. Ashok Motors - Rs. २५,८५,६५०/-

वरील प्राप्त दरानुसार LOT International यांचे दर सर्वात कमी आहेत. परंतु सदर वाहने खरेदी करणेबाबत नस्ती प्रस्तावित करीत असतांना GeM पोर्टलवर तपासणी केली असता मशिन करीता प्रति वाहन रु.२४,९५,०००/- दर अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात निविदेअंती रु. २५,४०,०००/- म्हणजेच रु.४५,०००/- प्रति वाहन दर जास्त प्राप्त झालेत. त्यामुळे L-१ असलेले LOT International व L-२ असलेले Ashok Motors यांना वाटाघाटी करीता बोलाविण्यात आले. प्रथमतः L-१ असलेले LOT International यांचेसोबत वाटाघाटी केली असता त्यांनी निविदेमध्ये भरलेले प्रति मशिन दर रु.२५,४०,५००/- यामध्ये कमी करण्यास असहमती दर्शविली. तसे त्यांनी पत्राद्वारे कळविले आहे. सदर दर अमरावती महानगरपालिकेस परवडण्याजोगे नाही. त्यामुळे L-२ असलेले Ashok Motors यांचेसोबत वाटाघाटी केली असता त्यांनी निविदेमध्ये भरलेले प्रति मशिन दर रु.२५,८५,६५०/- यामध्ये रु.९५,०००/- कमी करून रु.२४,९०,६५०/- मध्ये पुरवठा करण्यास सहमती दर्शविली. तसे त्यांनी पत्राद्वारे कळविले आहे. सदर दर GeM पोर्टलवरील प्रति मशिन रु.२४,९५,०००/- पेक्षा कमी आहेत.

सबब, L-२ असलेले Ashok Motors यांनी दिलेले प्रति मशिन दर रु.२४,९०,६५०/- यांस मा.आयुक्त यांनी दि. १३/११/२०२५ रोजी मंजुरात प्रदान केली असल्यामुळे Ashok Motors यांना ४ नग मशिन पुरवठा करणेबाबत आदेश देणे तसेच करारनामा करण्यास परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक</u> **638 -** (दि.14.11.2025)अमनपाचे विवीध विभागाकरीता ३५ स्कॅनर खरेदी करणे बाबत.

सिस्टीम मॅनेजर यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 638</u> – अमनपाचे विविध विभागाकरिता ३५ स्कॅनर खरेदी करण्याकरीता GEM पोर्टल वर निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर बीड मध्ये एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या होत्या. सादर 03 निविदा धारक हे तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरत असल्याने 03 निविदा धारकांचे आर्थिक लिफाफा उघाडण्यात आले असून त्यांचे दर खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Seller Name | Price | Rank |
|---|---|---|---|
| 1 | Sintileit Technologies. | 10,83,250/- | L1 |
| 2 | POOJA ELECTRICALS. | 14,91,000/- | L2 |
| 3 | SNEVIN ENTERPRISES. | 16,38,350/- | L3 |

Sintileit Technologies यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांची निविदाप्रमाणे खर्च व प्रक्रिया मंजूर करण्यास प्रशासक स्थायी समिती यांनी मान्यता प्रदान करावी व करारनामा करण्यास परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक</u> 639 - (दि.14.11.2025)अमनपाचे विवीध विभागाकरीता ५० प्रिंटर खरेदी करणे

सिस्टीम मॅनेजर यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – दोनही विषयांकित साहित्य पुरवठा करणारी कंपनी एकच आहे काय. सिस्टीम मॅनेजर - दोनही विषयांकित साहित्य पुरवठा करणारी कंपनी एकच आहे. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 639</u> – अमनपाचे विविध विभागाकरिता ५० प्रिंटर खरेदी करण्याकरीता GEM पोर्टल वर निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर बीड मध्ये एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या होत्या. सादर 03 निविदा धारक हे तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरत असल्याने 03 निविदा धारकांचे आर्थिक लिफाफा उघाडण्यात आले असून त्यांचे दर खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Seller Name | Price | Rank |
|---|---|---|---|
| 1 | Sintileit Technologies. | 20,67,500/- | L1 |
| 2 | POOJA ELECTRICALS. | 25,09,000/- | L2 |
| 3 | SNEVIN ENTERPRISES. | 27,90,500/- | L3 |

Sintileit Technologies यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांची निविदाप्रमाणे खर्च व प्रक्रिया मंजूर करण्यास प्रशासक स्थायी समिती यांनी मान्यता प्रदान करावी व करारनामा करण्यास परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत

स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**विषय क्रमांक 640** - (दि.17.11.2025)अमरावती महानगरपालीकेतील विविध विभागाकरीता अनुभवी तज्ञ व्यक्ती/संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून Empanelment तयार करणे बावत,

शहर अभियंता यांनी टिपणी वाचुन दाखविली. प्रधानमंत्री आवास योजनेचे काम ॲडव्हॉंसमध्ये केलेले आहे. आयुक्त तथा प्रशासक – छत्रीतलावाचे कामाचा समावेश यामध्ये करण्यात यावा. विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 640** – अमरावती महानगरपालिकेतील बांधकाम, उद्यान, पाणीपुरवठा, विद्युत, यांत्रिकी, भांडार आणि अग्निशमन विभागातील रस्ते बांधकाम, नाली, सिडी वर्क, इमारत बांधकाम, स्थापत्य प्रकल्पाचे कामे, विद्युत संबंधित कामे, पाणीपुरवठा संबंधित कामे, यंत्र सामुग्री खरेदी करणे, इत्यादी कामे विभागामार्फत केली जाते. महानगरपालिकेतील इतर अत्यावश्यक कामांचे अंदाजपत्रक / सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, स्ट्रक्चरल डिझाइन, निविदा दस्ताऐवज तयार करण्यासाठी अनुभवी तज्ञ व्यक्ती / संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन Empanelment ची निवड करण्यात आली आहे.

विभागातील कामांची वर्गवारी करण्याकरीता तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना अदा करावयाचे मुल्य मा. आयुक्त यांनी खालीलप्रमाणे तक्त्यामध्ये नमुद केल्यानुसार निश्चित
करण्यात आलेले आहे.

| Sr. No. | Company name Owner Name | Mobile No. | Company Address | Receiving Date | Experience |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MASTIFF Solutions. Amravati | 9890411855 | 3rd floor Gulshan Tower, Jaistambh square, Amravati | 28/01/2025 | 10 Years |

1. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना देण्यात येणाऱ्या निविदा रक्कमेच्या (Schedule-B)

खर्चाच्या 1.50 टक्के शुल्काचे विवरण व देयक वेळापत्रक

| अ.क्र. | विवरण | कालावधी | सल्लागार याना दयावयाचे शुल्क % |
|---|---|---|---|
| 01. | महानगरपालिकेतील विभागांनी सांगितलेल्या कामानुसार स्थळ पाहणी करणे, कामाचे Drawings/Sections त्याला प्रथम तयार करन विभागप्रमुखाची मान्यता घेणे, कामाचे मंजूर झालेल्या Drawings/Sections नुसारच अंदाजपत्रक तयार करणे | कमाल 07 दिवस 05% | 05% |
| 02. | अंदाजपत्रक संबंधित यंत्रणेकडुन मंजूर करुन घेणे, मंजूर अंदाजपत्रकाच्या देणे, निविदा प्रक्रिया राबविणे व निविदा कामांचे निविदा | कमाल 15 दिवस (निविदा प्रक्रीयेचे दिवस | |

| | | | |
|---|---|---|---|
| | दस्ताऐवज तयार करुन अंतिम करुन देणे | वगळून) | |
| 03. | कामाचा कायर्यारंभ आदेश कंत्राटदारास दिल्यानंतर कामाचे स्थळावर किमान तीन वेळा प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करणे व कामाच्या गुणवत्ते बाबत अहवाल कंत्राटदराच्या देयका सोबत जोडणे, कामाचे देयके तयार करण्यास अभियंतास मदत करणे, कामाच्या अंतिम देयकाच्या वेळी देय रक्कम देण्यात येईल. | कार्यारंभआदेशाच्या कालावधीनुसार | 80% प्रत्येक R.A. बिलानुसार एकुण रक्कमेच्या प्रमाणात देय राहतील. |
| 04. | संबंधित अभियंता कडुन काम पूर्ण झाल्याचे व काम समाधानकारक झाले असल्याचा दाखला मिळविल्यानंतर | काम पूर्ण झाल्याचा दाखला मिळाल्यानंतर | 10% |

2. प्राप्त आवेदनातुन अनुभवी तज्ञांचे पॅनल तयार करण्यात आलेले आहे. कोणत्या प्रकल्प सल्लागार कोणत्या कामाचे अंदाजपत्रक करण्यास दयावयाचे त्याचा पुर्ण अधिकार मा. आयुक्त यांचे राखीव राहील त्याबाबत कोणाचेही काहीही म्हणणे राहणार नाही.

वरीलप्रमाणे कामाचे स्वरुप व सेवा शुल्क राहणार आहे. यांना मा. आयुक्त यांनी दि. 10.11.2025 रोजी मंजुरी दिल्याप्रमाणे अनुभवी तज्ञ व्यक्ती / संस्थेची प्रकल्प

व्यवस्थापन सल्लागारांशी करारनामा करण्यास परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक</u> 641 - (दि.17.11.2025) स्थानिक निधी लेखापरिक्षा, छत्रपती संभाजी नगर यांचे सन २०१६-१७ ते सन २०१७-१८ चे लेखापरिक्षण अहवाल यांचे अवलोकनार्थ मा. स्थायी समिती समक्ष सादर करणे बाबत.

मुख्यलेखापरिक्षक यांनी टिपणी वाचुन दाखविली. सन २०१६-१७ ते २०१७-१८ या कालावधीचे स्थानिक निधी लेखापरिक्षा, छत्रपती संभाजी नगर यांचे पथकाव्दारे अमरावती महानगरपालिकेच्या विविध विभागांचे केलेल्या लेखापरिक्षणाचे अहवाल विभागास प्राप्त झाले आहेत. सदर प्राप्त अहवालाचे विभागवार वर्गीकरण करुन त्यांचे संक्षीप्त विवरण पत्रे व गोषवारा तयार करुन सोबत संलग्न केला आहे.

आयुक्त तथा प्रशासक – विषयांकित अहवालाचे समितीने अवलोकन केले विषयास मान्यता देण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 641</u> – उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० चे कलम १० (१) मधील तरतुदीनुसार लेखापरिक्षण अहवाल स्थानिक प्राधिकरणाच्या बैठकीपुढे सादर करुन पारित ठरावाची प्रत अनुपालन अहवालासह सादर करण्यासाठी आवश्यक आहे. त्यास अनुसरुन सन २०१६-१७ ते २०१७-१८ या कालावधीचे स्थानिक निधी लेखापरिक्षा, छत्रपती संभाजी नगर यांचे पथकाव्दारे अमरावती महानगरपालिकेच्या विविध विभागांचे केलेल्या लेखापरिक्षणाचे अहवाल विभागास प्राप्त झाले आहेत. सदर प्राप्त अहवालाचे विभागवार वर्गीकरण करुन त्यांचे संक्षीप्त विवरण पत्रे व गोषवारा तयार करुन सोबत संलग्न केला आहे.

करीता सन २०१६-१७ व २०१७-१८ या कालावधीचे स्थानिक निधी लेखापरिक्षा, छत्रपती संभाजीनगर यांचे लेखापरिक्षण अहवाल, परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, अवलोकन व अनुपालने सादर करण्याचे कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रमांक 642 -** स्थानिक निधी लेखापरिक्षा, छत्रपती संभाजीनगर यांचे सन २०१८-१९ ते सन २०२०-२१ या कालावधीचे लेखापरिक्षण अहवाल यांचे अवलोकनार्थ मा. स्थायी समिती समक्ष सादर करणे बाबत.

मुख्यलेखापरिक्षक यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – विषयांकित अहवालाचे समितीने अवलोकन केले. विषयास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 642** – उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० चे कलम १० (१) मधील तरतुदीनुसार लेखापरिक्षण अहवाल स्थानिक प्राधिकरणाच्या बैठकीपुढे सादर करुन पारित ठरावाची प्रत अनुपालन अहवालासह सादर करण्यासाठी आवश्यक आहे. त्यास अनुसरुन सन २०१८-१९ ते सन २०२०-२१ या कालावधीचे स्थानिक निधी लेखापरिक्षा, छत्रपती संभाजी नगर यांचे पथकाव्दारे अमरावती महानगरपालिकेचे लेखापरिक्षणाचे अहवाल विभागास प्राप्त झाला आहे. सदर प्राप्त अहवालाचे विभागवार वर्गीकरण करुन त्यांचे संक्षीप्त विवरण व प्रशासकीय टिपणी सोबत संलग्न केली आहे.

करीता सन २०१८-१९ ते सन २०२०-२१ या कालावधीचे स्थानिक निधी लेखापरिक्षा, छत्रपती संभाजीनगर यांचे लेखापरिक्षण अहवाल, परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, अवलोकन व अनुपालने सादर करण्याचे कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रमांक 643 -** अमरावती महानगरपालिकेच्या स्वतःच्या मालकीचे वाहनांचे तथा मशिनरीचे देखभाल व दुरुस्ती (Annual Maintenance Contract) चे कंत्राटास मंजुरात प्रदान करणेबाबत.

उपअभियंता (कार्यशाळा) यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – विषयास मान्यता प्रदान करीत आहे.

**ठराव क्रमांक 643 -** अमरावती महानगरपालिकेचे दैनंदीन कामकाजाकरिता सन २०२२ मध्ये कार्यरत असलेली स्वतःचे मालकीची बरीच वाहने जुनी झाली असल्याने त्यामध्ये वारंवार दुरुस्ती कामे निघुन खर्च सुदधा मोठ्या प्रमाणात होत होता. त्यामुळे महानगरपालिकेचे दैनंदीन कामकाजाकरिता कार्यरत जडयंत्र वाहने तथा मशिनरी व हलकी स्वरुपाचे वाहनांचे आयुष्य पाहता भविष्यात वारंवार उदभवणारी मोठ्या स्वरुपातील दुरुस्ती तसेच वाहनाला लागणारे बॅटरी, टायर व ट्युब, ऑईल, कुलंट यांचे Annual Maintenance Contract (AMC) चे काम रु.९० लक्ष ई-निविदा किंमत गृहीत धरून ई-निविदेव्दारे प्रति वर्ष रु.६४.४९ लक्ष मध्ये तिन वर्षांकरिता स्वप्निल टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स यांना देण्यात आला होता व तसा करारनामा करण्यात आला होता.

सदर करारनामाची मुदत दिनांक १४/०७/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे मा.आयुक्त यांनी वरील संदर्भीय अन्वये नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेबाबत आदेशित केले.

अमरावती महानगरपालिकेकडे सद्यस्थितीत ३५ हलकी स्वरूपाची व २० जडयंत्र असे एकुण ५५ वाहने कार्यरत

आहेत. सन २०२२ चे एकुण ७४ वाहनांचे तुलनेत उर्वरित वाहनांचे शासन निर्णयानुसार आयुष्य पुर्ण झाल्यामुळे निर्लेखिन करण्यात आले आहेत. सद्यस्थितीत कार्यरत ५५ वाहनांपैकी बरीच वाहने जुनी झालेली असून निर्लेखित करणे आवश्यक आहे. परंतु अमरावती महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता नविन वाहने खरेदी करता येत नसल्यामुळे जुन्याच वाहनांची दुरुस्ती कामे करून वापरण्यात येत आहेत. सन २०२२ मध्ये ई-निविदा प्रक्रिया राबवितेवेळी एकूण ७४ वाहनांकरिता खालील सुत्रान्वये रु.९० लक्ष ई-निविदा किंमत गृहीत धरण्यात आलेली होती. १) मा. सहा. अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), सा.बा.वि नवी मुंबई यांचे परिपत्रक सर्व सहाय्यक मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांचे दि. १२.०५.२०२१ अन्वये (सोबत संलग्न आहे), मनपा अमरावतीच्या अधिनस्त सर्व ७४ वाहनांची देखभाल दुरुस्ती करिता वाहनांचे प्रकार, वापरातील घसाई, वाहनांचे सद्यस्थितीतील वय, वापराचा प्रकार यांचा अभ्यास केला असता एका वाहनास रु. ११,८६,२३०/- खर्च अपेक्षित आहे. अशा पद्धतीने अंदाजे ८ ते १० कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. २) महाराष्ट्र शासनाचे जलसंपदा विभागातील मा. कार्यकारी अभियंता सनियंत्रण यांना पत्र कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन दि. ०४/०५/२०२१ रोजीच्या पत्रानुसार (सोबत संलग्न आहे), अंदाजे प्रति वाहन खर्च काढल्यास रु. १२,२६,२००/- एवढा येत होता. मनपाच्या अधिकारक्षेत्रात सध्या ७४ वाहने असल्याने एकूण खर्च ८ ते ९ कोटीच्या जवळपास होता.

३) सन २०१७ च्या Annual Maintenance Contract नुसार ४८ वाहनांसाठी एकूण दुरुस्ती खर्च (तत्कालीन वेळेस वाहनांचे स्पेअर पार्ट, टायर्स, लुब्रिकंट ऑईल, मेकॅनिकचा खर्च, वेल्डिंगचा खर्च, जोडाईचा खर्च) रु.६० लक्ष गृहीत धरून निविदा प्रक्रिया करण्यात आली होती.

त्याअनुपाताने (प्रमाणात) कार्यशाळा विभागाने तत्कालीन वेळेसची ७४ वाहनाकरिता निविदा रक्कम एकूण रु.९० लक्ष गृहीत धरली होती व निविदा प्रक्रियेमध्ये यशस्वी कंत्राटदार यांचेमार्फत रु.६४.४९ लक्ष किंमत भरण्यात आलेली होती.

त्याअनुषंगाने सन २०२२ चे तुलनेत सद्यस्थितीत वाहनांचे स्पेअर पार्ट, टायर्स, लुब्रिकंट ऑईल, मेकॅनिकचा खर्च, वेल्डिंगचा खर्च, जोडाईचा खर्च ई. मध्ये झालेली वाढ गृहीत न धरता वरील अनुपातन्वये रु.६७ लक्ष निविदा रक्कम अपेक्षित होती.

सबब, अमरावती महानगरपालिकेचे स्वतःचे मालकीचे वाहनांचे देखभाल व दुरुस्तीकरीता (Annual Maintenance Contract) नव्याने ई-निविदा प्रक्रिया करणेकरीता रु.६७ लक्ष निविदा रक्कम गृहीत धरून निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यामध्ये प्रथम वेळेस केवळ एक निविदा प्राप्त झाल्यामुळे दुसरी वेळ निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यामध्ये सुद्धा एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे दि.२७/०९/२०१८ रोजीचे शासन निर्णयान्वये दुसरी वेळ ई-निविदेमध्ये एकच निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदा उघडून प्रचलित पद्धतीनुसार कार्यवाही करणेबाबत नमूद आहे. त्यानुसार सदर निविदेमध्ये दुसरी वेळेस Swapnil tours And travels यांची एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे सदर निविदेचे तांत्रिक व आर्थिक लिफाफा उघडण्यात आला.

त्यामध्ये Swapnil tours And travels यांचे

रु.६४,४९,०००/- प्रति वर्ष दर प्राप्त झालेत. त्यामुळे सदर दरामध्ये वाटाघाटीअंती रु.६३,४९,०००/- मध्ये सदर कामे करण्यास मा.आयुक्त यांनी दि. १५/११/२०२५ रोजी मंजुरात प्रदान केली असल्यामुळे Swapnil tours And travels यांना कार्यारंभ आदेश देण्यास व त्यांचेसोबत करारनामा करण्यासपरंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**विषय क्रमांक 644 -** उद्यान विभागातील tree branching चे कामाकरिता४ नग ट्रॅक्टर खरेदी करण्यास मंजुरात प्रदान करणेबाबत.

उपअभियंता (कार्यशाळा) यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – या वाहनांकरीता वाहनचालक व ऑपरेटर उपलब्ध आहे काय. उपअभियंता (कार्यशाळा) – आपल्याकडे उपलब्ध नसुन वाहनचालक व ऑपरेटर यांना घ्यावे लागेल. आयुक्त तथा प्रशासक – विषयास मान्यता प्रदान करीत आहे.

**ठराव क्रमांक 644 -** उद्यान विभागातील कामाचा व्याप अतिशय मोठा असून उपलब्ध यंत्रणा अतिशय तोकडी आहे. महानगरपालिका क्षेत्रात एकूण 205 उद्याने असून त्यापैकी 62 उद्याने कंत्राटावर देण्यात आली असून 143 उद्यानांची देखभाल मनापास करावी लागत आहे. महानगरपालिका क्षेत्रात मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, डिव्हायडर व उद्याने सर्व वापराच्या असंख्य खुल्या जागा असून त्यावरील झाडाचे branching करावे लागते. या कामाकरिता या विभागात फक्त दोन मशीन्स उपलब्ध असून त्यापैकी एक Expire for use होत आहे. या मशिनला नेहमी दुरुस्ती करावी लागत असून त्याचे सुटे भाग लोकल मार्केट ला उपलब्ध नसतात. त्यामुळे या विभागास नागरिक तसेच राजकीय पदाधिकारी यांचा प्रचंड रोष सहन करावा लागतो. तसेच विद्युत वाहिनीच्या खाली वाढणारे वृक्ष काढणे हा एक वेगळाच Task या विभागास करावा लागतो, ती एक तातडीची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी लागते, यंत्रणा अतिशय तोकडी असल्यामुळे विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रचंड तणावाखाली काम करावे लागत आहे.

या करिता या विभागाचे सक्षमी करण करणे अतिशय आवश्यक आहे. पावसाळयाच्या दिवसात म्हणजे जून ते नोव्हेंबर म्हणजे दिवाळी पर्यंत tree branching ची कामे करावीच लागतात, तोकड्या यंत्रणेमुळे अतिशय ओढताण होत असून नागरिक व राजकीय प्रतिनिधी यांचे सोबत रोजच कर्मचाऱ्यांना वादाच्या भांडणाच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागत आहे जी अतिशय गंभीर बाब आहे.

मा.आयुक्त यांनी दि.1/08/2025 ला झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीच्या सभेमध्ये सदर मशिन `वृक्ष प्राधिकरण' या शिर्षातंर्गत जमा निधी/रक्कमे मधून नवीन मशीन खरेदी करणे संदर्भातील प्रस्ताव सादर करण्यास निर्देशित केले आहे. यापूर्वी मशीन्स खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव DPC मध्ये सादर करण्यात आला होता. परंतु तेथे सदर प्रस्ताव नामंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे सदर यंत्राची खरेदी मनपा शिर्ष किंवा इतर शासन शिर्षामधून करता येऊ शकेल.

मा.मुख्यलेखाधिकारी यांचेकडे चौकशी केली असता `वृक्ष प्राधिकरण' शिर्षातंर्गत पुरेसा निधी अंदाजे 1.5 कोटी रु. उपलब्ध आहे. या निधीमधून सदर खरेदीची कारवाई करता येईल. अमरावती मनपा क्षेत्रात एकूण दोन विधानसभा क्षेत्र येतात प्रशासकीय कामाचे दृष्टीने एकंदर पाच झोन कार्यालये आहेत. प्रत्येक झोन कार्यालया करिता एक असे एकूण 5 (पाच) यंत्राची (शक्तिमान) उपलब्धता करणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या एक मशिन

व्यवस्थित असून उर्वरीत 4 नग शक्तिमान मशीन खरेदीची प्रक्रिया करण्यास हरकत नाही, यंत्रसामुग्रीची खरेदी, देखभाल व दुरुस्ती ही कार्यशाळा विभागा कडून होत असते, त्यामुळे पुढील प्रशासकीय प्रक्रिया कार्यशाळा विभागाकडून करणेबाबत प्रस्ताव प्राप्त झाला होता.

त्यानुसार कार्यशाळा विभागाने मा. आयुक्त यांचे मंजुरीनुसार ४ नग ट्रॅक्टर वाहने खरेदी करणेकरिता GeM पोर्टलवर निविदा प्रसिदध करण्यात आली होती. त्यामध्ये ट्रॅक्टर वाहने खरेदी करणेकरीता खालीलप्रमाणे एकुण दोन निविदा प्राप्त झाल्यात.

१.M/s. Escort Kubota Ltd.

२. Murli Agro Wheels

वरील प्राप्त निविदांचे कागदपत्रांची तपासणी करिता निविदा छाननी समितीची बैठक दिनांक २८/१०/२०२५ रोजी घेण्यात आली. त्यानुसार M/s. Escort Kubota Ltd. व Murli Agro Wheels हे दोन्ही निविदाधारक पात्र ठरत आहेत. त्यामुळे वरील दोन पात्र निविदाधारकांचे आर्थिक लिफाफा उघडण्यात आले. त्यामध्ये खालीलप्रमाणे प्रति वाहन दर प्राप्त झालेत.

१. Escort Kubota Ltd - Rs. ३१,१६,०००/- (प्रति वाहन रु.७,७९,०००/-)

२. Murli Agro Agencies - Rs. ४१,०४,०००/- (प्रति वाहन रु.१०,२६,०००/-)

वरील प्राप्त दरानुसार Escort Kubota Ltd यांचे दर (प्रति वाहन रु.७,७९,०००/-) सर्वात कमी आहेत. त्यामुळे उद्यान विभागाचे दैनंदिन कामकाजाकरीता ४ नग ट्रॅक्टर खरेदी करणेकरिता Escort Kubota Ltd यांचे प्रति वाहन दर रु.७,७९,०००/- यांस मा.आयुक्त यांनी दि.१८/११/२०२५ रोजी मंजुरात प्रदान केली असल्यामुळे Escort Kubota Ltd यांना ४ नग मशिन पुरवठा करणेबाबत आदेश देणे तसेच करारनामा करण्यास परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**-स्वा-**

**(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)**

**आयुक्त तथा प्रशासक,**

**महानगरपालिका अमरावती**

<u>दिनांक 13.11.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत.</u>

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे गुरुवार दिनांक 13.11.2025 रोजी दुपारी 12.15 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. आयुक्त तथा प्रशासक, अति.आयुक्त (2), मुख्यलेखापरिक्षक, मुख्यलेखाधिकारी, वै.आरोग्य अधिकारी, वै.आरोग्य अधिकारी (स्वच्छता), शहर अभियंता, सिस्टीम मॅनेजर, पशुशल्य आरोग्य अधिकारी, नगरसचिव व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

**<u>विषय क्रमांक</u> 628 -** मागील सभा दिनांक 06/11/2025रोजी झालेल्या स्थायी समिती समिती सभेचे कार्यवृत्तांत वाचुन कायम करणे.

**<u>ठराव क्रमांक</u> 628 -** मागील सभा दिनांक 06/11/2025रोजी झालेल्या स्थायी समिती समिती सभेचे कार्यवृत्तांत सभेने वाचुन कायम केले.

**<u>विषय क्रमांक</u> 627** – (दि.06.11.2025) कोंडवाडा विभागाअंतर्गत मोकाट जनावरे पकडणे झोन क्र.२.३ व ४ Tender ID-2025 AMC-1220109-1 ई-निवीदा मंजुर करुन करारनामा करणेबाबत.

आयुक्त तथा प्रशासक – टेंडर केलेले आहे त्यामध्ये नविन टेंडर आलेले आहे काय. पशुशल्य चिकित्सक अधिकारी – जुनी कंपनी व नविन कंपनी असे दोनही कंपनी आलेल्या आहे. याबाबत संबंधीतांशी चर्चा केल्यानंतर विषय घेण्यात यावा. सदर विषय या सभेत स्थगीत ठेवावा ही विंनती. आयुक्त तथा प्रशासक – विषय स्थगीत ठेवण्यात येत आहे.

**<u>विषय क्रमांक</u> 629** – (दि.10.11.2025) महानगरपालिका हद्दीतील निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमित झोपडपट्ट्याचे अतिक्रमणे नियमानुकुल करण्याचे अनुषंगाने झोपडपट्टीनिहाय टोटल स्टेशन सर्व्हे,भौतिक-आर्थिक सर्वेक्षण तसेच संबंधीत कामाकरिता मुदतवाढ मिळण्याबाबत.

शहर अभियंता यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – वर्क ऑर्डर केलेली होती त्याचा कालावधी किती वर्षाकरीता होता. उपअभियंता – सदर कालावधी 1 वर्षाचा होता. करोना काळामध्ये पुन्हा 1 वर्षाची जुन्याच दराने मुदतवाढ दिलेली होती. सदर कंत्राटदार जुन्याच दराने काम करण्यास तयार आहे. आयुक्त तथा प्रशासक – नविन झोपडपट्टीचे सर्वेक्षण करणार काय. सदर कंत्राटदार जुन्याच दराने काम करणार आहे काय हे पहावे. काम लवकरात लवकर सुरु व्हायला पाहिजे. तरी याकामाची प्रोसेस चेक करावी. जुन्या दराने काम देण्याबाबतचा विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 629</u>** - उपरोक्त विषयास अनुसरून, archinova design inc. अमरावती महानगरपालिका हद्दीतील निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमित झोपडपट्ट्याचे अतिक्रमणे नियामानुकुल करून त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेच्या वयक्तिक घरकुल घटकांतर्गत (BLC) लाभ देण्याकरिता महानगरपालिकेने वेळोवेळी एकूण १०० झोपडपट्ट्यांचे टोटल स्टेशन सर्वेक्षण, भौतिक-सामाजिक सर्वेक्षण इत्यादी कार्य सोपविण्यात आले होते. सदर सर्वेक्षणाचे काम जून २०२३ मध्ये पूर्ण झाले असून संबंधित झोपडपट्टीनिहाय अहवाल या कार्यालयास वेळोवेळी सादर करण्यात आले आहेत. त्याबाबत प्रक्रिया सुरु आहे.

तथापि, त्यानंतर मा. उच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे पुढील कामे थांबविण्यात आलेले होते. सध्या सदर स्थगिती आदेश केवळ गायरान जमिनीकरिता असल्याने तसेच P.R. Card देण्यासंदर्भात म.न.पा. ला विविध नागरिक व संस्था वा जनप्रतिनिधींकडून इतर झोपडपट्ट्याचे सर्वेक्षणाची मागणी होत असल्यामुळे, या कार्यालयात उर्वरित झोपडपट्ट्यांचे पट्टा वाटपाच्या अनुषंगाने या झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण व संबंधित कामे करण्याबाबत विचारणा होत आहे. परंतु सदर कामाची मुदत संपल्यामुळे पुढील काम करण्यास अडचण येत आहे. उर्वरित काम पुनः चालू करण्याचे दृष्टीने मुदतवाढ देणे गरजेचे आहे.

शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमाकुल करण्याबाबत झोपडपट्ट्याचे प्लेन टेबल/टोटल स्टेशन तसेच सोशियोईकोनॉमिक सर्वेक्षणासह झोपडीधारकाचे कागदपत्रे गोळा करून त्यांचे प्रमाणीकीकरण करणे तसेच प्राप्त झालेले कागदपत्रे व अर्जाचे डिजीटायझेशन करण्याच्या कामाकरिता पुढील प्रमाणे प्राप्त निश्चतम दरास स्थायी समितीने ठराव क्र. 60, दि. 12.09.2019 अन्वये या अगोदर मंजुरी प्राप्त आहे. त्यात मंजूर दर सर्व करांसहित खालील प्रमाणे आहेत.

1. प्लेन टेवल /टोटल स्टेशन सर्वे करणे रु. 29445/- प्रति हेक्टर
2. झोपडीधारकाकडुन अर्जासह कागदपत्रे रु. 208/- प्रति झोपडीधारक गोळा करणे व त्यांचेप्रमाणीकीकरण करणे,
3. प्राप्त झालेले कागदपत्रे व अर्जाचे डिजीटायझेशन करून स्टोर करणे रु.१८२/- प्रती झोपडीधारक.

वरिल नमूद दरात सल्लागार संस्था काम करण्यास तयार असून सदर प्रकरणी मुदतवाढ देणे संदर्भात मा.आयुक्त यांनी दि.केली असून कामाचा व्याप व मागणी पाहता दि रोजी मान्यता प्रदान २०२५/१०/३१ .३१पर्यंत २०२६/१२/ मुदतवाढ देण्यासपरंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक</u> **630 -** (दि.10.11.2025) PM E –BUS सेवा प्रकल्प मनपा,अमरावती हद्दीतील मौजे-बडनेरा सर्वे क्र.110,कोंडेश्वर रोड,अमरावती येथे ई-बस डेपोचे बांधकाम व विकास करणेबाबत.

शहर अभियंता यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – बिलोचे रक्कमेमध्ये कोणते काम घेवु शकतो काय. मुख्यलेखापरिक्षक – नोव्हेंबर 2023 चे शासन निर्णयानुसार बचत झालेली रक्कममध्ये दुसरे काम करता येणार नाही. विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 630</u> -** उपरोक्त विषयांकीत काम लेखाशिर्ष PME-BUS अंतर्गत निधीमधून प्रस्तावित असुन कामाची निविदा रक्कम रु.8,34,93,928/- आहे. सदर कामाची ई-निविदा प्रणालीव्दारे बोलविण्यात आली असता खालील प्रमाणे प्राप्त निविदा उघडण्यात आल्या.

| कंत्राटदाराचे नाव | दर |
|---|---|
| १) श्री. अजयकुमार हेडा | 0.520% कमी |
| २) श्री. जुजर इंन्फा. प्रोजेक्ट | 5.510% कमी |
| ३) मे. न्यू बालाजी कॅन्स. | 6.999% कमी |

उपरोक्त प्राप्त निविदा धारक मे कंत्राटदार यांचे निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा .न्यू बालाजी कॅन्स .6.999% कमी असल्याने मा .आयुक्त यांनी दि .06/11/2025 ला मंजुरी प्रदान केलेली आहेयांची .न्यू बालाजी कॅन्स .करीता श्री मे . निविदा मंजुर करुन कंत्राटदारा सोबत सदर कामाचा करारनामा करण्यास परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत

स्थायी समिति अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिति उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक</u> 631 - (दि.11.11.2025) विवाह नोंदणी करिता ज्ञापन शुल्क रु.15 ऐवजी रु.30/- आकारण्यास मंजुरात प्रदान करण्याबाबत.

वै.आरोग्य अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – बाजार व परवाना, फायर विभाग, या विभागाचे ब्लॉकचेनचा विषय मंजुर झालेला आहे. तरी ब्लॉकचेन पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. सिस्टीम मॅनेजर – माझ्याकडे कोणतेच विभागाकडुन बलॉकचेनचे प्रकरण आलेले नाही. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर झाल्यानंतर ताबडतोब कारवाई सुरु व्हायला पाहिजे. विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक</u> 631 –अमरावती महानगपालिका कार्यक्षेत्रांत पाचही प्रशासकीय झोन कार्यालयामार्फत विवाह नोंदणी करण्याचे काम नियमितपणे सुरु असून सद्यस्थितीत त्याकरीता शासनाचे निर्देशानुसार विवाह नोंदणी ज्ञापन शुल्क आकारण्यात येत आहे. अमरावती महानगरपालिकेमध्ये विविध सेवांच्या सुधारणा करण्याचे प्रक्रियेअंतर्गत विवाह नोंदणी प्रक्रियेमध्ये ब्लॉकचेन पध्दतीचा अवलंब करण्याचे निश्चित झाले असून ब्लॉकचेन पध्दतीचा अवलंब करुन राबविण्यात येवून नागरिकांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र अदा करण्यात येणार आहे त्याअनुषंगाने विवाह नोंदणी ज्ञापन शुल्कामध्ये सुधारणा करून रु.१५ ज्ञापन शुल्काऐवजी रु.३०/- ज्ञापन शुल्क आकारण्याबाबत मा.आयुक्त अमरावती महानगरपालिका यांनी प्रशासकीय मंजुरात प्रदान केलेली आहे.

तरी अमरावती महानगपालिका कार्यक्षेत्रांत पाचही प्रशासकीय झोन कार्यालयामार्फत विवाह नोंदणी ज्ञापन रु शुल्क आकारण्यास -/३०.परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिति उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक</u> 632 - (दि.11.11.2025) 15 वा वित्त आयोग अंतर्गत सन2022-23 करिता मंजूर 17 UHWC करिता औषधे खरेदी करण्याकरीता स्थायी समितीची मान्यता मिळण्याबाबत.

वै.आरोग्य अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. वाटाघाटीमध्ये सदर औषधीचे दर बाजार भावप्रमाणे घेतलेले आहे. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक</u> 632 - उपरोक्त अमरावती महानगपालिका १५ वित्त आयोग अंतर्गत सन २०२२-२०२३ मध्ये १७ पैकी ११ UHWC करिता औषधे खरेदी करणेकरिता मा आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदरची औषधे खरेदी हि एकूण रु १ कोटी ३२ लाखांची असून सदर GeM पोर्टल वर औषधी खरेदी प्रक्रिये मध्ये भाग घेतला असुन खालील तक्त्या नुसार M/s जैनम फार्मा मुंबई हे निविदाधारक L१ ठरले आहेत संबंधीतांना पुरवठा आदेश देण्याची प्रक्रिया लवकर पूर्ण करावी लागणार आहे. सदरची खरेदी करणेकरिता मा. आयुक्त यांची मान्य टिपणी व तांत्रिक मान्यता आदेश दि. २१/०४/२०२५ रोजी करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | निविदाधारक नाव | सादर केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | जैनम फार्मा मुंबई, | ५३६०.५४ | L1 |
| २. | अरिहंत मेडीटेक, पुणे | ५४९४.६० | L2 |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | आशिष मार्केटिंग, मुंबई | ५५४८.१७ | L3 |

परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**विषय क्रमांक 633 -** (दि.12.11.2025) अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मराठी माध्यमांचा माध्यमिक शाळामध्ये नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत सोलर ऑपरेटेड रोबोटिक्स कोडिंग आर्टीफिशियल इंटेलीजंस साहित्य खरेदी करणेबाबत. ( एकूण संख्या१६)

सिस्टीम मॅनेजर यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – या कंपनीला बोलाविण्यात यावे. त्यांचेशी चर्चा केल्यानंतर त्यांना वर्क ऑर्डर देवु. विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 633 -** अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मराठी माध्यमांचा माध्यमिक शाळामध्ये नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत सोलर ऑपरेटेड रोबोटिक्स कोर्डिंग आर्टीफिशियल इंटेलीजेंस साहित्य बाबत (एकूण संख्या १६) खरेदी करणे बाबत महा-टेंडर पोर्टल वर निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर बीड मध्ये एकूण 04 निविदा प्राप्त झाल्या होत्या. सादर 03 निविदा धारक हे तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरत असून 01 निविदा धारक है तांत्रिक दृष्ट्या अपात्र ठरत असून पात्र निविदा धारकांचे आर्थिक लिफाफा उघाडण्यात आले असून त्यांचे दर खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Seller Name | Price | Rank |
|---|---|---|---|
| 1 | Life Speaks, Sangli. | 79,85,760/- | L1 |
| 2 | PREETAM HI-TECH PRIVATE LIMITED, Sangli. | 79,93,600/- | L2 |
| 3 | Robostorms Technology Pvt Ltd, Kolhapur. | 80,00,000/- | L3 |

Life Speaks, Sangli. यांचे दर सर्वांत कमी असल्याने मायांनी मान्यता प्रदान केली आयुक्त तथा प्रशासक . कृपया त्यांची निविदाप्रमाणे खर्च व प्रक्रिया मंजूर करण्यास .आहेपरंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**विषय क्रमांक 634 –** (दि.12.11.2025) महानगरपालिका,अमरावती कार्यक्षेत्रामध्ये संसर्गजन्य व असंसर्गन्य आजारांना नियंत्रण करणेसाठी खाद्यपदार्थ संस्था व इतर संस्था आस्थापनांना कार्यक्षेत्रात खाद्यपेय तयार करणारे तसेच

इतर आस्थापनांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्य विषयक नाहरकत प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच व्यवसायाची नोंदणी/नुतणीकरण करण्याकरीता ब्लॉकचेंच अंतर्गत शुल्क वाढीबाबत.

वै.आरोग्य अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – फाईलवर अप्रुल घेतले आहे काय. याचे नियम काय आहे, दुकाने किती आहे. याकरीता एक बैठक आयोजीत करावी लागेल. सदर बैठकीचे आयोजन दया दुपारी 12 वा. घेवु. सन 2017 पासुन टि.बी.चे मायक्रोप्लॅनींग केलेले आहे काय. याकरीता आपल्या स्तरावर एक बैठक लावावी. टि.बी.चे पेशंट असेल तर ते शोधुन काढायला पाहिजे. याकरीता प्लॅन तयार करण्यात यावे. अंमलबजावणी झाली पाहिजे. विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 634</u> – महानगरपालिका, अमरावती कार्यक्षेत्रामध्ये पाणीजन्य साथरोग अतिसार, गॅस्ट्रो, डिसेंट्री, कॉलरा, काविळ, विषमज्वर किटकजन्य साथरोग हिवताप, डेंग्यु, चिकुन गुनिया व कोविड-१९ तसेच इतर संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांना आळा घालण्याचे दृष्टीने म.न.पा.कार्यक्षेत्रात खाद्यपेय व इतर व्यवसायाकरीता त्याठिकाणी वापरण्यात येणारे पाणी, खाद्य पदार्थ तयार करण्याची जागा, कार्यरत कर्मचारी, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांची लागण होणार नाही याबाबत संबंधीत आस्थापना धारक यांनी केलेल्या कार्यवाहीची तपासणी व इतर आवश्यक तपासणी करणेकरीता व व्यवसायाचा परवाना नोंदणी, नुतनीकरणाकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे प्रयोजन हे महानगरपालिका, अमरावती कार्यक्षेत्रातील नागरीकांचे आरोग्य व्यवस्थीत राहील व महानगरपालिका, अमरावती कार्यक्षेत्रांत पाणीजन्य साथरोग, किटकजन्य साथरोग, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांना आळा घालणे सोईचे होईल तसेच सदर बाब ही महाराष्ट्र महानगरपालिका कायदा १९४९ कलम ३१८ व ३१९ नुसार आवश्यक आहे.

त्याकरीता बाजार व परवाना विभाग, महानगरपलिका, अमरावती मार्फत महानगरपालिका, अमरावती कार्यक्षेत्रात व्यवसाय करण्यास परवाना प्रदान केलेल्या आस्थापनांची वर नमूद प्रमाणे तपासणी कार्यवाही करावी लागेल व ज्या आस्थापना बाजार व परवाना विभागाकडे व्यवसायाकरीता परवाना व परवाना नुतनीकरणासाठी अर्ज सादर करतील त्यांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्य विषयक ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्यावरच संबंधीत आस्थापनेस व्यवसाय करण्याकरीता परवाना व परवान्याचे नुतनीकरण करण्यास बाध्य करावे लागेल तसेच म.न.पा. कार्यक्षेत्रातील खाद्यपेय व इतर पेढी/आस्थापनांकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्य विषयक ना हरकत प्रमाणपत्रासाठी खालील प्रमाणे दर निश्चित करण्यास मा. स्थायी समिती सभा दिनांक २९/०२/२०२४ रोजीची स्थायी समिती प्रशासकीय ठराय क्रमांक ४३९ नुसार मंजुरात प्रदान केलेली आहे. म.न.पा.चे ब्लॉकचेन अंतर्गत तत्कालिन वेळी निश्चित करण्यात आलेल्या दरामध्ये शुल्क वाढ करण्यास मा. आयुक्त महोदया यांनी मंजुरात प्रदान केलेली आहे.

| अ.क्र. | पेढी/आस्थापनेचा प्रकार | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्य विषयक ना हरकत प्रमाणपत्र |
|---|---|---|
| | | नोंदणी / नुतनीकरण शुल्क |
| 1 | हॉटेल, बिअर बार, खानावळ, चाटसेंटर, वाईन शॉप, बिअर शॉप, बेकरी व इतर खाद्यपदार्थ उत्पादक व विक्री, लॉजींग व बोर्डींग, सिनेमा हॉल, थिएटर, नाटक गृह, मंगल कार्यालय, लॉन, सभागृह, जिम, मसाज सेंटर, हेअर सलुन, ब्युटी | रु.५५०/- |

| | | |
|---|---|---|
| | पार्लर, स्पा सेंटर व पब सेंटर, जकुझी, मेडीकल स्टोअर्स, पंचकर्म सेंटर, हेअर ट्रान्सप्लांट सेंटर, टॅटू सेंटर, फिजिओथेरपी सेंटर, मेडीकल ॲम्ब्युलंन्स, मोबाईल डायग्नोस्टीक, पॅथालॉजी कलेक्शन सेंटर, ब्लड बँक, स्विमींग पुल, बर्फ कारखाना, | |
| २ | सर्व किराणा दुकान, आसईक्रीम पार्लर, फालुदा सेंटर, भेलपुरी तयार करणे व विक्री करणे, ज्युस सेंटर, चहा व कॉफी दुकाने, चाय चस्का बार, कॅफे, दुध विक्री केंद्र व डेअरी प्रॉडक्ट्स, पान सेंटर, पान शॉप, सर्व किराणा दुकान, नविन इमारत बांधकाम (किटक निर्मुलनासाठी), किपींग ॲन्ड कोल्ड स्टोअरेज | रु.२२०/- |

वर नमुद प्रमाणे पेढी/आस्थापना धारक यांचेकडून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्य विषयक नाहरकत प्रमाणपत्र नोंदणी व नुतनीकरणा म.न.पा.चे ब्लॉकचेन अंतर्गत तत्कालिन वेळी निश्चित करण्यात आलेल्या दरामध्ये शुल्क वाढ करण्यास मा.आयुक्त महोदया यांनी मंजुरात प्रदान केलेली आहे करीता अनुक्रमे रु.५५०/- व रु.२२०/-याप्रमाणे शुल्क आकारणी करणेस्तव परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक</u> **635 -** (दि.12.11.2025) "Selection of Service Operator for Collection & Transportation of Municipal Solid Waste up to Processing Plant / Disposal Site at Sukali/Akoli Compost Depot. in Amravati Municipal Corporation. "या कामाकरिता मे.कोणार्क इन्फ्रास्ट्क्चर लिमिटेड, उल्हासनगर यांचे सोबत करारनामा करण्याकरिता मंजुरी मिळणे बाबत.

वै.आरोग्य अधिकारी (स्वच्छता) यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – सद्या पार्ट (A) मान्य कलेले आहे. निविदा करण्याकरीता सदर विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक</u> **635 -** उपरोक्त विषयानुसार, **निविदेची** (RFP) **पार्श्वभूमी व उद्देश**

1. अमरावती शहरात सध्या दैनंदिन सफाफाई, सार्वजनिक शौचालयाची, साफसफाई, प्रभागातील सर्व्हिसगल्ली सर्व्हिस नाली साफ करणे हे कामे झोन स्तरावर सुरु आहे.
2. तसेच शहरातील दैनंदिन विविध ठिकाणावरून कचरा संकलन व वाहतूक हे कामे मे. पूजा कन्ट्रक्शन कंपनी यांचे मार्फत सुरु आहे .मे. पूजा कन्ट्रक्शन कंपनी यांचे कंत्राटकामाचा कालावधी संपुष्ठात आलेला आहे त्या कामाकरिता तातडीने नव्याने निविदा प्रकिया करणे आवश्यक आहे.
3. तसेच झोन स्तरावर असलेले दैनंदिन साफसफाई कंत्राटाच्या अनुषंगाने जिल्हा तसेच उच्च न्यायालयांमध्ये त्यांचे प्रकरण सुरु आहे. त्यांचे कामे समाधान कारक नसल्यामुळे त्यांना वेळोवेळी कामामध्ये सुधारणा करण्याकरिता नोटिसेस सुद्धा देण्यात आलेले आहे. या पार्श्वभूमीवर तसेच सदर कामे हे घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016,

तसेच स्वच्छ भारत मिशन 2.0 अंतर्गत असलेल्या मानक निकषांनुसार करणे बंधनकारक असल्याने तसेच इतर शहराचा अभ्यास दौरा जसे नागपूर, इंदोर या ठिकाणी सुद्धा Daily House to House Collection (Primary Collection ) तसेच शहरामधील collection ठिकाणावरून कचरा संकलित करणे व त्याची विल्लेवाट प्रोसेससिंग या ठिकाणी नेणे (Secondary Transportation ) हे कामे एकाच कंत्रादाराकडे आहे त्या नुसार अमरावती शहरामध्ये याच प्रकारे एकच कंत्राटदार नियुक्त करून त्यांचे कडून सदर कामे करून घेण्याचा मानस आहे.

4. सदर कामाकरिता मनपा स्तरावर मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली स्वच्छता व्यवस्थापन समिती तयार करून त्यांचे मार्गदर्शनात संपूर्ण निविदाप्रक्रिया राबविण्यात येत आहे. वरील कामाकरिता नव्या निविदेद्वारे दीर्घकालीन कार्यक्षम संस्था ७ वर्षाचे कालावधीकरिता कंत्राटदार नियुक्त करण्याचा स्वच्छता व्यवस्थापन निर्णय घेतल्यामुळे, त्याबाबत स्वच्छता व्यवस्थापन समितीने संपूर्ण प्रस्तावित निविदा अटी,शर्ती व निविदेच्या अनुषंगाने सर्व Documents अवलोकन करून सदर कामाच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया करण्याबाबत ठरविले.
5. विद्यमान कंत्राटाच्या अनुषंगाने दैनंदिन कचरा उचलणारे कंत्राटदार मे. पूजा कन्ट्रक्शन कंपनी यांचे शहरातील प्रभागातून जमा झालेला दैनंदिन कच-याची वाहतूक मनपाच्या प्रक्रिया केंद्र, सुकळी येथे नेणे, सदर चे कंत्राट कामे सन २०१७ पासून सुरु आहे. सन २०१७ मध्ये सदर कामाच्या अनुषंगाने रु. ९.०० कोटीची वार्षिक तरतूद मनपाचे आर्थिक वर्षात करण्यात आलेली होती. परंतु सदर कामे हे वाहन तसेच यंत्र सामुग्रीच्या अनुषंगाने असल्यामुळे व सदर कंत्राटकामाला आर्थिक वार्षिक दर वाढ CSR नुसार लागू असल्यामुळे, सदर कामाकरिता विद्यमान रु.११.०० कोटी आर्थिक वार्षिक तरतूद करण्यात आलेली आहे.
6. तसेच विद्यमान पाचही झोन चे दैनंदिन साफसफाई,दैनंदिन घराघरातून कचरा संकलित करून मनपाच्या Collection सेन्टर नेवून टाकणे, सार्वजनिक शौचालयाची साफसफाई करणे इत्यादी कामाकरिता रु.२४.०० कोटी आर्थिक वार्षिक कायम ठेवण्यात आलेली आहे.
7. वरील प्रमाणे वार्षिक एकूण ३५.०० कोटी गृहीत धरून, वार्षिक ₹ 35.00 कोटी कंत्राट रक्कमेची निविदा काढण्याचे स्वच्छता व्यवस्थापन समितीमध्ये झालेल्या निर्णयानुसार नवीन कंत्राटदार नियुक्त करण्याचे अनुषंगाने निविदा प्रक्रिया प्रस्तावित करण्यात करण्यात आलेली आहे.
8. त्यानुसार निविदा प्रक्रिया आधुनिक, पारदर्शक व गुणात्मक प्रणाली राबविण्यासाठी तांत्रिक व आर्थिक निविदा पद्धत (70:30 Weightage System) QCBS system अवलंबली आहे. सदर कामाकरिता ऑनलाईन पद्धतीने शासनाचे Mahatender.gov.in पोर्टलवर दि. ०८/१०/२०२५ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली असून सदर निविदा हि खालील कामाकरिता बोलाविण्यात आलेली आहे त्यानुसार निविदा प्रक्रिया आधुनिक, पारदर्शक व गुणात्मक प्रणाली राबविण्यासाठी तांत्रिक व आर्थिक निविदा पद्धत (70:30 Weightage System) QCBS system अवलंबली आहे. सदर कामाकरिता ऑनलाईन पद्धतीने शासनाचे Mahatender.gov.in पोर्टलवर दि. ०८/१०/२०२५ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली असून सदर निविदा हि खालील कामाकरिता बोलाविण्यात आलेली आहे

| Part | Scope Description | Remarks / Definition |
|---|---|---|
| Part A – Obligatory Scope | Collection and transportation of Solid Waste (SWM) from secondary waste points such as Transfer Stations, Large Bins, GVPs, etc., located in the respective zones under Amravati Municipal Corporation (AMC), to the existing processing and treatment facility at **Akoli/Sukali Compost Depot**. | This is the **regular and mandatory operational scope** to be carried out under the contract. |
| Part B – Contingency Scope | Primary waste collection which involves **door-to-door collection** from **residential, commercial, and institutional regions, cleaning of public toilets and urinals,** and **desilting of drains** within the respective zones under AMC, **including the scope of Part A** as stated above. | Contingency scope is defined as the **anticipated scope of work** that may arise **due to cancellation of existing contracts, refusal by the current service provider to continue,** or **termination of existing primary waste collection arrangements** for any reason. |

(सदर कामामध्ये डास निर्मूलन मोहीम च्या अनुषंगाने कोणतेही कामे तसेच Construction & Demolition हे कामे सदर निविदेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले नाही.)

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ४ निविदाधारकांनी सदर कामाच्या अनुषंगाने सहभाग दर्शविलेला आहे.

| क्र. | कंपनीचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| 1 | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड | उल्हासनगर |
| 2 | मे. R & B इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड | मुंबई |
| 3 | मे. अर्बन एन्व्हायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड | नागपूर |
| 4 | मे. पी. गोपीनाथ रेड्डी प्रोप्रिट्रिक्स – पी. कविता | बंगलोर |

४ ही निविदा धारकाला दि. ०४/११/२०२५ रोजी तांत्रिक प्रझेंटेशन करण्याकरिता बोलविण्यात आलेले आहे.

1. मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, उल्हासनगर
2. मे. R & B इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड मुंबई व
3. मे. अर्बन एन्व्हायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड नागपूर
4. तर मे. पी. गोपीनाथ रेड्डी प्रोप्रिट्रिक्स – पी. कविता यांनीनी दि. 06/11/2025 समितीसमोर आपले प्रेझेंटेशन सादर केले.

निविदेच्या अनुषंगाने सर्व चारही निविदाधारकांचे इव्हॅल्युएशन (Evaluation), निविदाधारकांचे प्रेझेंटेशन पाहता निविदा छाननी समिती व खालीलप्रमाणे छाननी निष्कर्ष काढलेले आहे.

मे. R & B इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड मुंबई या संस्थेकडे निविदा अटी व शर्ती नुसार १५० वाहने १५०० Kg GVW क्षमतेचे आवश्यक होते तेवढी वाहने उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्यांचे कडे १५० वाहनांपैकी फक्त १४७ वाहने आहेत. त्यामुळे निविदाधारकाला अपात्र घोषित करण्याचे निविदा छाननी समितीचे एकमत झाले.

उर्वरित तीन संस्था –

| क्र. | कंपनीचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| 1 | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड | उल्हासनगर |
| 2 | मे. अर्बन एन्व्हायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड | नागपूर |
| 3 | मे. पी. गोपीनाथ रेड्डी (प्रोप्रिट्रिक्स – पी. कविता) | बंगलोर |

यांच्या तांत्रिक कागदपत्रांची छाननी केल्यानंतर सर्व निकषांची पूर्तता होत असल्याचे आढळून आले असून, समितीने त्यांना तांत्रिकदृष्ट्या पात्र (Technically Qualified) घोषित केले आहे.

तिन्ही पात्र निविदादारांना तांत्रिक मूल्यमापनात 70 Mark पेक्षा अधिक गुण प्राप्त झाल्यामुळे, त्यांच्या आर्थिक निविदा (Financial Bids) उघडण्यास समितीने एकमताने मान्यता दिली आहे.

त्यानुसार दिनांक 10 नोव्हेंबर 2025 रोजी माननीय आयुक्त महोदय यांच्या अध्यक्षतेखाली निविदा छाननी समितीची बैठक आयुक्त कार्यालयात संपन्न झाली.

सदर बैठकीमध्ये सर्वप्रथम मे.पी.गोपीनाथ रेड्डी (प्रोप्रिट्रिक्स – पी. कविता) बंगलोर यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानुसार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड,उल्हासनगर यांचे कडे सलग 7 वर्षाचा अनुभव नसल्याबाबत तसेच त्यांचे वाहनाच्या RC हे त्या कंपनीच्या नांवावर नसून मे. कोणार्क ग्रीन Enviro लिमिटेड वर आहे तसेच वाहनांच्या RC वर कॉम्पॅक्टर वाहन लिहिलेले नसून त्यावर Truck tipper असे लिहलेले आहे त्या नुसार त्यांचे कागदपत्रांची पुन्हा तपासणीकरून सदर मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड,उल्हास नगर यांचे संबंधित कामाचे अनुभव हे 10 वर्षाचे आहे, तर निविदेच्या शुद्धिपत्रानुसार निविदाधारकाकडे स्वतःचे किंवा भाड्याने घेतलेले व वापरलेले वाहने आवश्यक आहे त्यानुसार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, उल्हासनगर या संस्थेनी मे. कोणार्क ग्रीन Enviro लिमिटेड या संस्थेसोबत SPV असल्याबाबत त्यांचे करारनामा असल्यामुळे त्यांची निविदा मान्य करण्यात आली तसेच त्यांचे कडे कॉम्पॅक्टर वाहनाचे RC वर Truck Tipper ची नोंद असल्यामुळे त्यांचे वाहन हे कॉम्पॅक्टर वाहन म्हणून सुरु असल्यामुळे त्यांचे फोटो मागविण्यात आले.

तसेच मे. R&B इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड यांच्या कडून ई-मेल द्वारे प्राप्त झालेल्या आक्षेपांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यांच्या आक्षेपपत्रामध्ये नमूद बाब

1. मे.पी.गोपीनाथ रेड्डी (प्रोप्रिट्रिक्स – पी. कविता) बंगलोर यांनी ब्लॅंक टेंडर फॉर्म भरले त्या वर मे.पी.गोपीनाथ रेड्डी (प्रोप्रिट्रिक्स – पी. कविता) बंगलोर यांना मनपाच्या वतीने कॅलरीफिकेशन पाठविण्यात आले असता मे.पी.गोपीनाथ

रेड्डी (प्रोप्रिट्रिक्स – पी. कविता) बंगलोर यांनी त्यांचे सर्व कागदपत्रे हे ऑनलाइन तसेच ऑफलाईन पद्धतीने सादर केले होते त्यांचे लेटर हेड वर निविदा भरून दिली त्यामुळे त्यांचा मुद्दा निकाली काढण्यात आला.

2. मे. अर्बन एन्व्हायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड, नागपूर वर आक्षेप ,जयपूर महानगर पालिकेमध्ये त्यांचे door to door चे कामे फक्त transfer stations पर्यंत आहे त्यानुसार जयपूर महानगर पालिकाचे डम्पिंग साईट पर्यंत वाहतुकीचे अनुभव प्रमाणपत्राची तपासणी करण्यात आली व मुद्दा निकाली काढण्यात आला.

3. मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ,उल्हासनगर यांचे कडे सलग सात वर्षाचा अनुभव नसल्याबाबत तसेच त्यांचे वाहनाच्या RC हे त्या कंपनीच्या नांवावर नसून मे. कोणार्क ग्रीन Enviro लिमिटेड वर आहे तसेच वाहनांच्या RC वर कॉम्पॅक्टर वाहन लिहिलेले नसून त्यावर Truck tipper असे लिहलेले आहे त्या नुसार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ,उल्हासनगर यांचे कागदपत्रांची पुन्हा तपासणीकरून सदर मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड,उल्हास नगर यांचे संबंधित कामाचे अनुभव हे १० वर्षाचे आहे तर निविदेच्या शुद्धिपत्रानुसार निविदाधारकाकडे स्वतःचे किंवा भाड्याने घेतलेले व वापरलेले वाहने आवश्यक आहे त्यानुसार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, उल्हासनगर या संस्थेनी मे. कोणार्क ग्रीन Enviro लिमिटेड या संस्थे सोबत SPV असल्याबाबत त्यांचे करारनामा असल्यामुळे मुद्दा निकाली काढण्यात आला.

वरील प्रमाणे निविदा छाननी समिती ने सर्व कागदपत्रांची समितीमार्फत पुनर्तपासणी करण्यात आली. तपासणीअंती समितीने असे नमूद केले की, यापूर्वी करण्यात आलेली कागदपत्रांची तपासणी व्यवस्थित व नियमबद्ध आहे, तसेच सादर केलेले आक्षेप ग्राह्य धरण्यासारखे नाहीत.त्यामुळे दोन्ही निविदाधारकांचे आक्षेप समितीमार्फत फेटाळण्यात आले.

यानंतर समितीने सर्व पात्र निविदाधारकांच्या तांत्रिक पात्रतेचा पुनरावलोकन करून, तिन्ही निविदाधारक (१) मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, उल्हासनगर, मुंबई, (२) मे.पी.गोपीनाथ रेड्डी (प्रोप्रिट्रिक्स – पी. कविता) व (३) मे. अर्बन एन्व्हायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड, नागपूर हे तांत्रिकदृष्ट्या पात्र असल्याचे निश्चित केले.

वरीलप्रमाणे तीनही निविदाधारक पात्र असल्याचे समितीने ठरविले असल्यामुळे, दि. १०/११/२०२५ रोजी दराबाबत त्यांची निविदा उघडण्यात आली प्रस्तावांनुसार खालीलप्रमाणे निविदा दरांची तुलना करण्यात आली आहे.

Summary of Technical Score

| Sr No | Name of Bidder | Technical Marks | Technical Score |
|---|---|---|---|
| a | M/s. Konark Infrastructure Limited | 96.10 | 69.85 |
| b | M/s P. Gopinatha Reddy Proprietrix P Kavitha | 96.30 | 70.00 |
| c | M/s Urban Enviro Waste | 94.80 | 68.91 |

| | | | |
|---|---|---|---|
| | Management Limited | | |

| Sr No | Name of Bidder | Financial Quote | | Total | Financial Score |
|---|---|---|---|---|---|
| | | Part A | Part B | Part A + Part B | |
| 1 | M/s. Konark Infrastructure Limited | 1260 | 4140 | 5400 | 30.00 |
| 2 | M/s P. Gopinatha Reddy Proprietrix P Kavitha | 1378 | 6449 | 7827 | 20.70 |
| 3 | M/s Urban Enviro Waste Management Limited | 1449 | 5904 | 7353 | 22.03 |

| Sr No | Name of Bidder | Technical Score | Financial Score | Total score |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Konark Infrastructure Limited | 69.85 | 30.00 | 99.85 |
| 2 | M/s P. Gopinatha Reddy Proprietrix P Kavitha | 70.00 | 20.70 | 90.70 |
| 3 | M/s Urban Enviro Waste Management Limited | 68.91 | 22.03 | 90.94 |

तांत्रिक व आर्थिक गुणांचे एकत्रित मूल्यांकन करून तयार केलेल्या स्कोअर नुसार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, उल्हासनगर यांचा एकूण स्कोअर सर्वाधिक असल्यामुळे तसेच तसेच पार्ट A व पार्ट B च्या सर्वात कमी दर असल्यामुळे निविदा छाननी समितीने सर्वानुमते सदर संस्थेला काम देण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

सदर कामाचा कंत्राटाचा कालावधी सात (07) वर्षांचा असून, सदर निविदाप्रक्रिया विद्यमान सुरु असलेल्या कंत्राट रक्कमेच्या वार्षिक रु. ३५.०० कोटी रक्कमेची जरी राबविण्यात आली असली सदर कंत्राटांमध्ये आवश्यक मनुष्यबळ तसेच आधुनिक वाहन व साधनसामुग्रीचा अभाव आढळून आला त्या मुळे स्वच्छतेचे कामे प्रभावित झाले, त्याअर्थी नव्या कंत्राटदादारकडे प्रभागातील स्वच्छेतेचे कामे करण्यांकरिता खालील प्रमाणे आवश्यक मनुष्यबळ, आधुनिक वाहने व साधनसामुग्री राहणार आहे.

| PART-A | Secondary Collection & Transportation | | | |
|---|---|---|---|---|
| Sr No | Machine/Equipment | Nos | Manpower | Nos |
| 1 | Refuse compactor 14 Cum | 12 | 1 Driver+ 1 Helper | 24 |
| 2 | Trucks with minimum GVW 8 Ton | 10 | 1 Driver+ 1 Helper | 20 |
| 3 | JCB Machines | 5 | 1 Driver+ 1 Helper | 10 |
| | Total | 27 | | 54 |

| PART-B | Primary And Secondary Collection & Transportation | | | |
|---|---|---|---|---|
| Sr No | Machine/Equipment | Nos | Manpower | Nos |
| 1 | Auto Tipper min GVW 1500 kg for Door to Door | 220 | 1 Driver+ 1 Helper | 440 |
| 2 | Hydraulic Auto min GVW 1500 kg Or TATA 407 for Drain silt cleaning | 44 | 1 Driver+ 1 Helper | 88 |
| 3 | Hand Cart | 220 | 1 helper | 220 |
| 4 | Pocklaine for service lane and major nallah cleaning | 5 | 1 driver | 5 |
| 5 | Tractor with trailer | 2 | 1 Driver+ 1 Helper | 4 |
| 6 | | | 20 workers per ward | 440 |
| 7 | Refuse compactor 14 Cum | 12 | 1 Driver+ 1 Helper | 24 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | Trucks with minimum GVW 8 Ton | 10 | 1 Driver+ 1 Helper | 20 |
| 9 | JCB Machines | 5 | 1 Driver+ 1 Helper | 10 |
| | Total | 518 | | 1251 |

त्याकरिता वार्षिक खर्च अंदाजे रु. ४०.०० कोटी व एकूण ७ वर्षकरिता रु. २८०.०० कोटी अपेक्षित असू शकते, त्या करिता प्रतिवर्ष रु.४०.०० कोटीची तरतूद आर्थिक वर्षात करावी लागेल व सदर कंत्राटाच्या अनुषंगाने येणारा खर्च हे मनपा लेखाशीर्ष क्र. 147 – दैनंदिन साफसफाई व शौचालय व्यवस्था /मनपा लेखाशिर्ष क्र.१५६ दैनंदिन कचरा उचलणे किंवा शासनाकडून प्राप्त होणाऱ्या वित्त आयोग निधी मधून करावे लागेल. याबाबत निविदा छाननी / पर्चेसिंग समिती समितीने सर्वानुमते निर्णय घेतलेला असून सदर प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीकरिता मा. स्थायी समितीकडे करारनामा करण्यात पाठिण्यात यावे याबाबत निविदा छाननी / पर्चेसिंग समिती मंजुरी दिलेली आहे.

तरी कृपया सदर विषयाचे अनुषंगाने मे. कोणार्क इन्फ्रास्टक्चर लिमिटेड मुंबई यांचे सोबत महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (क) नुसार संबंधित निविदाधारकांसोबत करारनामा करण्याकरिता, मा.आयुक्त, मनपा अमरावती यांचे दि. /११/२०२५ च्या मंजुरी नुसार, उपरोक्त विषयांकित टिपणीमधील (part A) मंजुर करण्यात येत आहे.

परंतु सद्यस्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर विषय सर्वसाधारण सभेचे मान्यतेकरीता पाठविण्यात यावा असे ही सभा ठरवित आहे.

-स्वा-

(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)

आयुक्त तथा प्रशासक,

महानगरपालिका अमरावती

## <u>दिनांक ०६/११/२०२५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचा कार्यवृत्तांत</u>

अमरावती महानगरपालिका स्थायी समिती सभा दिनांक ०६/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता मा.आयुक्त यांचे कक्षालगतचे सभागृहात मा. प्रशासक यांचे अध्यक्षतेत आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस अति. आयुक्त -२, सहा. संचालक नगर रचना यांचे प्रतिनिधी, नगरसचिव शहर अभियंता, उपअभियंता विद्युत विभाग, पशुशल्यचिकित्सक, उपस्थित होते.

**<u>विषय क्रमांक ६२१ -</u>** मागील स्थायी समिती सभा दिनांक २७/१०/२०२५ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे बाबत.

आयुक्त – सदर कार्यवृत्तांत मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक ६२१ -</u>** मागील स्थायी समिती सभा दिनांक २७/१०/२०२५ रोजीचे कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम

**<u>विषय क्रमांक ६२२ -</u>** केंद्र शासन पुरूस्कृत पी. एम. ई. बस सेवा प्रकल्पाच्या 33 केव्ही आणि 0.44 केव्ही बाह्यविद्युतीकरण करणे या कामाकरीता सर्वात कमी दराचे कंत्राटदार यांचेशी महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम, 1949 चे कलम 73 (क) अन्वये करारनामा करण्याबाबत.

सदर विषय उपअभियंता प्रकाश विभाग यांनी मांडला. आयुक्त – सदर विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक ६२२ -</u>** केंद्र शासन पुरूस्कृत पी.एम. ई. बस सेवा प्रकल्पाच्या 33 केव्ही आणि 0.44 केव्ही बाह्यविद्युतीकरण करणे या कामाकरीता ई-निविदा सुचना क्र.अमनपा/प्रवि/शअ/762/25 दि. 24/07/2025 अन्वये WWW.Mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. 24/07/2025 ला ऑनलाईन प्रसिध्द करण्यात आली तसेच सदर निविदा सुचना दि. 25/07/2025 च्या दैनिक भास्कर, दैनिक हिंदुस्थान, दैनिक नवलोकयात्रा व साप्ताहीक विदर्भ मतदार या वृत्तपत्रातून रितसर प्रसिध्द झाली.

या कामाचे निविदा मुल्य रूपये 3,03,99,042/- आहे. सदर कामाचा खर्च पी. एम. ई बस प्रकल्प व मनपा इमारतीची विद्युत व्यवस्था, विजेचे दिवे, खिळण्या खरेदी आणि दुरूस्ती खर्च 2025-2026 या लेखाशिर्षा अंतर्गत आहे. निविदा सुचनेनुसार दिनांक 31/07/2025 ला सदर कामाकरीता एकूण तीन कंत्राटदाराच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर प्राप्त तीन्ही निविदा दिनाक 13/08/2025 ला निविदा छानणी समिती समोर ऑनलाईन उघडण्यात आली असून तांत्रीक लिफाफा क्रमांक 01 (Technical Bid) मधील कागदपत्राची छाननी करण्यात आली. सर्व कागदपत्रे योग्य असल्याने मा.आयुक्त यांच्या मंजुरीनुसार दिनांक 04/09/2025 ला सदर निविदेच्या दराचा आर्थिक लिफाफा क्रमांक 02 (Financial Bid) उघडण्यात आला. कंत्राटदारांनी दिलेले निविदा दर खालीलप्रमाणे आहेत.

1) मे. भारत इन्फ्रास्ट्रक्चर, अमरावती 6.77% कमी.

2) मे. ए. जे. इलेक्ट्रीकल, अकोला 1.12% कमी.

3) मे. रॉयल इलेक्ट्रीकल वर्क्स, ठाणे 5.00% कमी.

मा. उपायुक्त (2) यांच्या आदेशान्वये सदर कामाच्या निविदा दराबाबत कंत्राटदार मे.भारत इन्फ्रास्ट्रक्चर, अमरावती यांच्याशी दिनांक 29/09/2025 ला वाटाघाटी करण्यात आली. वाटाघाटीत कंत्राटदारानी त्यांचा निविदेचा दर पुन्हा 0.23% नो कमी केला असुन वाटाघाटीअंती त्यांच्या निविदेचा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 07.00% कमी आहे. त्यास मा. आयुक्त यांनी दिनांक 12/10/2025 ला मंजुरी दिलेली आहे.

सबब विषयांकीत कामाकरीता सर्वात कमी दर असलेले निविदाकार मे. भारत इन्फ्रास्ट्रक्चर, अमरावती यांचेशी महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम, 1949 चे कलम 73 (क) अन्वये करारनामा करण्यास मंजुरी मिळणे करिता विषय स्थायी समिती सभेसमोर सादर करण्यात आला आहे. परंतु सद्यस्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम

**<u>विषय क्रमांक ६२३</u>** - अमनपा क्षेत्रातील झोन 1,2,3,4 व 5 अंतर्गत म.रा.वि.वि. कंपनीच्या व मनपाच्या खांबावरील असलेले एल.ई.डी. पथदीवे देखभाल दुरूस्तीचे देनदीन कामाकरीता एक वर्षाचा दरकरार करणे या कामाकरीता सर्वात कमी दराचे कंत्राटदार यांचेशी महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम, 1949 चे कलम 73 (क) अन्वये करारनामा करण्याबाबत.

सदर विषय उपअभियंता, प्रकाश विभाग यांनी मांडला. आयुक्त – सदर विषयाची निविदा प्रक्रियेस विलंब झाल्याने सदर विषय रद्द करण्यात येत आहे. पुढील आठवड्यात यासंदर्भात बैठक आयोजित करावी.

**<u>विषय क्रमांक ६२४</u>**- मौजा बडनेरा येथील सर्व्हे नं. ३१७ पार्ट (श्रध्दा कॉलणी) व मौजा बडनेरा सर्व्हे नं. ३१५ पार्ट च ३१७ पार्ट गुरुछाया कॉलणी या अभिन्यासा मधील सार्वजनिक वापराच्या जागेमध्ये मनपा, तर्फे बांधण्यात आलेली इमारत ध्यान, योग, साधना, सत्संग, आरोग्य व इतर सामाजिक कार्यक्रमा करिता सभागृह वापरा व व्यवस्थे करीता देणे बाबत.

सदर विषय सहा. संचालक नगर रचना यांचे प्रतिनिधी यांनी मांडला. आयुक्त – सदर विषया संदर्भात संपुर्ण प्रक्रिया करण्यात आली आहे काय? सहा. संचालक नगर रचना यांचे प्रतिनिधी- सदर विषया संदर्भात संपुर्ण प्रक्रिया करण्यात आली असून तपासण्यात आली आहे. नगरसचिव – सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ५१, दि. १६/८/२०१९च्या ठरावान्वये प्रक्रिया करण्यात आलेली आहे. आयुक्त – सदर विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक</u>** ६२४ - मौजा बडनेरा येथील सर्व्हे नं. ३१७ पार्ट (श्रध्दा कॉलणी) व मौजा बडनेरा सर्व्हे नं. ३१५ पार्ट व ३१७ पार्ट गुरुछाया कॉलणी या अभिन्यासा मधील सार्वजनिक वापराच्या जागेमध्ये महानगरपालिके कडुन इमारती चे बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर इमारत अध्यक्ष/सचिव, श्री. गणेश दत्त

शिव हनुमान ध्यान व सत्संग मंडळ, ट्रस्ट गुरुछाया कॉलणी साईनगर परिसर, अमरावती (रजि.नं. ६-९६७) यांनी ध्यान, योग, साधना, सत्संग, आरोग्य व इतर सामाजिक कार्यक्रमाकरिता सभागृहाच्या वापरा करीता तथा व्यवस्थे करीता मागणी केलेली आहे.

१) अभिन्यासा मधील सार्वजनिक वापराच्या जागेवर घोषीत झोपडपट्टी क्षेत्रात बांधण्यात आलेल्या मनपा, कडे वर्ग असलेल्या इमारती व्यवस्थे करीता नोंदणीकृत संस्थेस देणे संबंधातील धोरणास सर्वसाधारण सभा ठराव क. ५१ दि. १६/८/२०१९ अन्वये मंजुर आहे. या मंजुर धोरणा प्रमाणे प्रकरणाची छानणी प्रशासना कडून करण्यात आलेली आहे. सदर प्रकरण मंजुर धोरणा प्रमाणे अनुज्ञेय आहे.

२) सदर अभिन्यासातील भुखंड धारकांच्या हरकती संबंधात जाहीर सुचना दै. देशोन्नती व अपना महाविदर्भ अमरावती मध्ये दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ ला प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच अर्जदार संस्थेने जाहीर सुचनेचे प्लेक्स प्रस्तावित इमारतीच्या दर्शनिय भागात लावुन प्रसिध्द केलेला आहे. विहित मुदतीस कुठलीही हरकत प्राप्त झालेली नाही.

३) मंजुर धोरणा प्रमाणे करारनामा ०३ वर्षाकरीता करण्याचे प्रस्तावित आहे.

४) सदर विद्यमान इमारतीचे बांधकाम क्षेत्र. ११९.७० चौ.मी. (१२८७.०० चौ. फुट) आहे. मंजुर धोरणा प्रमाणे सदर इमारतीने नाममात्र वार्षिक भाडे रु. १०००/- प्रती वर्ष आकारण्यात येत आहे.

५) संबंधीत परिसरा मधील भुखंडधारकांची लेखी संमती पत्र (नॉटरी) सादर केलेली आहे.

सदर प्रकरणी नाममात्र वर्षीक भाडे रु.१०००/- प्रती वर्ष आकारणी करुन परवानगी देण्याच्या प्रस्तावास स्थायी समितीची मान्यता घेणे संबंधात मा.आयुक्त यांनी दि.०१/१०/२०२५ रोजीला मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय स्थायी समिती सभेसमोर सादर करण्यात आला आहे. परंतु सद्यस्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम

**विषय क्रमांक** ६२५- अमरावती महानगरपालिकेतील विविध विभागांकरीता अनुभवी तज्ज्ञ व्यक्ती / संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन Empanelment तयार करणेबाबत.

सदर विषय हा शहर अभियंता यांनी मांडला. आयुक्त – सदर विषया संदर्भातील प्रपोजल माझे कडे ७ दिवसाचे आत सादर करावे. सदर विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक** ६२५- अमरावती महानगरपालिकेतील बांधकाम, उद्यान, पाणीपुरवठा, विद्युत, यांत्रिकी, भांडार आणि अग्निशमन विभागातील रस्ते बांधकाम, नाली, सिडी वर्क, इमारत बांधकाम, स्थापत्य प्रकल्पाचे कामे, विद्युत संबंधित कामे, पाणीपुरवठा संबंधित कामे, यंत्र सामुग्री खरेदी करणे, इत्यादी कामे विभागा मार्फत केली जाते. महानगरपालिकेतील इतर अत्यावश्यक कामांचे अंदाजपत्रक/सविस्तर प्रकल्प अहवाल तयार

करणे, स्ट्रक्चरल डिझाइन, निविदा दस्ताऐवज तयार करण्यासाठी अनुभवी तज्ञ व्यक्ती/संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन Empanelment ची निवड करण्यात आली आहे.

विभागातील कामांची वर्गवारी करण्याकरीता तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना अदा करावयाचे मुल्य मा. आयुक्त यांनी खालीलप्रमाणे तक्त्यामध्ये नमुद केल्यानुसार निश्चित करण्यात आलेले आहे.

| Sr. No. | Company name Owner Name | Mobile No. | Company Address | Receiving Date | Experience |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Sudhir Dhotkar | 9820276093 | G-1, Shivdham Sector 2 Airoli Navi-Mumbai 400708 | 25/06/2025 | 40 Years |

1. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना देण्यात येणाऱ्या निविदा रक्कमेच्या (Schedule-B) खर्चाच्या 1.50 टक्के शुल्काचे विवरण व देयक वेळापत्रक

| अ.क्र. | विवरण | कालावधी | सल्लागार यांना दयावयाचे शुल्क % |
|---|---|---|---|
| 01. | महानगरपालिकेतील विभागांनी सांगितलेल्या कामानुसार स्थळ पाहणी करणे, कामाचे Drawings/Sections तयार करुन त्याना प्रथम विभागप्रमुखाची मान्यता घेणे, कामाचे मंजूर झालेल्या Drawings/Sections नुसारच अंदाजपत्रक तयार करणे | कमाल 07 दिवस | 05% |
| 02. | अंदाजपत्रक संबंधित यंत्रणे कडुन मंजूर करुन घेणे, मंजूर अंदाजपत्रकाच्या कामांचे निविदा दस्ताऐवज तयार करुन देणे, निविदा प्रक्रिया राबविणे व निविदा अंतिम करुन देणे | कमाल 15 दिवस (निविदा प्रक्रियेचे वगळून) | 05% |
| 03. | कामाचा कार्यारंभ आदेश कंत्राटदारास दिल्यानंतर कामाचे स्थळावर किमान तीन वेळा प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करणे व कामाच्या गुणवत्ते बाबत अहवाल कंत्राटदराच्या देयका सोबत जोडणे, | कार्यारंभ आदेशाच्या कालावधी नुसार | 80% प्रत्येक R.A. बिलानुसार एकुण रक्कमेच्या प्रमाणात देय राहतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | कामाचे देयके तयार करण्यास अभियंतास मदत करणे. कामाच्या अंतिम देयकाच्या वेळी देय रक्कम देण्यात येईल. | | |
| 04. | संबंधित अभियंता कडुन काम पूर्ण झाल्याचे व काम समाधानकारक झाले असल्याचा दाखला मिळविल्यानंतर | | 10% |

2. प्राप्त आवेदनातून अनुभवी तज्ञांचे पॅनल तयार करण्यात आलेले आहे. कोणत्या प्रकल्प सल्लागार कोणत्या अंदाजपत्रक करण्यास द्यावयाचे त्याचा पूर्ण अधिकार मा.आयुक्त यांचे कडे राखीव राहील याबाबत कोणाचेही काहीही म्हणणे राहणार नाही.

वरील प्रमाणे कामाचे स्वरुप व सेवा शुल्क राहणार आहे. यांना मा. आयुक्त यांनी दिनांक 09.10.2025 रोजी मंजुरी दिल्याप्रमाणे अनुभवी तज्ञ व्यक्ती/संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांशी करारनामा करण्यास मंजुरीस्तव विषय सादर करण्यात आला आहे. परंतु सद्यस्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम

**<u>विषय क्रमांक</u>** ६२६ - महानगरपलिका मध्यवर्ती राजापेठ डेपो येथील जमा निरुपयोगी भंगार साहित्याची ई-लिलावाव्दारे विल्हेवाट लावण्या बाबत.

संदर्भ: 1. ई-ऑक्शन निविदा क्र. अमनपा/ वा. वि./श. अभि/381/25 दिनांक 24/09/25.

2. मा. आयुक्त यांचे दि. 01/11/2025 रोजीचे प्रशासकिय मंजुरीनुसार.

सदर विषय शहर अभियंता यांनी

मांडला. आयुक्त सदर विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक</u>** ६२६ - उपरोक्त विषयांकीत "महानगरपलिका मध्यवर्ती राजापेठ डेपो येथील जमा निरुपयोगी भंगार साहीत्वाची ई-लिलावाव्दारे विल्हेवाट लावण्याबाबत कामाची निविदा ई-ऑक्शन निविदा प्रणालीव्दारे प्रसिद्ध करण्यात आली. सदर ई- ऑक्शन निविदा मंजुरी ही निविदेमध्ये प्रस्ताचित दरावर बोली लावुन जमा निरुपयोगी विल्हेवाट लावणे या प्रणालीनुसार प्रसिद्ध करण्यात आली असुन त्यानुसार खालील प्रमाणे प्राप्त निविदेकरीता खालीलप्रमाणे बोली दर प्राप्त झालेले आहेत.

| LOT NO | Description of Material | Approx City | UOM | Estimated Rate Approved | Rate quoted in E-auction | Name of party | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | MS LIGHT (TABLE, CHAIR, RACK, SHEGDI, | 22 | MT | 32,000 | 38,000 | MJ TRADERS | H1 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | PIPES, BENCH etc) | | | | | | |
| 3 | PLASTC SCRAP (CHAIR, DRUMS, CRATES, BENCH, FAN etc) | 6 | MT | 12,000 | 20,200 | ZAHID TRADING CO | H1 |
| 4 | WOODEN SCRAP (CHAIR, TABLE, CUPBOARD, BENCH , COUNTER etc) | 7 | MT | 12,000 | 20,100 | ZAHID TRADING CO | H1 |

उपरोक्त प्राप्त निविदा धारक यांचे बोली दरानुसार MS LIGHT करीता MJ TRADERS यांचे बोली दर तसेच PLASTC SCRAP व WOODEN SCRAP करीता ZAHID TRADING CO यांचे बोली दर सर्वात जास्त असल्याने MJ TRADERS व ZAHID TRADING CO यांची ई-ऑक्शन बोली दर मंजुर करुन कंत्राटदारासोबत सदर कामाचा करारनामा करण्यास सदर्हु विषय सादर करण्यात आला आहे. परंतु सद्यस्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम

**विषय क्रमांक** ६२७ - कोंडवाडा विभागाअंतर्गत मोकाट जनावरे पकडणे झोन क्र. २.३ व ४ Tender ID-2025 AMC-1220109-1 ई-निवीदा मंजुर करुन करारनामा करणेबाबत.

संदर्भः- मा. आयुक्त यांचे दि. १६/१०/२०२५ रोजीचे मंजुरी आदेशान्वये

सदर विषय पशुशल्यचिकित्सक यांनी मांडला. आयुक्त – सदर विषयासंदर्भातील दर, दैनदिन वाहन किलोमिटर बाबत शहानिशा करावी. तसेच झोन निहाय पथक निर्मीती करुन वाहन व मनुष्यबळ वाढविणे बाबत चर्चा करावी. शहरात मोकाट जनावरांची संख्या वाढत असून त्यावर नियंत्रण ठेवावे. आयुक्त – सदर विषय स्थगीत ठेवण्यात येत आहे.

-स्वा-

(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)

आयुक्त तथा प्रशासक,

महानगरपालिका अमरावती

<u>दिनांक 27.10.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत.</u>

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे सोमवार दिनांक 27.10.2025 रोजी सकाळी 11 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. आयुक्त तथा प्रशासक, मुख्यलेखापरिक्षक, उपअभियंता, विधी अधिकारी, नगरसचिव व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. आयुक्त तथा प्रशासक यांनी वेळेवरील 1 विषय आजचे सभेमध्ये चर्चेकरीता घेण्यात येत असल्याचे सांगितले.

<u>विषय क्रमांक 616</u> - मागिल सभा दि.30.09.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृतांत वाचून कायम करणे.

<u>ठराव क्रमांक 616</u> - मागिल सभा दि.30.09.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृतांत वाचून कायम केले.

<u>विषय क्रमांक 617</u> – सन 2015-16 ते सन 2021-22 या कालावधीचे सहाय्यक संचालक नगर रचना

विभागाचे अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल अवलोकनार्थ सादर करण्याबाबत.

मुख्यलेखापरिक्षक - सहा.संचालक नगर रचना अधिकारी यांनी उपरोक्त विषयांकित कालावधिचा अनुपालन अहवाल देण्यात यावा. आयुक्त तथा प्रशासक - सन 2015-16 ते सन 2021-22 या कालावधीचे सहाय्यक संचालक नगर रचना यांनी विभागाचे अंतर्गत लेखापरीक्षण अनुपालन अहवाल देण्यात यावा. विषय मंजुर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक 617 – सन 2015-16 ते सन 2021-22 या कालावधीचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 105 व 106 अन्वये मुख्यालेखापरीक्षक,लेखापरीक्षण विभाग, महानगरपालिका अमरावती यांचे नियंत्रणाखाली सन 2015-16 ते सन 2021-22 या कालावधीचे सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अंतर्गत लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे.

सदर लेखापरीक्षण अहवालाचे अवलोकन करुन संबंधीत विभागाने अनुपालन अहवाल देण्यात यावा असे निर्देश देण्यात येत आहे. परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समितींनी सदर अहवालाचे अवलोकन केले.

विषय क्रमांक 618 - दि.02.09.2025 ते दि.26.09. 2025 या कालावधीमध्ये लेखापरीक्षण विभागाने अमरावती महानगरपालीका मधील लेख्यांची साप्ताहिक छाननी बाबतचे साप्ताहिक अहवाल सादर करण्याबाबत.

मुख्यलेखापरिक्षक यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक - विषय मंजुर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक 618 - उपरोक्त विषयास अनुसरून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 (सुधारित 2016 ) चे कलम 105 व 106 अन्वये महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परीक्षक यांनी लेख्यांची साप्ताहीक छाननी व तपासणी करून साप्ताहिक अहवाल स्थायी समिती समक्ष सादर करण्याबाबत नमूद आहे.

| अ.क्र. | साप्ताहिक अहवालाचा कालावधी |
|---|---|
| 1. | दि.02.09.2025 ते दि.04.09. 2025 |
| 2. | दि.08.09.2025 ते दि.12.09. 2025 |
| 3. | दि.15.09.2025 ते दि.19.09. 2025 |
| 4. | दि.22.09.2025 ते दि.26.09. 2025 |

त्यास अनुसरून लेखापरीक्षण विभागाने दि.02.09.2025 ते दि.26.09.2025 रोजी केलेल्या लेख्यांची साप्ताहिक तपासणी बाबतचा अहवाल सोबत संलग्न आहे.

आयुक्त तथा प्रशासक स्थायी समितींचे अवलोकनार्थ सादर करण्यात आला. परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समितींनी सदर अहवालाचे अवलोकन केले.

विषय क्रमांक 619 – providing and supplying customized ready to use software for Digitization of construction and work management.

उपअभियंता (बांधकाम) यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 619</u> –** उपरोक्त विषयांकित ‘‘providing and supplying customized ready to use software for Digitization of construction and work management’’ कामाची निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे बोलविण्यात आली. सदर ई-निविदा मंजुरी ही गुण प्रणालीनुसार व टक्के वारी नुसार (percentage rate )असून त्यानुसार खालील प्रमाणे प्राप्त निविदा उघडण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | आर्थिक दर | तांत्रिक गुण | Final score |
|---|---|---|---|---|
| 1. | M/s innomise technologies Pvt.Ltd. | 0.190%कमी | 68 | 88 |
| 2. | icon infoline Pvt. Ltd. | 0.210%जास्त | 32 | 50 |

उपरोक्त प्राप्त निविदा धारक M/s innomise technologies Pvt.Ltd. यांचा Final score सर्वात जास्त म्हणजेच 88 असल्याने मा.आयुक्त यांनी दि.09.10.2025 रोजी मंजुरी प्रदान केलेली आहे.

करीता M/s innomise technologies Pvt.Ltd यांची ई-निविदा मंजूर करून कंत्राटदारासोबत सदर कामाचा करारनामा करारनामा करण्यास परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

**(वेळेवरील विषय)**

**<u>विषय क्रमांक 620</u> -** कलम 481 म.म.अधिनियम अन्वये पॅनल विधीज्ञ यांचे ठराव क्र 39. दि. 30/06/2022 अन्वये ठरविण्यात आलेल्या मानधन बाबत.स्थायी समिती सभा दिनांक 30.06.2022 ठराव क्र.39 मध्ये दुरुस्ती करण्याबाबत.

विधी अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 620</u> -** उपरोक्त विषयांन्वये सादर करण्यात येते की, महानगरपालिका संबंधीत विविध न्यायालयीन प्रकरणांची देयके अदा करण्याकरीता कलम 481 म.म.अधिनियम अन्वये पॅनल विधीज्ञ यांचे ठराव क्र 39. दि.30/06/2022 अन्वये मानधन / दरपत्रक ठरविण्यात आलेले आहे. परंतु सदर दरपत्रकामध्ये न्यायालयीन दर नमुद नसल्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होते. म्हणुन सदर दरपत्रकामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ते खालीलप्रमाणे.

1. सदर ठराव / दरपत्रकातील परीशिष्ठ अ मधील अट / अनुक्रमांक 5 खालीलप्रमाणे.

"5. विशेष दिवाणी दावे, भुसंपादन प्रकरण, विकासात्मक व आर्थीक बाबींशी संबंधीत दावे रु 15000/-"

वरील न्यायालयीन प्रकरणातील संवर्गामध्ये दिवाणी औद्योगिक / कामगार न्यायालयातील अवमान प्रकरण (Contempt matter) समाविष्ठ करणे आवश्यक आहे ते खालीलप्रमाणे.

"5. विशेष दिवाणी दावे, भूसंपादन प्रकरण, विकासात्मक, दिवाणी / औद्योगिक /कामगार न्यायालयातील अवमान प्रकरण (Contempt matter) व आर्थीक बाबींशी संबंधीत दावे रु 15000/-"

2. सदर ठराव / दरपत्रकातील परीशिष्ठ अ मधील अट / अनुक्रमांक 11 खालीलप्रमाणे.

"11. अनुक्रमांक 1 ते 10 मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, जिल्हा व सत्र न्यायालय व इतर प्राधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या व दाखल करावयाच्या न्यायालयीन प्रकरणात

दाव्यांचे महत्व व आवश्यकता तपासुन जेष्ठ विधीज्ञांची नियुक्ती व त्यांना फी / मानधन अदा करण्याचे अधिकार कलम 481 नुसार मा. आयुक्त यांना राहील."

सदर अटीमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

"11. अनुक्रमांक 1 ते 10 मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, जिल्हा व सत्र न्यायालय व इतर प्राधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या व दाखल करावयाच्या न्यायालयीन प्रकरणात दाव्यांचे महत्व वः आवश्यकता तपासुन पॅनल व्यतीरीक्त जेष्ठ विधीज्ञांची नियुक्ती व त्यांना फी । मानधन अदा करण्याचे अधिकार कलम 481 नुसार मा. आयुक्त यांना राहील."

3. सदर ठराव / दरपत्रकामध्ये सर्वोच्च न्यायालय येथील अधिवक्ता यांचे दर / मानधन बाबत नमुद करण्यात आलेले नाही, म्हणुन याबाबत खालीलप्रमाणे अट समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

10 अ) सर्वोच्च न्यायलय अपील / विशेष अनुमती / फेरविचार याचीका प्रकरणे - रु 1,25,000/- (सर्व खर्चासह जसे-कार्यालयीन / टंकलेखन / भाषांतरण)

4. दैनंदिन न्यायालयीन प्रकरणामध्ये पॅनल अधिवक्ता नियुक्ती विधी विभागाद्वारे करण्यात येते. परंतु याबाबत सदर ठरावामध्ये नियुक्तीबाबतचे अधिकार बाबत नमुद नाही. म्हणुन खालीलप्रमाणे अट समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

12. दैनंदिन न्यायालयीन प्रकरणामध्ये न्यायालीयन प्रकरणाचे स्वरुप / महत्व पाहता पॅनल अधिवक्ता नियुक्ती बाबतचे अधिकार विधी अधिकारी / विधी विभागास राहील.

स्थायी समिती सभा दिनांक 30.06.2022 ठराव क्र.39 मध्ये वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्याबाबत मा.आयुक्त यांचे दि.24/10/2025 रोजीचे मंजुरीनुसार दुरुस्ती करण्यास परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

-स्वा-
(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक,
महानगरपालिका अमरावती

<u>दिनांक 30.09.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत.</u>

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे मंगळवार दिनांक 30.09.2025 रोजी सकाळी 11 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. आयुक्त तथा प्रशासक, अतिरिक्त आयुक्त (2), उपायुक्त (2 व 3), मुख्यलेखाधिकारी, मुख्यलेखापरिक्षक, शहर अभियंता, उपअभियंता (कार्यशाळा), उपअभियंता (प्रकाश विभाग), शिक्षणाधिकारी, नगरसचिव व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. आयुक्त तथा प्रशासक यांनी वेळेवरील 4 विषय आजचे सभेमध्ये चर्चेकरीता घेण्यात येत असल्याचे सांगितले.

<u>विषय क्रमांक 608</u> - मागील सभा दि.08.09.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृतांत वाचून कायम करणे.

<u>ठराव क्रमांक 608</u> - मागील सभा दि.08.09.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृतांत वाचून कायम करण्यात आले.

**(मागील सभेतील स्थगीत विषय क्रमांक 599 व 607)**

<u>विषय क्रमांक 599</u> - जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत–नागरी दलीतेत्तर वस्त्यांमध्ये कार्यक्रम शीर्षा अंतर्गत अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामे करणे या कामाचे कंत्राटदार शुभम गिरी यांचेशी करारनामा करण्याचे मंजुरी बाबत.

आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहेत.

<u>ठराव क्रमांक 599</u> – जिल्हा वार्षिक योजना सन 2024 -25 अंतर्गत –नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये कार्यक्रम शीर्षा अंतर्गत अमनपा क्षेत्रातील विकास कामे करणे या मंजुर कामाची ई-निविदा दि.11.06.2025 ला उघडण्यात आली होती.या मध्ये खालील प्रमाणे कंत्राटदार यांनी दर सादर केले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत | कंत्राटदाराचे नाव | सर्वात कमी दराचे कंत्राटदार |
|---|---|---|---|---|
| 01. | प्रभाग क्र.13,अंबापेठ मधील हिंदू स्मशानभूमी जवळ श्रीनाथवाडी नाल्याची संरक्षण भिंत बांधणे. | 2924651 | 1.सलीम खान हसन खान-15.00% कमी<br>2.मे.आशा कन्स्ट्रक्शन 32.999% कमी<br>3 शुभम गिरी -35.786 %कमी<br>4.प्रदीप मालवीय –27.550%कमी<br>5.न्यू बालाजी कन्स्ट्रक्शन-32.999 % कमी | शुभम गिरी 35.786 % कमी |

शुभम गिरी यांना मा.आयुक्त यांनी दि.22.07.2025 रोजी मंजुरी दिल्या प्रमाणे कंत्राटदाराशी कामाचा करारनामा करण्यास, परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

<u>विषय क्रमांक 607</u> - महानगरपालिकेच्या 63 शाळांच्या किरकोळ वार्षीक दुरुस्ती करार करणे. (5 वेळ)

शहर अभियंता – शाळेच्या किरकोळ दुरुस्तीचा विषय होता. 63 शाळांची दुरुस्ती करावयाची आहे. त्या शाळेंची यादी तयार करण्यात आलेली आहे. आयुक्त तथा प्रशासक - दरकरारमध्ये कोणकोणती कामे घेतली त्याची यादी लावावी. शहरी आरोग्य केंद्राचे यादी तयार असल्याचे आरोग्य अधिकारी यांनी सांगितले आहे. दिव्यांगाकरीता ETC सेंटरचे दुरुस्तीचे कामे व शहरी आरोग्य केंद्राच्या दुरुस्ती सुध्दा या दरकरारामध्ये कराव्यात. विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 607</u> - महानगरपालिकेच्या 63 शाळांच्या किरकोळ वार्षीक दुरुस्ती करार करणेबाबतचे काम लेखाशिर्ष नविन शाळा बांधकाम दुरुस्ती व देखभाल अंतर्गत निधिमधुन प्रस्तावित असुन कामाची निविदा रक्कम रु.95,06,835 /- आहे. सदर कामाची ई-निविदा प्रणालीद्वारे बोलविण्यात आली असता खालीलप्रमाणे प्राप्त निविदा उघडण्यात आल्या.

| कंत्राटदाराचे नांव | | दर |
|---|---|---|
| 1) झिया खान | - | 0.99 टक्के कमी |

उपरोक्त प्राप्त निविदाधारक झिया खान कंत्राटदार यांचे निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.99 टक्के कमी असल्याने शहर अभियंता यांचे सोबत दिनांक 27.06.2025 रोजी झालेल्या वाटाघाटी अंती 1.05 टक्के कमी दर असल्याने मा.आयुक्त यांनी दिनांक 07.08.2025 ला मंजुरी प्रदान केलेली आहे. करीता झिया खान यांची निविदा मंजुर करुन कंत्राटदारासोबत सदर कामाचा करारनामा करण्यास मंजुरी प्रदान करण्याबाबत, सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे. तसेच शहरी आरोग्य केंद्र व दिव्यांगाकरीता असलेले ETC सेंटरचे दुरुस्तीची कामे या दरकराराअंतर्गत करावीत असे ठरविण्यात येत आहे.

**(या सभेकरीता प्राप्त विषय)**

<u>विषय क्रमांक 609</u> –दि.28.07.2025 ते दि.29.08.2025 या कालावधी मध्ये लेखापरीक्षण विभागाने अमरावती महानगरपालिका मधील लेख्यांची साप्ताहिक छाननी बाबत चे साप्ताहिक अहवाल सादर करणे बाबत.

मुख्यलेखापरिक्षक यांनी टिपणी वाचुन दाखविली. दि.28.07.2025 ते दि.29.08.2025 या कालावधी मध्ये लेखापरीक्षण विभागाने अमरावती महानगरपालिका मधील लेख्यांची साप्ताहिक छाननी बाबत चे साप्ताहिक अहवाल सादर करण्यात आलेले आहे. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 609</u> – उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ (सुधारीत २०१६) चे कलम १०५ व १०६ अन्वये महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरिक्षक यांनी लेख्यांची साप्ताहीक छाननी व तपासणी करुन साप्ताहीक अहवाल स्थायी समीती समक्ष सादर करण्याबाबत नमुद आहे.

| अनु क्र. | साप्ताहिक अहवालाचा कालावधी |
|---|---|
| 1. | दि.28/07/2025 ते दि.01/08/2025 |
| 2. | दि.04/08/2025 ते दि.08/08/2025 |
| 3. | दि.11/08/2025 ते दि.14/08/2025 |
| 4. | दि.18/08/2025 ते दि.22/08/2025 |
| 5. | दि.25/08/2025 ते दि.29/08/2025 |

त्यास अनुसरुन लेखापरिक्षण विभागाने , दि.28.07.2025 ते दि.29.08.2025 रोजी केलेल्या लेख्यांचे साप्ताहीक तपासणीबाबतचा अहवाल सोबत संलग्न आहे. आयुक्त तथा प्रशासक स्थायी समितींचे अवलोकनार्थ सादर

करण्यात आला. परंतु सद्यास्थितीत  स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समितींनी सदर अहवालाचे अवलोकन केले.

<u>विषय क्रमांक 610</u> – केंद्र शासन पुरुस्कृत पी.एम.ई.बस सेवा प्रकल्पाच्या विद्युत व्यवस्थेकरीता अमरावती महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत बडनेरा रोड येथील म.रा.वि.वि.कंपनीची एच.टी.ओव्हर हेड लाईन स्थलांतरित करणे या कामाकरिता सर्वात कमी दराचे कंत्राटदार यांचेशी महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम,1949 चे कलम 73 (क) अन्वये करारनामा करण्याबाबत.

उपअभियंता (कार्यशाळा) यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 610</u> – केंद्र शासन पुरूस्कृत पी. एम. ई. बस सेवा प्रकल्पाच्या विद्युत व्यवस्थेकरीता अमरावती महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत बडनेरा रोड येथील म.रा. वि. वि. कंपनीची एच. टी. ओव्हर हेड लाईन स्थलांतरीत करणे या कामाकरीता ई-निविदा सूचना क्रमांक अमनपा/प्रवि/शअ/756/2025 दिनाक 22/07/2025 अन्वये WWW. Mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनाक 22/07/2025 ला ऑनलाईन प्रसिध्द करण्यात आली तसेच सदर निविदा सुचना दिनाक 23/07/2025 च्या दैनिक नवभारत व दैनिक अमरावती दर्शन या वृत्तपत्रातून रितसर प्रसिध्द झाली.

या कामाचे निविदा मुल्य रूपये 65,80,557/- आहे. सदर कामाचा खर्च रस्त्यावरील विद्युत खांब हटविणे 2025-2026 या लेखाशिर्षाअंतर्गत आहे. निविदा सुचनेनुसार दिनांक 29/07/2025 ला सदर कामाकरीता एकूण तीन कंत्राटदाराच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर प्राप्त तीन्ही निविदा दिनाक 31/07/2025 ला निविदा छानणी समितीसमोर ऑनलाईन उघडण्यात आली असुन तांत्रीक लिफाफा क्रमांक 01 (Technical Bid) मधील कागदपत्राची छानणी करण्यात आली सर्व कागदपत्रे योग्य असल्याने मा.उपायुक्त (2) तसेच निविदा छानणी समिति यांच्या मंजुरीनुसार दिनांक 19/08/2025 ला सदर निविदेच्या दराचा आर्थीक लिफाफा क्रमांक 02 (Financial Bid) उघडण्यात आला. कंत्राटदारांनी दिलेले निविदा दर खालीलप्रमाणे आहेत.

1) मे. भारत इन्फ्रास्ट्रक्चर, अमरावती 9.73% कमी.

2) मे. रॉयल इलेक्ट्रीकल वर्क्स  ठाणे 05.00% कमी.

3) मे. जगनाडे इलेक्ट्रीकल्स्, पुणे 11.00% कमी.

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे. जगनाडे इलेक्ट्रीकल्स्, पुणे यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.00% कमी दराची आहे. त्यास मा. आयुक्त यांनी दिनांक 11/09/2025 ला मंजुरी दिलेली आहे.

सबब विषयांकीत कामाकरीता सर्वात कमी दर असलेले निविदाकार मे. जगनाडे इलेक्ट्रीकल्स्, पुणे यांचेशी महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम, 1949 चे कलम 73 (क) अन्वये करारनामा करण्यास परंतु सद्यास्थितीत  स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

**(वेळेवरील विषय)**

<u>विषय क्रमांक 611</u>– अमरावती महानगरपालिकेतील भंगार वाहनांच्या विक्री बाबत.

उपअभियंता (कार्यशाळा) यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 611</u>– अमरावती महानगरपालिकेतील विविध विभागात कार्यरत एकूण १५ वाहनांचे ऑक्शन महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार तसेच मा.परिवहन आयुक्त यांचे दि.२४/१०/२०२४ रोजीचे पत्रानुसार धातु भंगार व्यापार महामंडळाच्या संस्था (MSTC) यांचेकडून दिनांक १९/०८/२०२५ रोजी ऑनलाइन द्वारे करण्यात आले. यामध्ये खालीलप्रमाणे लॉटनिहाय यशस्वी निविदाधारकांचे नाव व दर नमूद आहेत.

| लॉट नं. | वाहनाचे विवरण | RTO यांचेकडून प्राप्त Upset Price | प्राप्त दर | अभिकर्ताचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | Hyundai Verna<br>१.एमएच २७ एए ७००७ | ९०,०००/- | २५,०००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| २. | Toyota Etios<br>१.एमएच २७ एए ०६५० | ७५,०००/- | २५,०००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| ३. | Toyota Etios<br>१.एमएच २७ एए ०७२० | ७०,०००/- | २५,०००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| ४. | Honda City<br>१.एमएच २७ एए ८००८ | २६,०००/- | २५,०००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| ५. | Hydraulic Auto<br>१.एमएच २७ एए ५१८७ | १४,०००/- | १५,५००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| ६. | Hydraulic Auto<br>१.एमएच २७ एए ५१८९ | १५,०००/- | १५,५००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| ७. | Hydraulic Auto<br>१.एमएच २७ एए ५२२५ | १४,०००/- | १५,५००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| ८. | Hydraulic Auto<br>१.एमएच २७ एए ५२८१ | १५,०००/- | १५,५००/- | Re Vahaan Recyclers Pvt.Ltd. |
| ९. | Hydraulic Auto<br>१.एमएच २७ एए ५२४८ | १५,०००/- | १५,५००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| १०. | Hydraulic Auto<br>१.एमएच २७ पी २३५५ | १५,०००/- | १५,५००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| ११. | Hydraulic Auto<br>१.एमएच २७ एए ५२३३ | १५,०००/- | १५,५००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| १२. | Hydraulic Auto<br>१.एमएच २७ एए ५२६२ | १५,०००/- | १५,५००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| १३. | Mini Rescue Van<br>१.एमएच २७ एए ५१६९ | १,५०,०००/- | १,००,०००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | Mini Rescue Van<br>१.एमएच २७ एक्स ६९५३ | ३,००,०००/- | १,००,०००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| १५. | Mini Rescue Van<br>१.एमएच २७ एए ५२३९ | २,२५,०००/- | १,००,०००/- | Re Vahaan Recyclers Pvt. Ltd. |
| | एकुण | १०,५४,०००/- | ५,२४,०००/- | |

वरील तकत्यामध्ये नमूद असलेले लॉट क्रमांक ५ ते १२ चे यशस्वी निविदाधारकांचे दर प्रादेशिक परिवहन विभाग, अमरावती यांनी ठरवून दिलेल्या विक्री मूल्य दरापेक्षा जास्त आहेत. तसेच लॉट क्रमांक १ ते ४ व १३ ते १५ चे प्राप्त दर प्रादेशिक परिवहन विभाग, अमरावती यांनी ठरवून दिलेल्या विक्री मूल्य दरापेक्षा कमी असल्याने त्यांचे दर मंजूर करता येणार नाही.

त्यामुळे लॉट क्रमांक ५ ते १२ मधिल वाहने वरील तक्त्यामध्ये प्राप्त दरामध्ये संबंधित अभिकर्ता यांस विक्री करणेकरीता तसेच लॉट क्रमांक १ ते ४ व १३ ते १५ चे पुनःश्च ई-ऑक्शन करणेकरिता मा. आयुक्त महोदय, यांनी दि.२६/०९/२०२५ रोजी मान्यता प्रदान केली असून नियमाप्रमाणे किमतीचा भरणा करून सदर वाहने संबंधितास देण्यासंदर्भातच्या प्रस्तावास,परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

<u>विषय क्रमांक 612</u> – महानगरपालिकेतील शाळेतील विदयार्थ्यांना बसण्याकरीता डेक्स –बेन्च उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळण्याबाबत.

शिक्षणाधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 612</u> – उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका अंतर्गत एकुण 63 शाळा आहेत. महानगरपालिकेतील शाळेची पटसंख्येमध्ये वाढ होत असल्यामुळे विदयार्थ्यांना बसण्याकरीता डेक्स-बेंच उपलब्ध करुन देण्यास बाबतची टिपणी प्रस्तवित करुन निविदा राबविण्यात आली असुन ७ निविदा प्राप्त झाल्या असुन त्यापैकी २ निविदा धारक पात्र ठरले होते. १) साई ईच्छा एन्टरप्राईजेस २) सोमनाथ टेडींग कॉरपोरेशन या दोन्ही निविदा धारकांचे डेक्स-बेंच चे नमुन्याची पाहणी केली असता सोमनाथ टेडींग कॉरपोरेशन चे तुलनेत साई ईच्छा एन्टरप्राईजेस यांचे डेक्स-बेंच उत्तम असल्यामुळे L1 साई ईच्छा एन्टरप्राईजेस यांच्याकडुन पुरवठा करण्यास मा.आयुक्त यांनी दिनांक १४/०९/२०२२ रोजी मंजुरी प्रदान केली.

सदर साई इच्छा एन्टरप्राईजेस, नाशिक यांच्याकडुन वर्ग०१ ते ०५ करीता डेक्स-बेंच खरेदी खर्च रुपये १,१८,१०,७५०/- लेखाशिर्ष २५२ प्राथमिक शाळा दर्जावाढ व सोई सुविधा मधुन करण्यात येणार असुन सदर देयक अदा करण्यापुर्वी प्रथम विषय स्थायी समितचे मान्यतेकरीता ठेवण्यात आलेला आहे. परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

<u>विषय क्रमांक 613</u> – अमरावती महानगरपालिका क्षेत्रा करिता "कुल रुफ उपनियम २०२५" लागू करण्या बाबत.

सहा.नगररचना अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक - "कुल रुफ उपनियम २०२५" हे अमरावती महानगरपालिका क्षेत्राकरीता लागु करण्याबाबतचा विषय स्थायी समितीमध्ये मंजुर करण्यात येत असुन सदर ठराव अंतिम मान्यतेकरीता सर्वसाधारण सभेत पाठविण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 613** – १) प्रस्तावना:

अमरावती शहर, महाराष्ट्राच्या उष्ण आणि कोरड्या हवामानाच्या झोनमध्ये स्थित, जलद शहरीकरण आणि जास्त बांधकाम घनतेमुळे वाढत्या तापमानाचा आणि सततच्या उष्णतेच्या ताणाचा सामना करत आहे. २०२४ च्या उन्हाळयात केलेल्या लँड सरफेस टेम्परेचर (LST) मॅपिंगनुसार, शहरातील काही भागांमध्ये पृष्ठभाग तापमान ५३.७०८ °C पर्यंत नोंदले गेले, तर धातूच्या छत असलेल्या भागांमध्ये तापमान सतत ४७°C पेक्षा जास्त राहिले.

या प्रवृत्तीनुसार, छत, रस्ते, आणि शहरी पृष्ठभाग उष्णता शोषक बनत आहेत, ज्यामुळे वातावरणातील तापमान वाढते, थंडाव्याची मागणी वाढते, विजपुरवठ्यावर ताण येतो, शिखर मागणीची जोखीम वाढते आणि आरोग्य आपत्कालीन परिस्थिती निर्माण होते. यापैकी एक उपाय म्हणजे कूल रूप्स (Cool Roofs), जे सूर्यकिरणांचा काही भाग परावर्तित करून इमारतीतील उष्णता कमी करतात आणि अंतर्गत वातानुकूलनासाठी लागणारी ऊर्जा कमी करतात.

अमरावती महानगरपालिका क्षेत्राचा C40 या संस्थे मार्फत Remote Sensing या तंत्रज्ञाचा वापर करून वार्ड निहाय Heat Map तयार करण्यात आले होते. त्या मध्ये शहरातील विविध भागात अति तापमान मुळे Heat Island तयार होत असल्याचे निदर्शनास. शहरी भागातील इमारतीत तापमान वाढल्यामुळे सदर शहरी तापमान कमी करण्या करिता C40 या संस्थेने शहरातील विविध भागात जाऊन सर्वेक्षण करून अमरावती शहराचा Baseline Assessment Report (For Development of cool & green roof policy roadmap for Amravati city focusing on clean energy transition) तयार करून दिलेला आहे त्या अनुषंगाने शाश्वत शहरी विकास व स्वच्छ उर्जा संक्रमण सध्या करण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिका क्षेत्रात थंड छत नियमावली २०२५ लागू करण्याचा मानस आहे.

२] कुल रूफ परिभाषा (Cool Roof)

कूल रूफ (Cool Roof)" म्हणजे अशा प्रकारची छताची रचना किंवा पृष्ठभाग उपचार, ज्यामध्ये उच्च परावर्तकता (High Solar Reflectance) व उच्च उत्सर्जनक्षमता (High Thermal Emitance) असते. यामुळे सूर्यप्रकाशातील उष्णता शोषण कमी होऊन छताचे तापमान पारंपरिक छतांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी राहते. अशा छतामुळे इमारतीतील अंतर्गत उष्णभार (Heat Load) कमी होतो, वातानुकूलनासाठी लागणारी उर्जा बचत होते व शहरी उष्णता बेट परिणाम (Urban Heat Island Effect) कमी करतात. कूल रूफ्स ही उष्णतेशी लढण्यासाठी सर्वात सोपी आणि खर्च प्रभावी उपाययोजना आहेत. कूल रूफ्स पारंपरिक छतांच्या तुलनेत इमारतीतील आतल्या हवेचे तापमान २.१°C ते ४.३°C पर्यंत कमी ठेवू शकतात.

कूल रूप्सची अंमलबजावणी ऊर्जा बचत, उष्णता सवलत, आणि दीर्घकालीन थंडाव्याची मागणी कमी करण्यास मदत करते. छत हे इमारतीच्या बाह्य संरचनेचे महत्त्वाचे घटक असून, ते थेट इमारतीच्या ऊर्जा गरजा आणि रहिवाशांसाठी उष्णता सवलत सुनिश्चित करते.

३] कुल रूफ नियमावली लक्ष्य (Cool Roof Regulation)

अमरावती शहराच्या बांधकाम साठ्याचे तांत्रिक मूल्यमापन दर्शवते की, २०२५ मध्ये एकूण छत क्षेत्रफळ १४.९२ दशलक्ष चौ. मी. असेल, जे २०४१ पर्यंत २७.८ दशलक्ष चौ. मी. पर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. जर एकूण छत क्षेत्रफळाच्या ८०% भागावर कूल व ग्रीन रूफ्स लावले गेले, तर उष्णता- संबंधित वीज मागणी २३% ने कमी होऊ शकते, ज्यामुळे वार्षिक ऊर्जा बचत ३२ GWh होईल - जे शहराच्या अंदाजे १४१ GWh थंडाव्याशी संबंधित ऊर्जा वापराच्या तुलनेत महत्त्वपूर्ण आहे.

यामुळे, पुढील पाच वर्षांत २०३० पर्यंत सुमारे ५ चौ. किमी कूल रूफ क्षेत्र साध्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

४] अंमलबजावणी धोरण (Implementation Strategy)

अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये कूल रूफ नियमावली खालील प्रकारच्या इमारतींवर अंमलात आणल्या जाईल :

अ) अनिवार्य (Mandatory):

i)नवीन बांधकामे : सर्व शासकीय, व्यावसायिक, सार्वजनिक व निम-सार्वजनिक इमारतींसाठी कूल रूफ १००% अनिवार्य.

ii) नवीन निवासी सदनिका भूखंड क्षेत्र ५०० चौ.मी. पेक्षा जास्त असलेल्या सर्व निवासी व मिश्र इमारतींसाठी कुल रूफ १००% अनिवार्य.

iii) नवीन निवासी सदनिका : इमारत उंची '-१५.० मी. व त्या पेक्षा जास्त असलेले निवासी व मिश्र इमारतींसाठी कूल रूफ १००% अनिवार्य,

ब) ऐच्छिक (Optional):

i) छतावर सौर ऊर्जा प्रणाली लावलेल्या इमारती देखील उत्तम थर्मल आरामासाठी कूल रूफ स्वीकारू शकतात.

ii) विद्यमान शासकीय / सार्वजनिक इमारती (शाळा, रुग्णालय, सामुदायिक सभागृहे इत्यादी).

iii) खाजगी इमारती प्रोत्साहनात्मक धोरणाद्वारे (कर सवलत).

५] धोरणात्मक उपाय (Policy Measures)

अ) कायदेशीर / नियमक उपाय (Legal / Regulatory Measures)

i) बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र निर्गमनाच्या वेळी कुल/ग्रीन रूफची अट अनिवार्य करणे.

ii) भोगवटा प्रमाणपत्र प्रत्यक्ष कूल रूफ अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतरच निर्गमित केले जाईल.

iii) महानगरपालिका बांधकाम निविदांमध्ये कूल रूफ अटी अनिवार्य करणे.

ब) प्रोत्साहनात्मक उपाय (incentive Measures)

i) विद्यमान शासकीय / सार्वजनिक इमारती तमेच खाजगी इमारती मध्ये प्रोत्साहनात्मक कूल रूफ अंमलबजावणात्या इमारतीचे निश्चित निकषांनुसार मूल्यांकन केले जाईल, असा पात्र इमारतींना 'Climate Resilient Cool Roof Certificate' प्रदान केले जाईल.

ii) हे प्रमाणपत्र शाश्वत बांधकाम, हवामान प्रतिकारशक्ती आणि ऊर्जा कार्यक्षमतेचे अधिकृत मानक असेल.

iii) उक्त प्रमाण पत्र प्राप्त निवासी व विद्यमान शासकीय/ सार्वजनिक इमारती :मालमत्ता करात १०% सूट (सुरवातीचे ३ वर्षांसाठी).

vi. उक्त प्रमाण पत्र प्राप्त वाणिज्य / व्यवसायिक इमारती: मालमत्ता करात ५% सुट (सुरवातीचे ३ वर्षांसाठी).

६] तांत्रिक उपयोजना (Technical Measures)

खालील प्रमाणे पारंपारिक तंत्रज्ञान व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करुन कुल रूफ अंमलबजावणी करता येईल.

i) Reflective Coatings पांढरे/ हलके रंगाचे कोटिंग (अॅक्रेलिक, पॉलियुरेथेन इ.) १००% छतावर लावून सूर्यप्रकाश जास्तीत जास्त परावर्तित करणे व उष्णता कमी शोषणे, विद्यमान छतावर सहज लागू.

ii) Membrane-based Cool Roofs हलक्या रंगाचे सिंथेटिक पत्रे (PVC, TPO, EPDM): औद्योगिक / व्यावसायिक इमारती व मोठ्या हॉल्ससाठी योग्य, कमी देखभाल आवश्यक.

iii) Cool Roof Tiles / Shingles परावर्तक कोटिंग असलेले सिमेंट, माती किंवा इतर टाईल्स, निवासी क्षेत्रासाठी टिकाऊ आणि सौंदर्यपूर्ण,

Iv) Green Roofs (Vegetative Roofs) हिरवी छते म्हणजे छतावरील बागा जिथे इमारतीच्या पृष्ठभागावर झाडे लावली जातात ज्या मुळे वापरात नसलेल्या जागांना नैसर्गिक, जिवंत वातावरणात रुपांतरीत केले जाते. छताचे तापमान कमी करून, हवेची गुणवत्ता सुधारून आणि इमारतींना इन्सुलेशन प्रदान करून ते शहरांना थंड करण्यास मदत करतात.

१. एक्स्टेन्सिव्ह ग्रीन रूफ (Extensive Green Roofs)

उथळ (६०-२०० मिमी खोलीचे), वजन कमी (६०-१५० किरों/मी2)

खर्च कमी, कमी देखभाल व साध्या गवतासारख्या वनस्पतीसाठी योग्य.

२. सेमी-इंटेन्सिव्ह ग्रीन रूफ (Semi-intensive Green Roofs)

मध्यम खोलीचे (१२०-२५० मिमी), वजन जड (१२०-२५० किग्रॅ/मी²,)

मध्यम खर्च, विविध प्रकारच्या झुडपांसाठी व इतर वनस्पतींसाठी योग्य,

३. इंटेन्सिव्ह ग्रीन रूफ (Intensive Green Roofs)

सर्वात खोल (१५०-४०० मिमी), सर्वात जड (१८०-५०० किग्रॅ/मी² C)

सर्वाधिक खर्चिक, झुडपे व लहान झाडे लावण्यासाठी योग्य, परंतु देखभाल जास्त.

उष्ण आणि कोरडे हवामान असलेल्या शहरात (सरासरी उन्हाळी तापमान 40 °C ) एक्स्टेन्सिव्ह ग्रीन रूफने (Extensiv green roofs) सरासरी 5°C तर इंटेन्सिव्ह ग्रीन रूफने (intensive green roof) सरासरी 6.2 °C इतकी तापमान घट होते. त्याचबरोबर,अशा हवामानात एक्स्टेन्सिव्ह आणि इंटेन्सिव्ह ग्रीन रूफ प्रकार अनुक्रमे 17% आणि 23% उर्जा बचत करतात.

V) lime wash- पर्यावरणपूरक,कमी खर्चिक,सोप्या उपलब्धतेसाठी पर्याय (सार्वजनिक/व्यवसायिक/ औद्योगिक वापरासाठी शिफारसीय नाही.)

vi) ordinary white paint – निवासी छतासाठी साधा,कमी खर्चिक पर्याय.

<u>नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान (innovative cool roof technologies ):</u>

i)Modular Insulated Panels (Puff Panels) पूर्वनिर्मित, उच्च् उष्णता प्रतिरोधक, शैक्षणिक/ औद्योगिक/ व्यावसायिक इमारतींसाठी योग्य,

ii) Radiant Barriers (Aluminium Foll Sheets) - परावर्तक धातू पत्रे, विकिरण उष्णता रोखण्यासाठी.

iii) Wood Wool Panels लाकूड तंतू व सिमेंट पासून पर्यावरणपूरक इन्सुलेशन,

७) नोडल संस्था (Nodal Agency)

i) नगररचना विभाग / बांधकाम विभाग.

ii) सहभागी संस्थाः शासकीय कार्यालये, वीज वितरण संस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रेडाई संस्था, बांधकाम व्यावसायिक, स्वयंसेवी संस्था, नागरिक इत्यादी.

iii) निरीक्षणः वार्षिक ऊर्जा बचत (विद्युत विभाग) व पर्यावरणीय परिणाम मुल्यांकन (पर्यावरण विभाग)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कुल रूफ नियमावलीची उपविधी तयार करून अमरावती शहरा करिता कुल रूफ नियमावली उपविधी कार्यान्वीत करण्यात येत आहे.

सदर प्रशासकीय विषयास मा. आयुक्त यांनी दि.  /०९/२०२५ रोजीला मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, सदर विषय स्थायी समितीचे मान्यतेकरीता ठेवण्यात आलेला होता, परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत असुन सदर ठराव सर्वसाधारण सभेचे मान्यतेकरीता पाठविण्यात यावा असे ही प्रशासक स्थायी समिती ठरवित आहे.

<u>**विषय क्रमांक 614**</u> – महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 110 अन्वये घेण्यात आलेल्या गुंतवणुकीवरील Over Draft ला कार्यात्तर मंजुरी मिळणेबाबत.

मुख्यलेखाधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – केवळ आवश्यक त्या बाबींकरीताच निधी गरजेनुसार घ्यावा. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता सर्व सहा.आयुक्त व संबंधीत अतिरिक्त आयुक्त यांनी मालमत्ता कर वसुली करणे करीता कार्यवाही करावी. विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>**ठराव क्रमांक 614**</u> – श्री. नागरीक सेवा सहकारी संस्था यांनी त्यांची मागील नऊ महिन्याची झोन क्र.। व झोन क्र.5 ची देयके न मिळाल्यामुळे आज दिनांक 25/09/2025 रोजी वरील दोन्ही झोन मधील दैनदिन साफसफाई चे काम बंद केले होते. सद्यास्थितीत श्री. नागरीक सेवा सहकारी संस्थेचे प्राप्त देयकांपैकी झोन क्र.1 चे रु.1.80 कोटी व व झोन क्र.5 चे रु.1.80 कोटी थकीत आहेत तसेच इतर संस्थाची प्राप्त देयके मिळून साफसफाई चे एकुण रु.16.44 कोटींची देयके प्रलंबित आहेत.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता शहरातील स्वच्छतेचे, साफसफाईची कामे देयकांअभावी बंद झाल्यास गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. सद्यास्थितीत कर वसुली अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याने प्रलंबित देयके अदा करणे शक्य होत नाही. या संदर्भात आपणाशी झालेल्या चर्चेनुसार मनपाने केलेल्या एकुण रु.40.00 कोटी गुंतवणुकीवर (F.D.) Over Draft घेण्याबाबत सुचविण्यात आले. त्यानुसार वरील दैनदिन साफसफाईचे रु.16.44 कोटी व मनुष्यबळाचे प्राप्त देयकांचे रु.5.68 कोटी असे एकुण रु.22.00 कोटीचा Over Draft घेणे सद्यास्थितीत आवश्यक आहे.

त्यानुसार HDFC बँकेकडे विचारणा केली असता एकुण गुंतवणुकीच्या 95% पर्यंत Over Draft घेता येऊ शकतो. त्याकरीता व्याज FD + 0.3% राहील. त्यानुसार एकुण रु.38.00 कोटीची Over Draft मर्यादा मंजुर करुन घेता येईल. आवश्यकतेनुसार रक्कम काढता येईल, उपरोक्त Over Draft ची रक्कम लगतच्या कालावधीत वसुल होणाऱ्या कराच्या रकमेतुन लवकरात लवकर समायोजीत करता येईल जेणेकरुन व्याज कमी लागेल. त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली असुन सदर विषय स्थायी समितीचे कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवण्यात आलेला होता, परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती सदर विषयास कार्यात्तर मंजुरी प्रदान करीत आहे. तसेच सर्व सहा.आयुक्त व संबंधीत अतिरिक्त आयुक्त यांनी मालमत्ता थकीत कर वसुली संदर्भातील कार्यवाही जलद गतीने करावी.

<u>विषय क्रमांक 615</u> – अग्निशमन विभागामार्फत वितरीत करण्यात येत असलेले तात्पुरते आग संरक्षक मान्यता व नुतनीकरण ना-हरकत प्रमाणपत्र वर सुविधा शुल्क (Convenience Fee) आकारणी करण्याबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारित २०२३.

२) मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२३० दि.३०/०५/२०२५

२) मा.आयुक्त यांचे जा.क्र./अग्नि.वि./६८२/२०२४ दि.२९/११/२०२४ रोजीचे आदेश.

३) मा.आयुक्त यांचे दि. २३/०९/२०२५ रोजीच्या बैठकीमधील निर्देश.

<u>ठराव क्रमांक 615</u> – उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते, अमरावती महानगरपालिका कार्याक्षेत्रात हॉस्पिटल, निवासी इमारत, शिकवणी वर्ग, दुकाने, व्यावसायिक इमारत, वाणिज्य इमारत, शैक्षणिक इमारत व इतर वाणिज्य आस्थापनांना संदर्भीय क्र.१ अन्वये अग्निशमन यंत्रणा करून अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे बंधकारक आहे. त्यानुषंगाने संदर्भीय क्र.२ अन्वये मा.आयुक्त यांनी अमरावती महानगपालिका कार्यक्षेत्रातील सर्व आस्थापनांना अग्निशमन ना-हरकत बंधनकारक केले आहे.

अग्निशमन विभागामार्फत वितरीत करण्यात येत असलेले तात्पुरते आग संरक्षक मान्यता व नुतनीकरण ना-हरकत प्रमाणपत्र सर्व ऑनलाईन प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येतात. ऑनलाईन प्रणालीद्वारे सुविधा देण्याकरिता लागणारा खर्च हा खूप मोठ्या प्रमाणात असून अग्निशमन विभागामार्फत संदर्भीय क्र. १ व २ अन्वये फक्त तात्पुरते आग संरक्षक मान्यता शुल्क व नुतनीकरण ना-हरकत प्रमाणपत्र शुल्क वसूल करण्यात येत आहे. परंतु देण्यात येत असलेल्या सुविधेकरिता कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. अमरावती महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारत घेता सुविधा शुल्क (Convenience Fee) वसूल केल्यास अमरावती महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पण सुधारेल व नागरिकांना खूप चांगल्या प्रमाणात सुविधा पण उपलब्ध करून देता येतील.

सबब, संदर्भीय क्र.३ अन्वये मा.आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार तात्पुरते आग संरक्षक मान्यता करिता रु.५००/- व नुतनीकरण ना-हरकत प्रमाणपत्र करिता रु. २००/- सुविधा शुल्क (Convenience Fee) आकाराने उचित राहील. करिता सुविधा शुल्क (Convenience Fee) आकारणी करणेबाबत मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केली आहे.

परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

-स्वा-
(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक,
महानगरपालिका अमरावती

सिस्टिम मॅनेजर – ब्लॉकचेन प्रणालीद्वारे प्रमाणपत्र वितरणासंदर्भात कन्व्हेन्शन फी निश्चित करणेकरीता, संगणक विभागामार्फत सध्या नागरीकांना विविध प्रमाणपत्रे उपलब्ध करुन दिली जात आहेत. मा.मुख्यमंत्री यांच्या 150 दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत महानगरपालिकेमार्फत नागरीकांना प्रमाणपत्रे ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापपर करुन कशी उपलब्ध करुन देता येतील, यासाठी संबंधीत मार्किंग करण्यात आले होते. सध्या बाजार व परवाना, आणि फायर सर्टिफिकेट या सेवांचा ब्लॉकचेन प्रणालीमध्ये समावेश (इंटीग्रेशन) करण्यात आलेला आहे. याप्रमाणपत्राचे वितरण करतांना कन्व्हेन्शन फी म्हणुन संबंधीत शुल्क आकारण्यास मान्यता प्रदान करावी. ही विनंती. मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या निर्देशानुसार, प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र कन्व्हेन्शन फी निश्चित करण्यात यावी. तसेच उपायुक्त (2) यांनी संबंधीत विभागाकडुन त्यांच्या विषयासंबंधी कन्व्हेन्शन फीचा तपशील मागवुन सदर टिपणीसह एकत्रीत प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करावा.

<u>दिनांक 08.09.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत.</u>

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे सोमवार दिनांक 08.09.2025 रोजी सकाळी 10 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. आयुक्त तथा प्रशासक, मुख्यलेखापरिक्षक, शहर अभियंता, नगरसचिव व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

<u>विषय क्रमांक 601</u> - मागील सभा दिनांक 25/08/2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृतांत वाचुन कायम करणे.

आयुक्त तथा प्रशासक – विषय क्र.599 मध्ये, 35.786 % कमी टेंडर आलले आहे. इतके कमी कसे आलेले आहे याबाबत चर्चा करण्यात यावी असे निर्देश मागील सभेत देण्यात आलेले होते. शहर अभियंता – चर्चा करण्यात आलेली आहे. सभेचे चर्चेचे अनुषंगाने संबंधीत कंत्राटदाराकडुन खुलासा मागविण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 601</u> - मागील सभा दिनांक 25/08/2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृतांत वाचुन कायम केले.

<u>विषय क्रमांक 602</u> - महानगरपालिका मध्यवर्ती राजापेठ डेपो येथील जमा निरूपयोगी भंगार साहित्याची ई-लिलावाव्दारे विल्हेवाट लावण्याबाबत.

1.पत्र क्र. अमनपा /बांबी/श.अ.100/2025 ,दिनांक 06/06/2025

2.मे.ए.व्ही.शेवाळे ॲन्ड असोसिएट्स,पुणे यांचा ई-मेल REF.NO..4653 /AVS / M.A.- SCRAP/F.M.V.-R..P./2025 - 26 DATE 21/07/2025

शहर अभियंता यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – दर निश्चित करण्याकरीता त्याची व्हॅल्युएशन काढलेली आहे काय. शहर अभियंता – मध्यवर्ती राजापेठ डेपो येथे निरुपयोगी भंगार साहित्य व अतिक्रमण मध्ये जप्त केलेले टाकावु साहित्य आहे. त्याची विल्हेवाट करण्याकरीता लिलाव करण्यात येणार आहे. लोखंड, प्लास्टिक, लाकुड याचे वेगवेगळे मुल्यांकन मे.ए.व्ही.शेवाडे ॲन्ड असोसिएटस् , पुणे यांचेकडुन निश्चित करण्यात आलेले आहे. आयुक्त तथा प्रशासक – याचे टेंडर होणार आहे काय? शहर अभियंता – उपरोक्त नमुद साहित्यांचा हर्रास होणार आहे. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 602</u> - मा.आयुक्त यांचे दि.23/04/2025 रोजीचे मंजुरी नुसार महानगरपालिकेतील मध्यवर्ती राजापेठ डेपो येथील मांगील सन 2024-25 वर्षापासून निरुपयोगी भंगार साहित्य राजापेठ डेपो येथे जमा आहे. तसेच बाजार परवाना विभाग व अतिक्रमण विभागामार्फत अमरावती शहरात होत असलेल्या जप्ती व अतिक्रमण हटाव कार्यवाहीमुळे भरपूर प्रमाणात टाकाऊ साहित्य जमा आहे .तसेच भांडार विभागाकडून प्राप्त साहीत्य व आरोग्य विभागामधील निरुपयोगी कन्टेंनर इत्यादी साहित्याची वर्गवारी लोखंड, प्लास्टिक, लाकुड, याप्रमाणात करण्यात आलेली असून सदर साहीत्याचे मुल्यांकन मे.ए.व्ही.शेवाडे ॲन्ड असोसिएटस्, पुणे यांचेकडून करण्यात आलेले आहे. मुल्यांकनानुसार साहित्यांचे प्रतिकिलो दर खालीलप्रमाणे येत आहे.

| Sr. No. | Item | Estimated Scrap Rate in INR. (Per Kg.) | Remark |
|---|---|---|---|
| 1 | Heave Mild Steel. | 35/- | |
| 2 | Mild Steel | 32/- | |
| 3 | Plastic | 12/- | |
| 4 | Wood | 12/- | |

वरीलप्रमाणे प्रतिकीलो दरास मा. आयुक्त यांनी दि. 31/07/2025 रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. मान्यतेनुसार सदर साहीत्यांचे प्रमाण, परिमाण व अंदाजे किंमत याकरीता नेमण्यात आलेली पुणे महानगरपालिका व पिंपरीचिंचवड महानगरपालिका यांची पद्धती व इतर महानगरपलिका यांचा वापर करतात अशा क्षेत्रातील तज्ञ व पुणे व पिंपरीचिंचवड महानगरपालिकेचा अनुभव असलेले श्री शंकर रामचंद्र ऑक्शनर पुणे यांची ई-लिलाव करण्याकरीता मदत घ्यावयाची आहे. श्री शंकर रामचंद्र ऑक्शनर पुणे यांचे सोबत झालेल्या मुळ करारनाम्यानुसार त्यांचे शुल्क त्यांना देय राहील. सदर साहित्याच्या मुल्यानुसार वर्गवारी प्रमाणे ऑनलाईन विड तयार करुन देणार व तद्रनंतर बिडर अंतिम करणे व साहित्याची विक्री करणे याबाबी प्रामुख्याने नियमानुसार करुन देतील. सदर दर हे फक्त या ऑक्शन करीता म्हणजेच 2025-26 करीता लागू राहतील. परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

<u>विषय क्रमांक 603</u> - सहाय्यक आयुक्त झोन क्र.1 रामपुरी कॅम्प मनपा अमरावती येथील सन 2022 -23 ते 2023-24 या वित्तिय वर्षाचा महसुल जमेचा अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत.

मुख्यलेखापरिक्षक यांनी टिपणी वाचुन दाखविली. अहवाल सादर करण्यात आलेला आहे. आयुक्त तथा प्रशासक – अहवालाचे अवलोकन करण्यात आलेले असुन सदर लेखापरिक्षण अहवाल मान्यता देण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 603</u> - उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०५ व १०६ अन्वये महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त झोन क्र. १ रामपुरी कॅम्प येथील सन २०२२-२३ ते २०२३-२४ या कालावधीचे जमा बाजुचे अंतर्गत लेखापरिक्षणाची कार्यवाही करण्यात आली आहे. त्याबाबतचा अहवाल तयार करण्यात आलेला असुन टिपणीसोबत संलग्न करण्यात आलेला आहे. सदर अहवाल मा.आयुक्त तथा प्रशासक स्थायी समिती यांचेकडे अवलोकनार्थ व मान्यतेकरीता सादर करण्यात आला.

उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, सहाय्यक आयुक्त झोन क्र. १ रामपुरी कॅम्प येथील सन २०२२-२३ ते २०२३-२४ या कालावधीचे जमा बाजुचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे प्रशासक स्थायी समिती अहवालाचे अवलोकन करणेकरीता, परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणी व सोबत संलग्न अहवालाचे अवलोकन करुन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

<u>विषय क्रमांक 604</u> - सहाय्यक आयुक्त झोन क्र. 2 राजापेठ मनपा अमरावती येथील सन २०२२-२३ ते २०२३-२४ या वित्तिय वर्षाचा महसुल जमेचा अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत.

मुख्यलेखापरिक्षक यांनी टिपणी वाचुन दाखविली. अहवाल सादर करण्यात आलेला आहे. आयुक्त तथा प्रशासक – अहवालाचे अवलोकन करण्यात आलेले असुन सदर लेखापरिक्षण अहवाल मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 604** - उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 105 व 106 अन्वये महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त झोन क्र. 2 राजापेठ येथील सन २०२२-२३ ते २०२३-२४ या कालावधीचे जमा बाजुचे अंतर्गत लेखापरिक्षणाची कार्यवाही करण्यात आली आहे. त्याबाबतचा अहवाल तयार करण्यात आलेला असुन टिपणीसोबत संलग्न करण्यात आलेला आहे. सदर अहवाल मा.आयुक्त तथा प्रशासक स्थायी समिती यांचेकडे अवलोकनार्थ व मान्यतेकरीता सादर करण्यात आला.

उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, सहाय्यक आयुक्त झोन क्र. २ राजापेठ येथील सन २०२२-२३ ते २०२३-२४ या वित्तीय वर्षाचे महसुल जमेचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे प्रशासक स्थायी समिती अहवालाचे अवलोकन करणेकरीता, परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणी व सोबत संलग्न अहवालाचे अवलोकन करुन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक 605** - सहाय्यक आयुक्त झोन क्र. 5 भाजीबाजार मनपा अमरावती येथील सन 2020 -21 ते 2021-22 या वित्तिय वर्षाचा महसुल जमेचा अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत.

मुख्यलेखापरिक्षक यांनी टिपणी वाचुन दाखविली. अहवाल सादर करण्यात आलेला आहे. आयुक्त तथा प्रशासक – अहवालाचे अवलोकन करण्यात आलेले असुन सदर लेखापरिक्षण अहवाल मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 605** - उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 105 व 106 अन्वये महानगरपालिकेचे झोन क्र.5 भाजीबाजार येथील सन 2020-21 ते 2021-22 या कालावधीचे जमा बाजुचे अंतर्गत लेखापरिक्षणाची कार्यवाही कार्यवाही करण्यात आली आहे. त्याबाबतचा अहवाल तयार करण्यात आलेला असुन टिपणीसोबत संलग्न करण्यात आलेला आहे.

उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, सहाय्यक आयुक्त झोन क्र. 5 भाजीबाजार येथील सन 2020-21 ते 2021-22 या कालावधीचे जमा बाजुचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे प्रशासक स्थायी समिती अहवालाचे अवलोकन करणेकरीता, परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासनाने संबंधित विभागाकडे सन 2020 -21 ते 2021-22 या कालावधीचे जमा बाजुचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे प्रशासक स्थायी समिती अहवालाचे अवलोकन करणेकरीता, परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणी व सोबत संलग्न अहवालाचे अवलोकन करुन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मुख्यलेखापरिक्षक – अहवाल पाठविलेले आहे त्या अहवालामध्ये नमुद अनियमीतता तपासुन वसुलपात्र रकमा संबंधीतांकडुन वसुल करण्याबाबतची कार्यवाही संबंधीत विभागांनी करावी असे प्रस्तावित केली आहे. आयुक्त तथा प्रशासक – लेखापरिक्षण अहवालानुसार दर्शविण्यात आलेल्या अनियमीतता दुर करुन आवश्यक कार्यवाही संबंधीत विभागांनी करावी.

**विषय क्रमांक 606** - प्र.क्र 17 अंतर्गत न्यु गणेश कॉलनी येथे श्री.संतोष इंगोले ते श्री.मोहोड यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे. सदर कामास महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये करारनामा करण्यास मान्यता प्रदान करण्याबाबत.

शहर अभियंता यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – स्थायी समिती सभेमध्ये किती लक्ष रु.पर्यंत विषयास मान्यता दिली जाते. शहर अभियंता – 25 लक्ष रु.पेक्षा जास्त असलेले काम स्थायी समितीचे मान्यतेकरीता पाठविण्यात येते. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 606** - प्र.क्र 17 अंतर्गत न्यु गणेश कॉलनी येथे श्री.संतोष इंगोले ते श्री.मोहोड यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणेबाबतचे विषयाकिंत काम लेखाशिर्ष स्मशानभुमी सुधारणाअंतर्गत निधीमधुन प्रस्तावित असुन कामाची निविदा रक्कम रु.32,98,693 /- एवढी आहे. सदर कामाची ई-निविदा प्रणालीद्वारे बोलविण्यात आली असता खालीलप्रमाणे प्राप्त निविदा उघडण्यात आल्या.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दर |
|---|---|---|
| 1 | श्री.अमोल खडेकार | - 4.00 % कमी |
| 2 | श्री.प्रज्वल मेश्राम | अंदाजपत्रक दर |

उपरोक्त प्राप्त निविदाधारक श्री.अमोल खडेकार यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा – 4.00% कमी असल्याने मा.आयुक्त यांनी दि.26.07.2025 रोजी मंजुरी प्रदान केलेली आहे.

परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

**विषय क्रमांक 607** - महानगरपालिकेच्या 63 शाळांच्या किरकोळ वार्षीक दुरुस्ती करार करणे. (5 वेळ)

शहर अभियंता यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – एकुण 63 शाळांची किरकोळ दुरुस्तीची कामे आहे. ती कामे कशी घेतले. शहर अभियंता – मुख्याद्यापकांनी वेळोवेळी सुचविलेली कामे आहेत व सदर कामाची पाहणी अभियंता यांनी केलेली आहे. आयुक्त तथा प्रशासक – त्यामध्ये कोणकोणत्या कामाचा समावेश आहे. सदर कामे कोणत्या शाळेचे कोणते आहे व ते काम किती रुपयापर्यंत आहे. त्या कामाचे दरपत्रक, तुलनात्मक तक्ते, अशी संपुर्ण प्रॉपर प्रपोजलसह विषय पुढील सभेत ठेवण्यात यावा. विषय स्थगीत ठेवण्यात येत आहे.

**-स्वा-**

(सौम्या शर्मा- चांडक), भा.प्र.से.

आयुक्त तथा प्रशासक,

महानगरपालिका,अमरावती.

<u>दिनांक 25.08.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत</u>

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे सोमवार दिनांक 25.08.2025 रोजी सकाळी 11 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. आयुक्त तथा प्रशासक, मुख्यलेखापरिक्षक, शहर अभियंता, नगरसचिव व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

**<u>विषय क्रमांक 597</u>** - मागील सभा दिनांक 04/08/2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृतांत वाचुन कायम करणे.

मुख्यलेखापरिक्षक यांनी दि.04.08.2025 रोजीचे स्थायी समितीचे ठराव क्र.595 मध्ये दुरुस्ती करण्याबाबतचे पत्र दिलेले आहे. आयुक्त तथा प्रशासक – दुरुस्ती मान्य करण्यात येते.

**<u>ठराव क्रमांक 597</u>** - मागील सभा दिनांक 04/08/2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे ठराव क्र.595 मध्ये, “अभिलेख्याची पडताळणी ही या कार्यालयाचे लेखापथकाकडुन ऐवजी लेखापरिक्षण विभागाचे लेखापरिक्षण पथकाकडुन" करण्यात आली ही दुरुस्ती मान्य करण्यात येते.

**<u>विषय क्रमांक 598</u>** - दि.07.07.2025 ते दि.25.07.2025 या कालावाधी मध्ये लेखापरीक्षण विभागाने अमरावती महानगरपालिका मधील लेख्यांची साप्ताहिक छाननीबाबत चे साप्ताहिक अहवाल सादर करणेबाबत.

आयुक्त तथा प्रशासक – विभाग निहाय अहवाल सभेसमोर सादर ठेवण्यात आलेला नाही. मुख्यलेखापरिक्षक – दिनांक 07.07.2025 ते 25.07.2025 पर्यंतचा साप्ताहिक अहवाल आहे. आयुक्त तथा प्रशासक – सदर विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 598</u>** - उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 (सुधारीत 2016) चे कलम 105 व 106 अन्वये महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरिक्षक यांनी लेख्यांची साप्ताहीक छाननी व तपासणी करुन साप्ताहीक अहवाल स्थायी समीती समक्ष सादर करण्याबाबत नमुद आहे.

| अनु क्र. | साप्ताहिक अहवालाचा कालावधी |
|---|---|
| 1. | दि.07/07/2025 ते दि.11/07/2025 |
| 2. | दि.14/07/2025 ते दि.18/07/2025 |
| 3. | दि.21/07/2025 ते दि.25/07/2025 |

त्यास अनुसरुन लेखापरिक्षण विभागाने दि.07/07/2025 ते 25/07/2025रोजी केलेल्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी बाबतचा अहवाल सोबत संलग्न आहे. उपरोक्त प्रमाणे उल्लेखीत सदर अहवाल मुख्यलेखापरिक्षक यांनी प्रशासक स्थायी समितींचे अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला असुन सदर साप्ताहीक लेख्यांचे लेखापरिक्षण परंतु सद्यास्थितीत

स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासनाने संबंधित विभागाकडे अनुपालन अहवालाची मागणी करण्यास्तव नियमानुसार कारवाई करावी असे प्रशासक स्थायी समिती अहवालाचे अवलोकन करुन निर्देशीत करीत केले आहे.

<u>विषय क्रमांक 599</u> - जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत–नागरी दलीतेत्तर वस्त्यांमध्ये कार्यक्रम शीर्षा अंतर्गत अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामे करणे या कामाचे कंत्राटदार शुभम गिरी यांचेशी करारनामा करण्याचे मंजुरी बाबत.

जिल्हा वार्षिक नियोजन – आयुक्त – सदर 35 टक्के पेक्षा कमी कसे काय घेण्यात आलेला आहे व कसे काय कॅलक्युलेट करण्यात आलेले आहे. मुख्यलेखापरिक्षक – आपण एकस्ट्रा सिक्युरिटी डिपॉझिट जमा करुन घेतो. त्या आधारावर ही प्रक्रिया करण्यात आली आहे. शहर अभियंता – सार्वजनिक बांधकाम विभागा मध्ये सुध्दा असे दर झालेले आहे. आपण सिक्युरिटी डीपॉझिट घेतो. आयुक्त – मुख्यलेखापरिक्षक यांनी नियमावली व शहर अभियंता यांनी इस्टिमेंट संदर्भातील ड्राईंगसह सर्व माहिती मला दाखवावी त्यानंतर या विषयास मंजुरी देऊ.

<u>विषय क्रमांक 600</u> - अमरावती महानगरपालिका हद्दीतील विविध कंपनीचे ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासंदर्भात रस्ते खोदकामाचे सन 2025-2026 चे दर निश्चित करणेबाबत.

संदर्भ: 1. मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. 54, दि. 17/09/2021.

2. शासन निर्णय क्र. दुपासु-2025/प्र.क्र. 10/नवि-20, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32, दिनांक 05 फेब्रुवारी, 2025.

3. संचार मंत्रालय (दुरसंचार विभाग) नवी दिल्ली, अधिसुचना दिनांक 17 सप्टेंबर, 2025. (Telicommunication Right of way Rules 2024).

4. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.: ओएफसी-2012/ प्र.क्र. 209/ रस्ते-7, मंत्रालय मुंबई - 32, दिनाक 27/04/2014.

5. मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. 22, दिनांक 18/02/2014.

6. मा. स्थायी समिती सभेत पारीत व त्यास सभेत कायम करण्यात आलेला ठराव क्र. 44, दिनांक 31/07/2014.

आयुक्त – गव्हरमेंट ऑफ इंडिया चे गाईडलाईन नुसार दर असावे. 10 टक्के वाढ कोणत्या आधारावर करण्यात आलेली आहे त्याबाबत यामध्ये कुठेच उल्लेख नाही. शहर अभियंता – दरवर्षी 10 टक्के वाढ नैसर्गिक वाढ विचारात घेवून करण्यात आलेली आहे. आयुक्त – सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी रेट नोटीफाय केल्यानंतरच दर निश्चित करावयाचे आहे. युनिफॉमिटी दराचे बाबत असली पाहिजे. वेगवेगळे दर नसावेत. 10 टक्के ची वाढ अमान्य करण्यात येत आहे. बँक गॅरंटी नियमानुसार घेण्यात यावी. विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 600</u> - उपरोक्त विषयाला अनुसरुन संदर्भ क. 2 नुसार राज्यात दूरसंचार पायाभूत सुविधांचा प्रसार वेगवान व सुलभ व्हावा याकरिता निर्गमित केलेला 'शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2021/प्र.क्र.242/ नवि-20. दिनांक 19/12/2022 अधिक्रमित करण्यात येत असून राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत मध्ये केंद्र सरकारचा दूरसंचार कायदा 2023 दिनांक 26 जून, 2024 पासून व दूरसंचार नियम 2024 दिनांक 1 जानेवारी, 2025 पासून अंमलबजावणी करणे करिता लागू करण्यात येत आहे", असे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे

अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये खाजगी दूरसंचार कंपन्यांना भूमिगत केबल अंथरण्याकरिता कराव्या लागणाऱ्या रस्ते खोदकामाचे संदर्भ क्रमांक 1 नुसार आकारावयाचे शुल्क रद्द करून नव्याने वरील धोरणानुसार फक्त रेस्टोरेशनचे नवीन शुल्क तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त यांनी दि. 06/08/2025 रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

यापुर्वी संदर्भ क्र. 4 ची अंमलबजावणी होण्याकरीता संदर्भ क. 5 व 6 ठराव क्र. अनुक्रमे 22 व 44 पारीत करण्यात आले. त्यामध्ये संदर्भ क्र. 4 नुसार असलेले दर (डांबरी रस्ते, खडीचे रस्ते, मुरुम साईड पठ्या, रस्त्याचे बाजुची जमीन, पेव्हींग ब्लॉक इ.) सर्वसामान्य नागरीक व शेतकरी यांना शेतीसाठी / पिण्याच्या पाण्यासाठी / ड्रेनेज साठी जलवाहीन्या टाकण्याकरिता रस्ते ओलांडणी बाबत (Road Crossing) खोदकामासाठी परवानगी बाबत आहेत. त्यामुळे ऑप्टीकल फायबर केबल करीता रस्ते खोदकाम करणे ही बाब कमर्शियल असल्याने नमुद दरांमध्ये दिड पट वाढ करुन राक्रम आकारण्यात यावी, असे धोरण निश्चित करण्यात आले होते, तसेच निश्चित झालेल्या दरांना प्रत्येक वर्षी 10% वाढ करण्यात यावी किंवा वेळेवेळी जो काही शासन निर्णय होईल, त्यानुसार अमनपा कार्यवाही करेल, असा ठराव मा. सर्वसाधारण सभा व मा. स्थायी समीतीने मंजुरी केलेला आहे. त्या अनुषंगाने रस्ते खोदकामाचे चालु वर्षा करीता दर खालीलप्रमाणे येत आहे. (सदर येणा-या दरानुसार 7% सुपरव्हीजन चार्जेसचा समावेश करणेबाबत मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.)

1. डांबरी रस्ते / पेव्हींग ब्लॉक / कॉफीट रस्ते रु. 23,345/- प्रती मीटर
2. खडीचे रस्ते रु. 11,296/- प्रती मीटर
3. मुरुम साईड पट्टी रु. 4,883/- प्रती मीटर
4. रस्त्याच्या बाजूची जमीन: रु. 1,180/- प्रती मीटर

संदर्भ क्र. 2 नुसार दुरसंचार (रस्त्याचा अधिकार / Right of Way) नियम 2024 संपूर्ण देशामध्ये दि. 01/01/2025 पासून प्रत्यक्षात लागु करण्यात आला आहे. या नियमानुसार नविन कायदे व नियम महाराष्ट्र राज्यामध्ये अनिवार्य करण्यात आले आहे. संदर्भ क्र. 3 मधील प्रकरण क्र. 7 पान क्र. 32 वरील नियम तक्त्यामधील पार्ट 2 मधील अनु. क्र. 7(8) (b) व 7 (9) (b) नुसार ...

| Rule | Item | Amount |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 7(8)(b) | compensation for restoration of property property to the state as it existed prior to the establishment telecommunication of underground network where undertaking to restore the property is not required by the public entity. | a) Sum required to restore public property as per the rate prescribed by central public works department for that area or as per the rate prescribed by state public works department for that area, if no rate has been prescribed by the Central Public Works Department for that area.<br>(b) The rate as referenced in clause (a) shall not exceed the rate charged by the Central Public Works Department or the public works |

| | | |
|---|---|---|
| | | department for its own work: Provided that in case of laying of underground telecommunication network through horizontal directional digging method, the Compensation for restoration of property shall be limited to the area of the pits only. |
| 7(9)(b) | Bank guarantee as security for performance in case of establishment of underground telecommunicatin network where undertaking is specified by the public entity for the facility provider to discharge the responsibility to restore the damages | Twenty per cent of the sum required to of restore public property as per the rate prescribed by the Central Public Works Department for that area or as per the rate prescribed by the State public works department for that area, if no rate has been prescribed by central public works department for that area. |

.... केवल खोदकामामुळे क्षतिग्रस्त झालेले रस्ते दुरुस्त करण्याची जबाबदारी ही संबधीत कंपनीची असेल व त्याकरीता देण्यात येणारी रस्ते खोदकामची परवानगी शुल्क हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसुची नुमार काढून येणा-या रक्कमेच्या फक्त 20% रक्कम सुरक्षा रक्कम बैंक गॅरंन्टी स्वरुपात तसेच रस्ते दुरुस्तीबाबतचे हमीपत्र संबधीत कंपनीला अमनपा मध्ये जमा व सादर करावी लागेल व खोदकाम करण्यात आलेल्या रस्त्यांचा पुर्नसंचय (Self Restoration) करण्याची जवाबदारी कंपनीचीच असेल,

अधिसुचना दि. 17 सप्टेंबर, 2024 मधील प्रकरण 2, मुद्दा क्र. 7. पान क्र. 22 चे मार्गदर्शक तत्वांनुसार बांधकाम विभागामार्फत रस्ता दुरुस्तीचे अनुषंगाने प्रस्तावित खोदकाम दुरुस्तीचा काटछेद (Cross Section) अंतिम करण्यात येवुन त्यानुसार 2022-23 चे राज्य दरनुची नुसार सन 2025-26 करीता खालीलप्रमाणे दर निश्चित केलेले आहेत. ते येणे प्रमाणे –

| अ.क्र. | रस्त्याचा प्रकार | वर्ष निहाय निश्चित करण्यात आलेले प्रती मीटर दर (प्रत्येक वर्षी 10% वाडीनुसार) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2022-23 | 2023-24 | 2024-25 | 2025-26 |
| 1 | डांबरी रस्ते | 8,652/- | 9,517/- | 10,469/- | 11,516/- |
| 2 | कॉक्रीट रस्ते | 7,592/- | 8,351/- | 9,186/- | 10,105/- |
| 3 | पेव्हीग ब्लॉक | 9,981/- | 10,979/- | 12,077/- | 13,285/- |
| 4 | रस्त्यालगतची जमीन(Side Sholder) | 5,145/- | 5,660/- | 6,226/- | 6,849/- |

सदर विषय स्थायी समितीचे मान्यतेकरीता ठेवण्यात आला आहे. परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना आहे. वरीलप्रमाणे, टिपणीमध्ये नमुद 10 टक्के ची वाढ अमान्य करण्यात येत आहे. व बँक गॅरंटी नियमानुसार घेण्यात यावी, असे प्रशासक, स्थायी समिती ठरवित असुन सदर विषय मंजुर करीत आहे.

**-स्वा-**
**(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**महानगरपालिका अमरावती**

<u>दिनांक 04.08.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत</u>

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे सोमवार दिनांक 04.08.2025 रोजी सकाळी 11 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. आयुक्त तथा प्रशासक, अतिरिक्त आयुक्त-2, मुख्यलेखापरिक्षक, शहर अभियंता, वै.आरोग्य अधिकारी (स्वच्छता), नगरसचिव व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

<u>विषय क्रमांक 592</u> -मागील सभा दिनांक 18/07/2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृतांत वाचून कायम करणे.

<u>ठराव क्रमांक 592</u> -मागील सभा दिनांक 18/07/2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृतांत वाचून कायम करण्यात आले.

<u>विषय क्रमांक 593</u> - (29/07/2025) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) 2.0 अंतर्गत अमरावती महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनचा सविस्तर प्रकल्प मधील "Reclamation of Scientific Land By Conducting Bio-Remediation and Biomining of Legacy Waste at Sukali Compost Depot in Mauje: Peth, Survey No: 155,156 for Solid Waste Management Phase -3 in Amravati Municipal Corporation."येथील बायोमायनिंग फेज-३ या प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

आयुक्त तथा प्रशासक – एकुन किती लॅन्ड आहे व किती फेजमध्ये करणार आहे. अति.आयुक्त – सुकळी कंपोस्ट डेपो येथील बायोमायनिंग फेज-3 या प्रकल्पास स्थायी समितीची मंजुरीकरीता सदर विषय सभेसमोर सादर करण्यात आलेला आहे. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 593</u> :- उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी 2.0 प्राप्त पत्र क्र./राअस/स्व.म.अ./621/25-26 दिनांक 27/05/2025 ला प्राप्त पत्रा च्या अनुषंगाने प्रत्यक्ष सुकळी कंपोस्ट डेपो येथिल होत असलेल्या विविध बांधकामा मधून निघणाऱ्या कचऱ्याचे प्रत्यक्ष साईटनुसार मोजमाप घेऊन सदर प्रकल्प तयार करण्यात आला असून त्याची तांत्रिक तपासणी म.जी.प्रा. तांत्रिक मंजुरीचा आदेश प्रपत्र बाब क्र. ०९ नमुना क्र. ८५ जुलै २०२५ चा जा. क्र. मु.अ./अम/रेचीशा/तां. मे/१३०६/२०२५

दि.२१/०७/२०२५ च्या नुसार प्राप्त झाली आहे. सदर प्रकल्पाची तांत्रिक मान्यतेनुसार प्रकल्प किंमत रुपये १३,१२,०२,५००/- एवढी आहे. स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्पामध्ये केंद्र शासनाचा अनुज्ञेय हिस्सा (रक्कम रुपये) (33%)- ४,३२,९६,८२५/-, राज्य शासनाचा अनुज्ञेय हिस्सा (रक्कम रुपये) (37%)-४,८५,४४,९२५/-, स्थानिक स्वराज्य संस्था (अमरावती महानगरपालिका अमरावती) हिस्सा (ULB 30%)- ३,९३,६०,७५०/- एवढा असेल.

राज्य अभियान संचालक स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी २.० मुंबई या विभागात प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. बायोमायनिंग फेज-३ या प्रकल्पामध्ये अमरावती महानगरपालिका अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था हिस्सा (ULB) 30%)-३,९३,६०,७५०/- भरण्यास मा.आयुक्त यांनी दिलेल्या मान्यतेनुसार उपरोक्त विषय व टिपणीन्वये अमरावती महानगरपालिकेचा हिस्सा (ULB 30%) ३,९३,६०,७५०/- भरण्याकरीता, परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

**विषय क्रमांक 594** - (30/07/2025) झोन क्र. १,२,३४ व ५ मध्ये विविध ठिकाणी मुरुम टाकणे. (दर करार करणे) सदर कामास महाराष्ट्र प्रांतीक अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये करारनामा करण्यास मान्यता प्रदान करणे बाबत.

आयुक्त तथा प्रशासक – मुरुम टाकण्यासंदर्भात पुष्कळ तक्रारी प्राप्त होत आहे. तरी तातडीने आवश्यक ठिकाणी मुरुम टाकण्यात यावे. कॉंग्रेस नगर येथील तक्रारी येत आहे. शहर अभियंता – वडरपुरा येथील तक्रारी होत्या. तसेच जुने डी.पी. आहे त्याठिकाणी मुरुम टाकणे आवश्यक आहे. आयुक्त तथा प्रशासक – उपअभियंता यांना या सभेचे अनुषंगाने सुचना देण्यात याव्या. ज्याठिकाणी मुरुम टाकणे आवश्यक असेल त्या ठिकाणी मुरुम टाकण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी व विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 594** :- उपरोक्त विषयांकीत काम लेखाशिर्ष उपलब्ध निधीनुसार प्रस्तावित असुन कामाची निविदा रक्कम रु. १.४९.७०.३८४/- आहे. सदर कामाची ई-निविदा प्रणालीव्दारे बोलविण्यात आली असता खालील प्रमाणे प्राप्त निविदा उघडण्यात आल्या.

| कंत्राटदाराचे नाव | दर |
|---|---|
| १) श्री. राजीव ठवरे | १.५१०% कमी (वाटाघाटी अंती २% कमी) |
| २) न्यु बालाजी कंन्सक्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दर |

उपरोक्त प्राप्त निविदा धारक श्री. राजीव ठवरे कंत्राटदार यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा वाटाघाटी अंती २% कमी असल्याने मा. उपायुक्त यांचे सोबत दि. २३/७/२०२५ रोजी झालेल्या वाटाघाटी अंती २% कमी दर असल्याने मा. अतिरीक्त आयुक्त यांनी दि.२४/०७/२०२५ ला मंजुरी प्रदान केलेली आहे. व मा. आयुक्त यांनी दि. २८/७/२०२५ ला मंजुरी प्रदान केली आहे. करीता उपरोक्त प्राप्त निविदा धारक श्री. राजीव ठवरे यांची निविदा मंजुर करुन कंत्राटदारा सोबत सदर कामाचा करारनामा करण्यास परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

**विषय क्रमांक 595**- (30/07/2025) लेखा विभागातील मनपा. व शासन निधीचे रोकडवही व बँक खात्याचा दिनांक 31/03/2024 अखेरची शिल्लक पडताळणी अहवाल सादर करणेबाबत.

आयुक्त तथा प्रशासक – यासंदर्भात माझेशी चर्चा करावी. विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 595** - लेखा विभागातील मनपा. व शासन निधीचे रोकडवही व बँक खात्याचा दिनांक 31/03/2024 अखेरची शिल्लक पडताळणी अहवाल सादर करणेबाबतचे उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्रान्वये लेखाविभागातील मनपा व शासन निधीचे रोकडवही व बँक खात्याची दि.31.03.2024 अखेरची शिल्लक पडताळणी दि. 13.01.2025 ते दि.30.01.2025 या कालावधीत लेखाविभागाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्याची (अहवाल पृष्ठ क्र.1 ते 22) पडताळणी या कार्यालयाच्या लेखा पथकाकडून करण्यात आलेली असुन सदर अहवाल स्थायी समितीचे अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला होता. परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, लेखाविभागातील मनपा व शासन निधीचे रोकडवही व बँक खात्याची दि.31.03.2024 अखेरची शिल्लक पडताळणी दि. 13.01.2025 ते दि.30.01.2025 या कालावधीत लेखाविभागाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्याची (अहवाल पृष्ठ क्र.1 ते 22) चे अवलोकन करुन सदर अहवालास प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

वै.आरोग्य अधिकारी (स्वच्छता) यांनी दैनंदीन कचरा उचलण्याबाबतचा कंत्राटदारास मुदतवाढ देणेबाबतचा एक वेळेवरचा विषय असल्याचे सांगितले. आयुक्त तथा प्रशासक यांनी सदर विषय वेळेवरचा म्हणुन सभेत दाखल करुन घेण्यात येत असल्याचे सांगितले.

**विषय क्रमांक 596** - (04/08/2025) दैनंदिन कचरा उचलणारे कंत्राटदार मे.पुजा कंन्स्ट्रक्शन कंपनी (वर्धा) यांना मुदतवाढ देण्याबाबत.

वै.आरोग्य अधिकारी (स्वच्छता) यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – सदर कंत्राटदाराला मागील ठराव क्र.329 अन्वये, नमुद अटी व शर्तीनुसार 6 महिन्याकरीता (दि.01.04.2025 ते 30.09.2025 पर्यंत) मुदतवाढ देण्याकरीता मंजुरी देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 596** :- दैनंदिन कचरा उचलणारे कंत्राटदार मे.पुजा कंन्स्ट्रक्शन कंपनी (वर्धा) यांना मुदतवाढ देण्याबाबतचे उपरोक्त विषयान्वये, मनपा अमरावती स्वच्छता विभागाअंतर्गत दैनंदिन कचरा उचलण्याचे कामे मा.स्थायी समिती सभा दि.27.10.2016 ठराव क्र.329 नुसार मे.पुजा कंन्स्ट्रक्शन कंपनी (वर्धा) यांना देण्यात आलेला आहे. त्यांचेसोबत दि.16.11.2016 रोजी कार्यारंभ आदेश दिलेला असुन सदर कामाचा कालावधी हा स्थायी समिती ठराव क्रमांक 329 दिनांक 27.10.2016 च्या कराररनानुसार प्रत्यक्ष काम सुरु केल्यापासुन 7+1+1 वर्षापर्यंत देण्यात आलेला आहे. तसेच निविदा अट क्र.7 नुसार कंत्राटाचा कालावधीकार्यारंभ आदेशामध्ये नमुद केलेल्या दिनांकापासुन 7 वर्षाचा राहील. तथापी कंत्राटदारास 7 वर्ष पुर्ण झाल्यानंतर कंत्राटाचे कामाचे पुर्नविलोकन करुन कंत्राट पुढील कालावधीत कायम ठेवण्याबाबतचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील. मा.आयुक्त कंत्राटाच्या 8 व्या वर्षीसुध्दा पुर्नर्विलोकन करुन कंत्राट पुढील कालावधीस ठेवण्याबाबातचा अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे असे नमुद आहे.

संबंधीत कंत्राटदाराचे यापुर्वी 7+1 वर्षाचा कार्यकाळ माहे मार्च 2025 ला संपुष्टात येत आहे. पुढील 01वर्षाचे कालावधीकरीता (दि.01.04.2025 ते दि.31.03.2026 पर्यंत) यांना मुदतवाढ द्यावयाची आहे. याबाबत 5 ही प्रशासकीय झोन निहाय ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक तसेच सहाय्यक आयुक्त यांचे मे.पुजा कंन्स्ट्रक्शन कंपनी (वर्धा) यांचे काम समाधानकारक असल्याचे अभिप्राय घेण्यात आलेला असुन त्यांना पुढील 1 वर्षाचे कालावधीकरीता मुदतवाढ देण्याबाबत नस्ती प्रस्तावित केलेली आहे.

तरी मे.पुजा कंन्स्ट्रक्शन कंपनी (वर्धा) यांचे दैनंदीन कचरा उचलण्याचे कामाचे मागील 7 + 1 वर्षाचे कामा समाधानकारक असल्यामुळे त्यांचेसोबत दि.16.11.2016 नुसार झालेल्या कररनाम्यातील अटी व शर्तीचे व त्याचदराने

त्यांना 1 वर्षाची मुदतवाढ (दि.01.04.2025 ते दि.31.03.2026 पर्यंत) कामे करण्याकरीता मुदतवाढ देण्याकरीता प्रस्तावित करण्यात आलेले होते.

परंतु मे.पुजा कंन्स्ट्रक्शन कंपनी (वर्धा) या कंत्राटदाराला मा.आयुक्त यांनी 6 महिन्याचे कालावधीकरीता म्हणजे, 30 सप्टेंबर 2025 पर्यंत मुदतवाढ देण्याकरीता दि.31.07.2025 रोजी मंजुरी दिलेली आहे.

तरी मे.पुजा कंन्स्ट्रक्शन कंपनी (वर्धा) यांना (दि.01.04.2025 ते दि.30.09.2025 पर्यंत) 6 महिन्याचे कालावधीकरीता मुदतवाढ देण्याकरीता, परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

**-स्वा-**
**(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**महानगरपालिका अमरावती**

<u>दिनांक 18.07.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत</u>

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे शक्रवार दिनांक 18.07.2025 रोजी दुपारी 12 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. आयुक्त तथा प्रशासक,अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (3), मुख्यलेखापरिक्षक, मुख्यलेखापाल, नगरसचिव, समाज विकास अधिकारी, वै.आरोग्य अधिकारी (स्वच्छता), उपअभियंता (विद्युत), सहा.आयुक्त बा.व प.अधि., मुख्य अग्निशमन अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

**<u>विषय क्रमांक 585</u>** – दिनांक ०१/०७/२०२५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत.

**<u>ठराव क्रमांक 585</u>** – दिनांक ०१/०७/२०२५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत सभेने वाचुन कायम केले.

**<u>विषय क्रमांक 583</u>** – (१८.०६.२०२५) वयोवृध्द दिव्यागांना येणा-या लाभार्थ्यांच्या वयोमर्यादेत ठरवण्यात आलेल्या धोरणात बदल करणेबाबत.

समाज विकास अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. यामध्ये 75 लक्ष रु.ची तरतुद वाढवुन देण्यात यावी. प्रशासक तथा आयुक्त – विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 583</u>** – शासन निर्णयानुसार अमरावती महानगरपालिकेमध्ये शहरातील दिव्यांगाकरीता 5% दिव्यांग कल्याण निधी राखीव ठेवण्यात येत असुन दि.28.10.2015 च्या शासन निर्णयानुसार अमरावती महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक 17.03.2023 ठराव क्रमांक 70 मंजुरी नुसार दिव्यांगाकरीता विविध योजना राबविण्यात येतात.

सदर धोरणातील अनुक्रमांक 12-वार्षीक आर्थिक सहाय्य योजनेमधील घटक क्र 3.मधील धोरणात सुधारणा करुन योजनेची पात्रता वयमर्यादा 55 वर्षावरुन 50 वर्षावरील दिव्यांग करणे व सन 2025-26 या आर्थिक वर्षाकरीता 5 % राखीव दिव्यांग कल्याण निधी करीता 75 लक्ष तरतुद वाढवुन मिळणेबाबत मा.आयुक्त यांची दि.22.05.2025 रोजी मंजुरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार धोरणात सुधारण करुन सदर योजनेची वय मर्यादा 55 वर्षावरुन 50 वर्ष पर्यंत करणे व सन 2025-26 करीता 75 लक्ष तरतुद 5 % निधीमध्ये वाढवुन देणेबाबतचे प्राप्त विषय व टिपणीचे अनुषंगाने, परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**विषय क्रमांक 586** – (०८.०७.२०२५) दि.१६/०६/२०२५ ते दि.०४/०७/२०२५ या कालावधी मध्ये लेखापरिक्षण विभागाने अमरावती महानगरपालीका मधील लेख्यांची साप्ताहीक छाननी बाबतचे साप्ताहीक अहवाल सादर करणे बाबत.

मुख्यलेखापरिक्षक यांनी टिपणी वाचुन दाखविली. लेखापरिक्षण विभाग दर आठवडयाचे शेवटचे दिवशी पुर्ण प्रकरण तपासणी करुन अहवाल तयार करण्यात येतो. प्रशासक तथा आयुक्त – संबंधीत विभागाकडुन अनुपालन अहवाल मागविण्यात यावा. सदर विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 586** – उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ (सुधारीत २०१६) चे कलम १०५ व १०६ अन्वये महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरिक्षक यांनी लेख्यांची साप्ताहीक छाननी व तपासणी करुन साप्ताहीक अहवाल स्थायी समीती समक्ष सादर करण्याबाबत नमुद आहे.

| अनु क्र. | साप्ताहीक अहवालाचा कालावधी |
|---|---|
| ०१ | दि. 16.06.2025 ते 20.06.2025 |
| ०२ | दि. 23.06.2025 ते 27.06.2025 |
| ०३ | दि.30.06.2025 ते 04.07.2025 |

त्यास अनुसरुन लेखापरिक्षण विभागाने दि.१६/०६/२०२५ ते दि.०४/०७/२०२५ रोजी केलेल्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी बाबतचा अहवाल सोबत संलग्न आहे. उपरोक्त प्रमाणे उल्लेखीत सदर अहवाल मुख्यलेखापरिक्षक यांनी प्रशासक स्थायी समितींचे अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला असुन सदर साप्ताहीक लेख्यांचे लेखापरिक्षण परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासनाने संबंधित विभागाकडे अनुपालन अहवालाची मागणी करण्यास्तव नियमानुसार कारवाई करावी असे प्रशासक स्थायी समिती अहवालाचे अवलोकन करुन निर्देशीत करीत केले आहे.

**विषय क्रमांक 587** – (०९.०७.२०२५) अमरावती महानगरपालिकेच्या विविध खात्यात जमा असलेली शिल्लक रक्कमेची FD तयार करणेबाबत.

मुख्यलेखाधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. मा.प्रशासक तथा आयुक्त – FD करण्याकरीता शासन निर्णय आहे काय. मुख्यलेखाधिकारी – 14 सप्टेंबर 2020 चा शासन निर्णय आहे. या रक्कमेवर मिळणारे व्याजमध्ये त्या

व्याजाचे रक्कम त्याच योजनेअंतर्गत असलेल्या कामाकरीता खर्च करण्यात यावा. मा.आयुक्त तथा प्रशासक – फिशरी हबचे पैसे वळती करु नये. मुख्यलेखाधिकारी – संबंधीत विभागाकडुन अकाऊंट विभागाला फिशरी हब करीता देयके प्राप्त झालेले नाही. अ.क्र. 2 मधील दलित वस्ती योजनेची FD करण्याकरीताची संभावित रक्कम ही 15 कोटी रु. ऐवजी 20 कोटी रु.करावी. तसेच अ.क्र.3 जिल्हा नियोजन समिती योजना अंतर्गत FD करण्याकरीता संभावित रक्कम 20 कोटी रु. ही योजना निहाय गुंतवावी लागेल. आयुक्त तथा प्रशासक – उपरोक्त सर्व निधी हा अल्प मुदतीकरीता callable स्वरुपात गुंतवावा. FD करण्याकरीता संभावित रक्कम गुंतवितांना बंद लिफाफ्यात ऑफर मागवुन माझे समक्ष उघडावे. निधीची FD करण्याकरीता बॅंक मॅनेजरसोबत बैठक लावण्यात यावी. ज्यांचे दर जास्त असेल त्या बॅंकेत सदर निधी फिक्स करता येईल. विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 587</u> – अमरावती महानगरपालिकेच्या विविध खात्यात जमा असलेली शिल्लक रक्कमेची FD तयार करणेबाबतचे विषयास अनुसरुन मनपाच्या विविध खात्यामध्ये शिल्ल्क असलेल्या रक्कमेपैकी काही रक्कम खालील तक्त्यामध्ये असलेल्या रक्कमेची FD करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील नियम क्र.92 नुसार स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असल्यामुळे प्रस्ताव मंजुरी करीता सादर करण्यात आला. तो खालील प्रमाणे –

| अ.क्र | बॅंकेचे नाव | अँकाऊटचे नाव | खात्यामधिल शिल्लक रक्कम | FD करण्याकरीता सभावित रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | HDFC BANK | AMC FISHRY HUB | 5,60,26,409/- | 4 कोटी | |
| 2 | HDFC BANK | AMC DALIT WASTI YOJANA | 23,34,29,522/- | 15 कोटी | |
| 3 | HDFC BANK | AMC JILHA NIYOJAN SAMITI YOJANA | 35,87,55,547/- | 20 कोटी | |
| 4 | IDBI BANK | AMC AGNI SURAKSHA | 3,91,48,042/- | 3 कोटी | |
| 5 | IDBI BANK | AMC MULBHOOT SUVIDHA | 3,09,73,556/- | 2 कोटी | |
| 6 | IDBI BANK | AMC BHUYARI GATAR YOJANA | 3,29,06,020/- | 2 कोटी | |

उपरोक्त विषयावर चर्चा करण्यात आली. चर्चेचे अनुषंगाने अ.क्र.1 फिशरी हबचे FD करण्याकरीता संभावित रक्कम 4 कोटी रु. ती यामधुन वगळण्यात यावी. अ.क्र. 2 मधील दलित वस्ती योजनेची FD करण्याकरीताची संभावित रक्कम ही 15 कोटी रु. ऐवजी 20 कोटी रु.करण्यात यावी. अ.क्र.3 जिल्हा नियोजन समिती योजना अंतर्गत FD करण्याकरीता संभावित रक्कम 20 कोटी रु. ही योजना निहाय गुंतवावी. उपरोक्त सर्व निधी हा अल्प मुदतीकरीता callable स्वरुपात गुंतवावी. FD करण्याकरीता संभावित रक्कम गुंतवितांना बंद लिफाफ्याबंद ऑफर मागवुन मा.आयुक्त यांचे समक्ष उघडण्याची पुढील कार्यवाही करावी. परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांस मंजुरी प्रदान करीत आहे .

**<u>विषय क्रमांक 588 -</u>** (१४.०७.२०२५) जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण 2024-25 अंतर्गत प्राप्त निधी मधुन साहित्य खरेदी करणेकरीता मा.स्थायी समितीचे मंजुरी प्रदान करणेबाबत.

संदर्भ :- १) जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांचे दिनांक १९/०३/२०२५ रोजीचे निधी वितरण आदेश.

उपअभियंता (अग्निशमन) यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – यावर्षी काही मशनरी खरेदी करण्यात आलेल्या आहे काय. उपअभियंता (अग्निशमन) – हायड्रोलिक बोल्ट कटर नविन आहे. आयुक्त तथा प्रशासक – यावर्षी ॲडीशनल लागत असेल ते साहित्य खरेदी करण्यात यावे. विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 588</u> -** जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण २०२४-२५ अंतर्गत साहित्य खरेदी करणेकरिता रु. १,८२,३३,९५०/- निधी प्राप्त झाला आहे. सदर निधी मधुन खालील प्रमाणे साहित्य खरेदी करण्याकरिता प्रस्तावित केले आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | नग | तांत्रिक विश्लेषण |
|---|---|---|---|
| १ | AFFF - ३% | ३००० लिटर | As per IS/EN Standard |
| २ | लाईफ जाकेट | ५० | As per MMD approved |
| ३ | लाईफ रिंग | ५० | As per MMD approved |
| ४ | हायड्रोलिक बोल्ट कटर | ०५ | As per IS/EN Standard |
| ५ | CO2 टाईप फायर एक्सटींग्युपर | १०० | As per IS 15683 |
| ६ | ABC टाईप फायर एक्सटींग्युपर | १०० | As per IS 15683 |
| ७ | फोम ब्रांच FB 5x | ०५ | As per IS/EN Standard |
| ८ | रबर हंड ग्लोस | ५० | As per IS/EN Standard |
| ९ | हंड कंट्रोल ब्रांच | ५० | As per IS/EN Standard |
| १० | डिलिवरी होज ६३ mm | ३० | As per IS/EN Standard |
| ११ | पोर्टेबल फायर पंप २७५ LPM | ०२ | IS-942:1982 |
| १२ | B.A Set with spare cylinder with fire Engulfment test. | ०६ | IS -12045-part-2 face mask: IS 14166:19 |

सदर साहित्य खरेदी करण्याकरिता मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मंजुरात प्रदान केली आहे. त्यानुसार GeM पोर्टलवर दि. २१/०५/२०२५ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली त्याची अंतिम दि. ०५/०६/२०२५ रोजी होती. त्यामध्ये एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या असून सर्व निविदा पात्र ठरल्या आहेत. त्यामुळे प्राप्त विनिदाधारक यांचे वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. त्यामध्ये खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेत.

| अनु.क्र. | कंपनीचे नाव | किंमत | श्रेणी |
|---|---|---|---|
| १ | देवी फायर सर्विस | १,८२,००,०००/- | L-१ |
| २ | वाडिया बॉडी बिल्डर | १.९५,६५,१९२/- | L-२ |
| ३ | हाय-टेक सर्विस | २,०७,४५,२४४/- | L-3 |

वरीलपैकी देवी फायर सर्विस यांचे दर रु.१,८२,००,०००/- सर्वात कमी असल्यामुळे त्यांचे दरास मा.आयुक्त यांनी दि. ०८/०७/२०२५ रोजी मंजुरात प्रदान केली असून परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती

अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

<u>विषय क्रमांक 589 -</u> (१६.०७.२०२५) स्वच्छ भारत अभियान (ना.) SBM 2.0 माहिती शिक्षण व संवाद (IEC) घटकाअंतर्गत काम करणेकरीता यंगमार्बल सर्विसेस एलएलपी, नाशिक महाराष्ट्र यांची नियुक्त करणेकरीता मंजुरी प्रदान करणेबाबत.

आयुक्त तथा प्रशासक – यादिपणीमध्ये दिलेले दर आहे त्यानुसार वाटाघाटी करण्यात आलेली आहे काय. वै.आरोग्य अधिकारी (स्वच्छता) यांनी टिपणी वाचुन दाखविली. कंत्राटदारांनी सादर केलेले दरात वाटाघाटी करण्यात आलेले दर दोनही दर दिलेली आहे. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

<u>ठराव क्रमांक 589</u> - उपरोक्त विषयान्वये स्वच्छ भारत अभियान (नागरी) 2.0 देशामध्ये राबविण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना भारत सरकारच्या गृहनिर्माण तथा नागरी कार्य मंत्रालयाद्वारे (MoHUA) प्रसिध्द केल्या आहेत. याबाबत देशातील सर्व शहरांमध्ये अभियानाची अंमलबजावणी करावयाची आहे. सर्व शहरांसाठी "कचरा मुक्त शहराचा दर्जा प्राप्त करण्याचा दृष्टीकोन समोर ठेऊन स्वच्छ भारत अभियान-2.0 कार्यान्वित केले आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान 2.0 अंतर्गत माहिती शिक्षण व संवाद (IEC) घटका अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण, GFC, Water Plus, सफाई मित्र सुरक्षा अभियान जनजागृती तसेच विविध कामांसाठी संस्थेची नेमणूक करणेकरिता रु. 42,03,226/- रकमेची मा. आयुक्त महोदय यांच्या दि. 26-05-2025 रोजीच्या मंजुरीनुसार दि. 28-05-2025 रोजी ऑनलाईन https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर तसेच वृत्तपत्रामध्ये निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. ऑनलाईन निविदा उघडल्या असता एकूण चार निविदा धारकांनी ऑनलाईन सहभाग दर्शविला होता या बाबत ई-निविदा प्रसिद्धी तपशील नुसार तांत्रिक लिफाफा उघडून कागदपत्रांची तांत्रिक पडताळणी केली असता चार निविदा धारकांपैकी दोन निविदाधारक पात्र ठरले असते त्यांना आर्थिक वाटाघाटी साठी आमंत्रित केले असता दि. 15-07-2025 रोजी मा. आयुक्त यांनी यंगमार्वल सर्विसेस एलएलपी, नाशिक महाराष्ट्र यांची निवड करण्याचे निर्देशित केले आहे. यंगमार्वल सर्विसेस एलएलपी, नाशिक महाराष्ट्र यांचे सादरीकरण अत्यंत दर्जेदार, त्यांच्या कामाची पद्धत समाधानकारक व प्रभावी असल्याचे सादरीकरणातून व चर्चा-अभिप्रायातून निष्पन्न झाले असून संस्थेचा कार्यानुभव, सादरीकरणातील दृष्टिकोन, सादरीकरणाची गुणवत्ता यावरून सदर संस्था सक्षम असल्याचे निदर्शनास आले. तसेच, काम करण्याच्या दराबाबत संस्था प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा व वाटाघाटी करण्यात आल्या. सदर वाटाघाटी नंतर खालील तक्त्यामधे नमूदप्रमाणे कामाचे दर अंतिम करण्यात आले आहेत.

| अ.क. | कामाचे विवरण | दर प्रति बाब | निविदेत सादर केलेले दर | वाटाघाटी करून निश्चित केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1. | व्यावसायिक क्षेत्र तसेच घरोघरी जावून दररोज कचरा निर्मिती व कचरा (ओला-सुका कचरा, घातक वस्तु/पदार्थ इत्यादी वेगळे संकलीत करणे) व 100% वर्गीकृत कचरा संकलन पध्दत संदेश घरो घरी पोहचविणे करिता गृह भेट. | प्रति गृह भेट | 22 | 22 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2. | गट बैठक किंवा कॉर्नर मीटिंग आयोजन करणे, | प्रति मिटिंग | 15000 | 5500 |
| 3. | विविध स्पर्धेचे आयोजन करणे. (उदा जिंगल, निबंध, चित्रकला, लहान व्हिडिओ, नाटक, रांगोळी, नाविन्यपूर्ण (Innovative) इ.) | प्रति स्पर्धेचा खर्च | 27500 | 27500 |
| 4. | लोककला व पथनाटय जनजागृती कार्यक्रम सर्व साहित्य सह. | प्रति कार्यक्रम खर्च | 8500 | 6000 |
| 5. | फिरता चित्ररथावर टि.व्ही. स्क्रिन वर जाहिरात प्रसारित करणे. | प्रति दिवस खर्च | 12500 | 8000 |
| 6. | विविध पेंटिग करणे (Normal painting). (उदा. लिहणे व चित्र काढणे.) | प्रति चौरस फुट | 60 | 60 |
| 7. | विविध पेंटिग करणे (3D painting). (उदा. लिहणे व चित्र काढणे.) | प्रति चौरस फुट | 89 | 89 |
| 8. | विविध SBM-U संबंधित थीमवर प्रदर्शने/सार्वजनिक मेळे. | प्रति कार्यक्रम खर्च | 45000 | 30000 |
| 9. | कापडी बॅग तयार करणे. प्रिन्ट सह. | प्रति नग | 23 | 23 |
| 10. | अभियानावर आधारित सेल्फी पॉईट तयार करणे. | प्रति नग | 4000 | 4000 |
| 11. | टोपी (मल्टीकलर शिक्कासह). | प्रति नग | 145 | 145 |
| 12. | टी शर्ट (मल्टीकलर शिक्कासह). | प्रति नग | 220 | 220 |
| 13. | रेन वॉटर हार्वेस्टिंग शासकीय इमारत करणे. | प्रति स्केअर फुट | 1500 | 1000 |
| 14. | प्रत्येकी एक एक Marathon, Cyclothon, Walkathon, Ploging आयोजित करणे. | प्रति इव्हेंट | 25000 | 25000 |
| 15. | नेहमी कचरा दिसणा-या ठिकाणाचे कच-याचे रुपांतर (GVP, CTU ठिकाण चे सौंदर्याकरण, झोपडपट्टयांचे सौंदर्याकरण, शहरातील जुन्या भागाचे सौदर्याकरण करणे. | प्रति स्पॉट | 53000 | 50000 |
| 16. | टाकाऊ वस्तु पासुन टिकाऊ वस्तु व सुंदर वस्तु तयार करणे. | प्रति नग | 75000 | 20000 |
| 17. | पोम्प्लेट/स्टीकर डिजाईन व सेटींग सह करून देणे. | प्रति नग | 30 | 30 |
| 18. | मल्टीकलर प्रिन्ट (Above 150 GSM). | प्रति नग (A4) | 8 | 8 |
| 19. | साधी कलर प्रिन्ट (70 to 85 GSM). | प्रति नग (A4) | 6 | 5 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 20. | नविन्यपुर्ण संकल्पना व उपक्रमावर मार्गदर्शन करणे. | प्रति दिवस खर्च | 5000 | 5000 |
| 21. | अभियाना विषयी विविध प्रस्ताव व फाईल बाईडिंग करून देणे. | प्रति नग | 250 | 250 |
| 22. | साउंड सिस्टीम पुरविणे. | प्रति दिवस | 35000 | 30000 |
| 23. | सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे. | प्रति कार्यक्रम खर्च | 41000 | 41000 |
| 24. | मल्टी कलर प्रमाणपत्र, | प्रति A4 साईज | 7 | 7 |
| 25. | शिल्ड बक्षिस मोमेंटो. | प्रति नग | 450 | 450 |
| 26. | व्हिडिओ शुटिंग व डॉक्युमेंटेशन तसेच यशोगाथा तारे करणे. | प्रति व्हिडीओ (Documentary video) | 15000 | 15000 |
| 27. | महानगरपालिकेने दिलेल्या 3R Centre/प्लास्टिक संकलन केंन्द्र चालविणे केंद्र चालविणे, | प्रति केंद्र | 15000 | 15000 |
| 28. | PVC प्लास्टिक कचरा पेटी पुरविणे. | प्रति नग<br>5 ते 10 लिटर<br>80 लिटर<br>100 लिटर<br>120 लिटर | 260 | 260 |
| 29. | Online तसेच Offline Citizen Feedback ची नोंद करणे, | प्रति Feedback | 25 | 20 |
| 30. | कार्यक्रम प्रसंगी चहा, कॉपी, नास्ता, जेवण पुरविणे, | प्रति व्यक्ति प्रमाणे | 220 | 220 |
| 31. | कार्यक्रम प्रसंगी फोटो ग्राफर पुरविणे, | प्रति दिवस | 4500 | 4500 |
| 32. | विविध रॅलीचे/शहरात स्वच्छता मोहीम आयोजना करिता साहित्य पुरविणे. | प्रति दिवस | 58000 | 58000 |
| 33. | विविध अभियानाची घडी पत्रक तयार करणे. | प्रति A4 साईज | 6 | 6 |
| 34. | स्वच्छता अप/स्थानिक अपद्वारे तक्रार निवारण तक्रारींचे निराकरण SLA (सेवा स्तर करार) कालमर्यदित Go to Settings to activate Windows केले जाते (Monthly Target). | प्रति माह | 45000 | 25000 |
| 35. | होर्डिंग- 10x20 साईज | प्रति स्केअर फुट | 40 | 40 |
| 36. | Banner-8x5 | प्रति स्केअर फुट | 40 | 40 |
| 37. | Banner-6x4 | प्रति स्केअर फुट | 40 | 30 |
| 38. | पाच Waste to Wonder Park तयार | प्रति स्पॉट | 198500 | 50000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | करणे. | | | |
| 39. | बल्क एसएमएस/व्हॉट्सॲप मेसेज. | प्रति मेसेज | 23 | 15 |
| 40. | आभासी स्वच्छता संग्रहालय/प्रदर्शनाचा थेट व्हिडिओ (Live Virtual Sanitation Museum/Exhibition) | प्रति नग | 50000 | 25000 |
| 41. | शाळांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करणे. | प्रति कार्यक्रम | 15000 | 4500 |
| 42. | प्रचारात्मक आणि जागरूकता निर्माण उपक्रम (उदा. एकल प्लास्टिक, फटाके, नायलॉन मांजा इ.) | प्रति उपक्रम | 28000 | 5000 |
| 43. | सोशल मिडिया मधील कार्यक्रमाची पोस्ट (फेसबुक/ट्विटर/इन्स्टाग्राम/यू ट्यूब) | प्रति पोस्ट | 12 | 12 |
| 44. | स्वच्छ प्रभाग क्रमवारी (उदा. हॉटेल, शाळा, रुग्णालये (आरोग्य सुविधा), RWA/मोहल्ला सरकारी कार्यालये, मार्केट असोसिएशन, वार्ड इ.) | प्रति आस्थापना | 9500 | 7000 |
| 45. | रेड स्पॉट, यलो स्पॉट बंद करणे. | प्रति स्पॉट | 65000 | 10000 |
| 46. | स्वच्छ वार्ड स्पर्धेचे आयोजन | प्रति स्पर्धा | 25000 | 25000 |
| 47. | मंजूर प्रकल्पांचे GMIS पोर्टलवर Mapping करणे. | प्रति Mapping | 16500 | 3000 |

सदर कामासाठी निधी PFMS प्रणालीवर राज्य अभियान संचालनालयाच्या mhsbm2.0 अंतर्गत उघडण्यात आलेल्या Implementing Agency च्या शून्य शिल्लक बँक ऑफ महाराष्ट्र बँक खात्यामार्फत आहरणासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर निधीचा विनियोग स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) 2.0 मधील मार्गदर्शक सुचनांनुसार करावयाचा आहे. तसेच निधी ज्या घटकासाठी दिला आहे, त्या घटकाकरिताच त्याचा विनियोग करावयाचा आहे. SBM 2.0 अभियान हे पुढील 18 महिने कालावधी करिता असून सदर उपक्रमाबाबतचा खर्च SBM 2.0 अंतर्गत माहिती शिक्षण व संवाद (IEC) करिता दि. 28/05/2025 रोजी SBM 2.0 IEC हेड अंतर्गत मनपाकडे रुपये 57,82,580/- लक्ष शिल्लक निधी मधून मा. आयुक्त यांचे दि. 26/05/2025 रोजीच्या मंजुरी दिलेली आहे.

परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**यानंतर वेळेवरील विषय चर्चेकरीता घेण्यात आला.**

<u>**विषय क्रमांक 590 –**</u> (17.07.2025) केंद्र पुरस्कृत पी.एम.ई-बस योजनेकरीता निधीची उपलब्धता करणेबाबत.

मुख्यलेखाधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – विषय मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक 590</u> -** केंद्र सरकारचे शहरी विकास मंत्रालयाचे पत्र दिनांक ०९ जानेवारी २०२४ व १२ जुलै २०२४ अन्वये अमरावती महानगरपालिकेला पी.एम.ई-बस सेवा मंजूर केली असुन त्याकरीता अमरावती महानगरपालिका हद्दीतील कोंडेश्वर रोड वरिल जागा शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या जागेवर डेपो उभारणेचे कार्य प्रगतीपथावर आहे. या जागेवरुन महाराष्ट्र विज पारेषण कंपनीची उच्च दाबाची विद्युत वाहिनी खांबावरुन जात असल्याने सदरचे खांब दुस-या जागेवर स्थापीत करण्यासाठी अतिरीक्त ८२ लक्ष निधीची आवश्यकता आहे.

सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद उपलब्ध नसल्याने, तसेच बांधकाम विभाग व प्रकाश विभाग यांनी सुचविलेल्या नुसार खालील प्रमाणे लेखाशिर्षात पुर्नविनियोजनाद्वारे सुधारीत तरतूद आंवटीत करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

(रक्कम रुपयात)

| अ. | लेखा क्र. शिर्ष क्रमांक | लेखाशिर्षाचा तपशिल | सन 2025-26 चा अंदाजपत्रकानुसार आवंटीत अनुदान रु. | या आदेशाप्रमाणे सुधारीत आवंटीत अनुदान रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | 123 | उपयोगात आलेल्या विजेचा खर्च | 15,00,00,000 | 14,18,00,000 |
| 2 | 227 | रस्त्यामधील विद्युत खांब हटविणे | 1,50,000 | 83,50,000 |

वरिल प्रमाणे प्रस्तावित वित्तीय आवंटनाच्या मंजूरी करीता, परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**<u>विषय क्रमांक 591</u> -** १)७(२०२५.०७. गांधी चौक येथील मनपा मालकिचे वाहनतळ फी वसुली करीता अभिकर्त्याशी दहा वर्षा करीता करारनामा करंण्यास मंजुरी प्रदान करणे बाबत.

बाजार व परवाना अधिक्षक यांनी टिपणी वाचुन दाखविली. आयुक्त तथा प्रशासक – करारनामा झाल्यानंतर मा.आयुक्त यांना वाटेल त्या वेळेस संबंधीत कंत्राटदाराचा करारनामा रद्द करु शकेल अशी अट सदर करारनामा मध्ये नमुद करण्यात यावी. विषयार्कित अटी शर्ती मला दाखवाव्या. विषय मंजुर करण्यात येत आहे. तसेच अमरावती शहरात जागोजागी पार्किंग केली जात असल्याचे दिसुन येते. तरी याबाबत जॉईंट व्हीजीट करण्यात यावी. पे अँण्ड पार्क करण्यात यावे. याकरीता झोन निहाय टेंडर करण्यात यावे. जेणेकरीता हॉकर्सला, पार्किंग करण्याकरीता दर आठवडयाला, महिन्याची पासेस देता येईल. ट्राफिंकचे नाहरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. झोन निहाय होर्डींग पॉईट तयार करण्यात यावे. ही कार्यवाही आचारसंहितापुर्वी करण्यात यावी असे सभेचे अनुषंगाने निर्देश दिले.

**<u>ठराव क्रमांक 591</u> -** अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मनपा मालकिचे गांधीचौक येथील एकूण १०२४५ चौरस फुटच्या वाहनतळ फी वसुली करीता अभिकर्ता नियुक्त करणे बाबत स्थानिक वृत्तपत्रा माध्यामातुन दि.२८/०२/२०२५ रोजी प्रसिध्दी देवुन ई-निविदा मागविण्यात आल्या. निविदेचे शासकीय मुल्य रु.२,००,०००/- निर्धारीत करुन ई-निविदा प्रक्रिया काढण्यात आली. ई-निविदा क्र.२०२५-एएमसी-११५६७५०-१ प्रसिध्दी देण्यात आलेली असून, सदर ई-निविदे मध्ये एकुण ५ (पाच) निविदाधारक प्राप्त झाले. सदर ई-निविदातील तांत्रीक कागदपत्र

तपासणी मा. निविदा छानणी समिती मार्फत दि.२३/०४/२०२५ रोजी करण्यात आलेली असून प्राप्त ५ निविदा धारक यांचे तांत्रीक कागदपत्र मंजुर करुन दि.२९/०४/२०२५ रोजी वित्तीय लिफाफा निविदा छानणी समिती समोर उघडण्यात आल्या.

खालील नमूद तक्ता प्रमाणे वित्तीय लिफाफे मध्ये महत्तम दर प्राप्त झाले आहे.

| अ.क्र | निविदा धारकाचे नांव | शासकीय दर | ऑफर मुल्य रुपये | एच-१ (H-1) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री, दर्शन राजेंद्र सोनी (६५५१३२) | २,००,०००/- | ४,५५,०००/- | एच-१ |
| २ | मेत्री सु.बे.न.से. सहकारी संस्था (६५७२९५६) | २,००,०००/- | ४,१५,०००/- | एच-२ |
| ३ | श्री एक्किरादेवी अन्नक्षेत्र व जनकल्याण संस्था (६५७२६७७) | २,००,०००/- | ३,८०,०००/- | एच-३ |
| ४ | श्री एक्किरादेवी सस्थान (६५७२६०२) | २,००,०००/- | २,६७,०००/- | एच-४ |
| ५ | श्री.अनिकेत गजननराव डेंगळे (६४५६९८१) | २,००,०००/- | १,७०,०००/- | एच-५ |

वरील नमुद केल्याप्रमाणे ५ (पाच) निविदाधारक यांचे दर प्राप्त झाले आहे, त्या मध्ये श्री, दर्शन राजेंद्र सोनी यांनी शासकीय दर पेक्षा जास्त निविदा रुपये ४,५५,०००/- भरलेली आहे.

| अ.क्र | निविदा धारकाचे नांव | ऑफर मुल्य रुपये | प्राप्त महत्तम दर |
|---|---|---|---|
| १ | श्री, दर्शन राजेंद्र सोनी | २,००,०००/- | ४,५५,०००/- |

वरील नमुद चार्ट प्रमाणे कंत्राटदार यानी दहा वर्षाचा कत्राट घेण्या करीता व प्रती वर्ष ४,५५०००/- तसेच दर तीन वर्षा नतर १०% वाढ करण्यास ई-निविदा मधील नमुद अटी व शर्ती नुसार सहमती दिलेली आहे. प्राप्त दराला दि.२३/०६/२०२५ रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्या अनुषंगाने श्री, दर्शन राजेंद्र सोनी यांचेशी १० वर्ष कालावधी करीता प्रती वर्ष रु.४,५५०००/- वाहतळ शुल्क तसेच दर तीन वर्षा नतर १०% वाढ करिता गांधीचौक येथील वाहनतळ वसुलीचे अभिकर्ता म्हणुन करारनामा करण्यास मान्यता प्रदान करण्याकरीता, उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे.

**-स्वा-**

(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक,
महानगरपालिका अमरावती

दिनांक 01.07.2025 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तांत

अमरावती महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मा.प्रशासक यांनी सुचविल्याप्रमाणे मंगळवार दिनांक 01.07.2025 रोजी सकाळी 11 वाजता आयुक्त यांचे कार्यालयातील लगतचे कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. आयुक्त तथा प्रशासक, मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव, समाज विकास अधिकारी, उपअभियंता (कार्यशाळा) सदर अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

नगरसचिव – मागील सभा दिनांक 13/06/2025 रोजीचे स्थायी समिती सभेत विषय क्रमांक 578 ते 581 पर्यंत प्रशासक यांनी स्थगीत ठेवण्यात आलेले होते.

विषय क्रमांक 578 – अमरावती महानगरपालिका व लगतच्या क्षेत्र अंतर्गत परिवहन सेवेसाठी केंद्रशासनाच्या PM-E Bus सेवा योजनेअंतर्गत अमरावती महा नगरपालिकेस ५० ईलेक्ट्रीक बसेस मंजूर झालेल्या असुन त्या अनुषंगाने कार्यवाही करणेकरीता ये णा-या अपेक्षित खर्चास वित्तीय, प्रशासकिय मंजूरी, योजने अंतर्गत आवश्यक स्थापत्य व विद्युत कामाच्या निविदा प्रसिद्ध करणे बाबत व केंद्र शासनाने बसेसचा पुरवठा व त्यांचे कार्यान्वियन करणेकरीता निविदे अंती निवड केलेले अभिकर्ता M/s. JBM ECOLIFE MOBILITY PVT. LTD. यांना मंजूर दरानुसार Letter Of Award (LOA) देणेबाबत आणि RFP नुसार Concession Agreement करणेबाबत.

उपअभियंता (कार्यशाळा) यांनी टिपणी वाचुन दाखविली. प्रशासक तथा आयुक्त – उपरोक्त विषयाला सर्वसाधारण सभेत मान्यता दिलेली आहे. स्थायी समितीमध्ये आलेला विषय मंजुर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक 578 – केंद्र शासनाचे CSSC च्या दि.१९/१०/२०२३ रोजीचे बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार व दि.०२/११/२०२३ च्या Minutes of the 1st meeting मधील मान्यतेनुसार अमरावती महानगरपालिकेकरिता ९ मिटरच्या ४० नग व ७ मिटरच्या १० नग अश्या एकूण ५० बसेसकरीता पी.एम.ई- बस सेवा प्रकल्प मंजूर करण्यात आला.

केंद्र शासनाचे CESL कंपनीकडून दि.१३/०३/२०२४ रोजीचे प्राप्त पत्रानुसार ९ मिटर बसेसचा पुरवठा व कार्यान्वयन करणेकरीता केंद्र शासनामार्फत M/s. JBM Ecolife Mobility Private Ltd. यांची नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना प्रति कि.मि. रु. ६३.४५/- टीपिंग फी अदा करावयाची आहे. तसेच ७ मिटर बसेस करीता कंपनी नियुक्त करणेकरीता निविदा प्रक्रिया केंद्र शासनाचे स्तरावर सुरु आहे. सदर प्रकल्पाकरिता डेपो विकसित करावयाचा असल्यामुळे योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार डेपो करिता जागा निश्चित करण्याकरिता अमरावती मनपा मालकीचे जागांचे सर्वेक्षण करण्यात आले. अमरावती शहरातील लोकसंख्येच्या

अनुषंगाने अमरावती महापालिकेस १०० ई बसेस अनुज्ञेय आहेत व केंद्र शासनाच्या डेपो निग गाईड लाइंस नुसार १०० बसेसकरिता चार्जिंग डेपो उभारणी करणे करीता अंदाजे ६ एकर जागा असणे अपेक्षित होते.

डेड किलोमीटर्स कमी राहण्याचे अनुषंगाने प्रस्तावित डेपो च्या जागेपासून सुरुवातीचा बस थांबा हा कमीत कमी अंतरावर असावा तसेच सदर जागा हि उच्च दाब विद्युत जोडणी करणेच्या अनुषंगाने सबस्टेशनच्या जवळात जवळ असणे अनिवार्य होते. त्या अनुषंगाने कोंडेश्वर रोड वरील सर्वे क्र. ११० मधील आरक्षित २.३८ हे.आर. जागा बडनेरा रेल्वे स्टेशन पासून व कोंडेश्वर उच्च दाब २२० kv सबस्टेशन पासून अगदी जवळ असल्याने डेपो करिता निवडण्यात आली.

सदर जागा ही महसुल विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे मालकीची असल्यामुळे दि.०८/०९/२०२३ व दि. १८/०१/२०२४ रोजी मा.जिल्हाधिकारी यांच्या कडे जागा हस्तांतर करीता पत्र देण्यात आले. तद्नंतर दि.१५/०२/२०२४ रोजी राज्य शासनाकडे मा.जिल्हाधिकारी यांनी प्रस्ताव मान्यतेस पाठविला. तसेच अमरावती महानगरपालिकेने सुद्धा दि. २८/०२/२०२४, १४/०५/२०२४ व २१/०६/२०२४ रोजी राज्य शासनास जागा उपलब्ध करून देणेबाबत पाठपुरावा करण्यात आला.सद्यस्थितीत सदर जागेचा दि.०९/०५/२०२५ नुसार दि.१३/०५/२०२५ चे प्राप्त आदेशानुसार आगाऊ ताबा अमरावती महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. सदर जागेचा आगाऊ ताबा अमरावती महानगरपालिकेस प्राप्त झाल्यामुळे त्या ठिकाणी ई-बस चार्जिंग डेपो बांधकाम करणे करीता विद्युत कामाकरिता निविदा प्रक्रिया राबवुन डेपो विकसित करण्यात येणार आहे.

केंद्र शासनामार्फत नियुक्त M/s. JBM Ecolife Mobility Private Ltd. कंपनीद्वारे ९ मिटर बसेसचा पुरवठा व कार्यान्वयन करणेकरीताचा उपक्रम GCC (Gross Cost Contract )या तत्वावर चालविण्यात येणार आहे.

GCC (Gross Cost Contract ) – यामध्ये शहर बसेस कंत्राटदाराचे मालकीचे राहत असून त्यांचेद्वारेच चालविण्यात येतात. परंतु त्यावर वाहक यांची नियुक्ती संबंधित प्राधिकरण यांना करावी लागत असून त्यांचे दरमहा वेतन तसेच कंत्राटदाराला केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या प्रतिमाह प्रति की.मी. दराप्रमाणे रॉयल्टी अदा करावी लागते.

त्यानुसार ई- बसचे विस्तृत प्रकल्प अहवालानुसार ५० ई- बसेस चालविणेकरिता प्रस्तावित ३५ मार्ग गृहीत धरल्यास दैनंदिन ११,८८५ की.मी. धाव अपेक्षित आहे. त्यानुसार प्राप्त अंदाजित उत्पन्न व खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

**<u>अपेक्षित उत्पन्नाचा गोषवारा</u>**

| अनु.क्र. | विवरण | प्रतिमाह अपेक्षित उत्पन्न | प्रतिवर्ष अपेक्षित उत्पन्न |
|---|---|---|---|
| १. | अंदाजे लोकसंख्येच्या १% अनुसार दैनंदिन ११,००० प्रवासी करीता महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २०/१२/२००५ नुसार तिकिटाचे सरासरी दर रु. १५/- प्रति की.मी प्रमाणे | ४९,५०,०००/- | ५,९४,००,०००/- |
| २. | दैनंदिन ११,८८५ कि.मी. करीता केंद्रीय अर्थसहाय्य रु.२२/- प्रति कि.मी. नुसार | ७८,५०,०००/- | ९,४१,००,०००/- |
| | **एकुण** | **१,२८,००,०००/-** | **१५,३५,००,०००/-** |

<u>अपेक्षित खर्चाचा गोषवारा</u>

| अनु. क्र. | विवरण | प्रतिमाह अपेक्षित खर्च | प्रतिवर्ष अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| १. | दैनंदिन ११,८८५ कि.मी.धाव गृहीत धरल्यास शहर बस अभिकर्त्यास द्यावयाची टिपिंग फी. (प्रति कि.मी. रु.६३.४५/- प्रमाणे) | २,२६,००,०००/- | २७,१५,००,०००/- |
| २. | मासिक टिपिंग फी (रु.२.२६ कोटी) यावरील १८% नुसार GST करीता अंदाजित रक्कम. | ४०,७०,०००/- | ४,८८,४०,०००/- |
| ३. | एकूण ५० बसेस वर नियुक्त करावयाचे १०५ वाहक यांचे किमान वेतन कायद्यानुसार वेतन व त्यावरील १८% GST. (रु.२८,०००/- प्रतिमाह प्रमाणे) | वेतन- २९,४०,०००/-<br>GST-५,३०,०००/-<br>३४,७०,०००/- | ४,१७,००,०००/- |
| ४. | नियुक्त करावयाचे ५-नियंत्रक,१-लिपिक,१-शिपाई, १-संगणक चालक यांचे किमान वेतन कायद्यानुसार वेतन व त्यावरील १८% GST. (रु.२८,०००/- प्रतिमाह प्रमाणे) | वेतन -२,२५,०००/-<br>GST- ४०,०००/-<br>२,६५,०००/- | ३१,८०,०००/- |
| ५. | नियुक्त करावयाचे परिवहन व्यवस्थापक यांचे वेतन व त्यावरील १८% GST.(रु.४०,०००/- प्रतिमाह प्रमाणे) | वेतन -४०,०००/-<br>GST- ७,०००/-<br>४७,०००/- | ५,६५,०००/- |
| ६. | अभिकर्ता वापरात असलेल्या विजेमुळे प्राप्त होणारे देयकामध्ये विजेचे दर, Cess, कर यामध्ये उपक्रम सुरु झाल्याचे तारखेनंतर वाढ झाल्यास सदर वाढ अमनपास लागू राहणार आहे. त्याप्रमाणात अमनपाद्वारे अभिकर्ता यास अदा करावयाची अंदाजित रक्कम. | ५०,०००/- | ६,००,०००/- |
| ७. | RTO यांचेकडील प्रवासी कर (३.५०%), बाल पोषण अधिभार (०.१५/- प्रति तिकीट) व टोल करीता लागणारे अंदाजित | २,४०,०००/- | २८,८०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | शुल्क. | | |
| ८. | शहर बस उपक्रमामध्ये अमनपा शाळेतील विद्यार्थी, अंध व दिव्यांग व्यक्तींना १००% सवलतीची अंदाजित रक्कम. | २५,०००/- | ३,००,०००/- |
| ९. | शहर बस उपक्रमामध्ये वाहक यांची नियुक्ती अमनपास करावयाची असल्यामुळे त्यांना गणवेश (१५००/- प्रति वाहक) व त्यांचे ग्रुप विमा करीताचा अंदाजित खर्च. | ---- | २,५०,०००/- |
| | **एकुण** | ३,०७,६७,०००/- | ३६,९८,१५,०००/- |

वरील पी.एम.ई- बस सेवा प्रकल्प मधील अपेक्षित उत्पन्नाचा व खर्चाचा गोषवारा लक्षात घेता असे लक्षात येते की, अमरावती महानगरपालिकेस सदर प्रकल्पामधून प्रतिमाह रु.१.२८ कोटी म्हणजेच वार्षिक रु.१५.३५ कोटी उत्पन्न प्राप्त होणार आहे. त्या तुलनेत खर्च प्रतिमाह रु.३.०८ कोटी म्हणजेच वार्षिक रु.३६.९८ कोटी खर्च होणार आहे.

सदर प्रकल्प ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणे अपेक्षित आहे. परंतु वरील हिशोबावरून तसे होत असल्याचे दिसून येत नाही. कारण वरील सर्व बाबीचा विचार करता, अमरावती महानगरपालिकेस सदर उपक्रमापासून प्रतिमाह रु.१.८ कोटी म्हणजेच वार्षिक रु.२१.६३ कोटी तोटा होण्याचे दिसून येते. तसेच अमरावती महानगरपालिकेने शहर बस अभिकर्ता यास अदा करावयाचे टिपिंग फी मध्ये प्रतिवर्ष ५% वाढ द्यावयाची असून त्याबाबतचा हिशोब वरील गोषवारा मध्ये घेण्यात आलेला नाही. अमरावती महानगरपालिकेने वरील हिशोबावरून होत असलेली तुट कमी करण्याचे उपाययोजना करण्याचे दृष्टीकोनातून ईतर महानगरपालिका येथे चौकशी केली असता तेथे स्वतंत्र परिवहन विभाग स्थापन करून उपक्रमावर नियंत्रण ठेवणेकरीता परिवहन क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करण्यात आलेली असून सदर व्यक्तीच पी.एम.ई- बस सेवा प्रकल्पाबाबतची संपुर्ण कार्यवाही करीत असल्यामुळे अमरावती महानगरपालिकेने सुद्धा स्वतंत्र परिवहन विभाग स्थापन करून उपक्रमावर नियंत्रण ठेवणेकरीता परिवहन क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करण्याचे ठरविले आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाच्या शासन निर्णय एन.यु.आर.-2013/प्र.क्र.338/नवि-33 दि.18.02.2014 नुसार परिवहन उपक्रमांना वेटलिजमध्ये येणारी बस संचलन व दुरुस्तीच्या खर्चातील तुट (operational loss) संबंधित महापालिकांनी सोसावी असे आदेश आहेत. त्यानुसार सदर प्रकल्प अंतर्गत येणारी वित्तिय तुट अमरावती महानगरपालिकेने अभिकर्त्यास दरमहा अदा करणे व त्याप्रमाणे प्रती वर्ष अमरावती महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतुद करणे आवश्यक आहे. सबब, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या सर्व बाबींस व त्याअनुषंगाने येणा-या अपेक्षित खर्चास वित्तिय व प्रशासकिय मान्यता मिळणेकरीता तसेच, केंद्र शासनाकडून नियुक्त अभिकर्ता मे. JBM ECOLIFE MOBILITY PVT. LTD. यांना ०९ मिटर ई - बसेंस करीता मंजूर दर प्रती कि.मी. रुपये ६३.४५/-नुसार Letter Of Award (LOA) देणेबाबत आणि RFP नुसार Concession Agreement करणेस मा.आयुक्त यांनी दि.२८/०५/२०२५ रोजी मंजुरी दिलेली आहे.

परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासक स्थायी समिती उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, मंजुरी प्रदान करीत आहे .

**विषय क्रमांक 579** – अमरावती महानगरपालिकेतील भंगार वाहनांच्या विक्रीबाबत.

उपअभियंता (कार्यशाळा) यांनी टिपणी वाचुन दाखविली. **सक्शन मशिन वाहन** एमएच २७ एच ८३६८ या वाहनास प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे पुन्हा ऑक्शन करावे लागेल. मा.प्रशासक तथा आयुक्त – स्थायी समितीमध्ये आलेला विषय टिपणीनुसार मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 579** – अमरावती महानगरपालिकेतील विविध विभागात कार्यरत एकुण २ वाहनांचे ऑक्शन महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार तसेच मा.परिवहन आयुक्त यांचे दि.२४/१०/२०२४ रोजीचे पत्रानुसार धातु भंगार व्यापार महामंडळाच्या संस्था (MSTC) यांचेकडून दिनांक २८/०३/२०२५ रोजी ऑनलाइन द्वारे करण्यात आले. यामध्ये खालीलप्रमाणे लॉटनिहाय यशस्वी निविदाधारकांचे नाव व दर नमूद आहेत.

| लॉट नं. | वाहनाचे विवरण | RTO यांचेकडून प्राप्त Upset Price | प्राप्त दर | अभिकर्ताचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | **सक्शन मशिन वाहन**<br>१.एमएच २७ एच ८३६८ | २,१८,९२५/- | Nil | Nil |
| २. | **ट्रक वाहन**<br>१.एमएच २७ एक्स १६०२ | २,८३,१८५/- | ३,३१,००१/- | Re Vahaan Recyclers Pvt Ltd. |
| | **एकुण** | ५,०२,११०/- | ३,३१,००१/- | |

वरील तकत्या मधील लॉट क्र.1 करीता प्रतिसाद प्राप्त झाला नाही. तसेच लॉट क्र.2 मधील वाहनांकरीताचे यशवी निविदाधारकांचे नमूद असलेले दर प्रादेशिक परिवहन विभाग, अमरावती यांनी ठरवून दिलेल्या विक्री मूल्य दरापेक्षा जास्त आहेत.

वरील तक्त्यामध्ये नमूद सक्शन मशिन वाहन क्र. एम.एच. २७ एच ८३६८ या वाहनाकरिता खालीलप्रमाणे ई-ऑक्शन करण्यात आले.

| लॉट नं. | ई-ऑक्शन दिनांक | RTO यांचेकडून प्राप्त Upset Price | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | १३/१०/२०२२ | २,१८,९२५/- | २,२१,९२५/- | अभिकर्ता यांनी घेण्यास नकार दिला. |
| २. | २८/१२/२०२२ | २,१८,९२५/- | --- | प्रतिसाद मिळाला नाही. |
| ३. | १५/०७/२०२४ | २,१८,९२५/- | --- | प्रतिसाद मिळाला नाही. |
| ४. | १९/०९/२०२४ | २,१८,९२५/- | २,२०,०००/- | अभिकर्ता यांनी घेण्यास नकार दिला. |
| ५. | २८/०३/२०२५ | २,१८,९२५/- | ७५,१००/- | RTO यांचेकडुन प्राप्त Upset Price पेक्षा कमी दर प्राप्त |
| ६. | १५/०५/२०२५ | २,१८,९२५/- | --- | प्रतिसाद मिळाला नाही. |

वरील तक्त्यामध्ये नमूद ट्रक वाहन क्र. एम.एच. २७ एक्स १६०२ या वाहनाकरिता खालीलप्रमाणे ई-ऑक्शन करण्यात आले.

| लॉट नं. | ई-ऑक्शन दिनांक | RTO यांचेकडून प्राप्त Upset Price | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | १३/१०/२०२२ | २,८३,१८५/- | --- | तांत्रिक कारणाने ऑक्शन रद्द करण्यात आले. |
| २. | १९/०९/२०२४ | २,८३,१८५/- | ४,२१,०००/- | अभिकर्ता यांनी घेण्यास नकार दिला. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | २८/०३/२०२५ | २,८३,१८५/- | १,२५,१००/- | RTO यांचेकडुन प्राप्त Upset Price पेक्षा कमी दर |
| ४. | १५/०५/२०२५ | २,८३,१८५/- | ३,३१,००१/- | सद्यस्थितीत दर प्राप्त |

सबब, लॉट क्र 1.मधील वाहनाचा MSTC यांचेकडुन पुनश्च ई-ऑक्शन करणे व लॉट क्र.2 मधील वाहनास RTO यांचेकडुन प्राप्त Upset Price पेक्षा जास्त किमंत प्राप्त झाल्यामुळे वरील तक्त्यामध्ये प्राप्त दरामध्ये संबंधीत अभिकर्ता यांस विक्री करणेकरीता मा.आयुक्त यांनी दिनांक ०४.०६.२०२५ रोजी मान्यता प्रदान केली असुन नियमाप्रमाणे किमंतीचा भरणा करुन सदर वाहने संबंधीतास देण्यासंदर्भातच्या प्रस्तावाचे अनुषंगाने, परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, सदर विषयास प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत आहे .

**विषय क्रमांक 580** – अमरावती शहरातील नागरिकांना शहर बस सेवा देण्याकरिता अमरावती महानगरपालिकेमध्ये स्वतंत्र परिवहन विभाग स्थापन करणे व त्याकरिता परिवहन व्यवस्थापक यांची नियुक्ती करणेबाबत.

उपअभियंता (कार्यशाळा) यांनी टिपणी वाचुन दाखविली. मा.प्रशासक तथा आयुक्त – स्थायी समितीमध्ये आलेला विषय टिपणीनुसार मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 580** – उपरोक्त संदर्भिय विषयानुसार, CSSC च्या VC मध्ये दिलेल्या निर्देशानुसार व दि.०२/११/२०२३ च्या Minutes of the 1st meeting मधील मान्यतेनुसार अमरावती महानगरपालिकेकरिता ९ मिटरच्या ४० नग व ७ मिटरच्या १० नग अश्या एकूण ५० बसेसकरीता पी.एम.ई- बस सेवा प्रकल्प मंजूर करण्यात आला.

केंद्र शासन नियुक्त CESL कंपनीचे दि.१३/०३/२०२४ रोजीचे प्राप्त पत्रानुसार ९ मिटर बसेसचा पुरवठा व कार्यान्वयन करणेकरीता केंद्र शासनामार्फत M/s. JBM Ecolife Mobility Private Ltd. यांची नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना प्रति कि.मि. रु. ६३.४५/- टीपिंग फी अदा करावयाची आहे. तसेच ७ मिटर बसेस करीता कंपनी नियुक्त करणेकरीता निविदा प्रक्रिया केंद्र शासनाचे स्तरावर सुरु आहे. सदर प्रकल्पाकरिता डेपो विकसित करावयाचा असल्यामुळे योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार डेपो करिता जागा निश्चित करण्याकरिता अमरावती मनपा मालकीचे जागांचे सर्वेक्षण करण्यात आले. अमरावती शहरातील लोकसंख्येच्या अनुषंगाने अमरावती महापालिकेस १०० ई बसेस अनुज्ञेय आहेत व केंद्र शासनाच्या डेपो प्लांनिग गाईड लाइंस नुसार १०० बसेसकरिता चार्जिंग डेपो उभारणी करणे करीता अंदाजे ६ एकर जागा असणे अपेक्षित होते.

डेड किलोमीटर्स कमी राहण्याचे अनुषंगाने प्रस्तावित डेपो च्या जागेपासून सुरुवातीचा बस थांबा हा कमीत कमी अंतरावर असावा तसेच सदर जागा हि उच्च दाब विद्युत जोडणी करणेच्या अनुषंगाने सबस्टेशनच्या जवळात जवळ असणे अनिवार्य होते. त्या अनुषंगाने कोंडेश्वर रोड वरील सर्वे क्र. ११० मधील आरक्षित २.३८ हे.आर. जागा बडनेरा रेल्वे स्टेशन पासून व कोंडेश्वर उच्च दाब २२० kv सबस्टेशन पासून अगदी जवळ असल्याने डेपो करिता निवडण्यात आली.

सदर जागा ही महसुल विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे मालकीची असल्यामुळे दि.०८/०९/२०२३ व दि. १८/०१/२०२४ रोजी मा.जिल्हाधिकारी यांच्या कडे जागा हस्तांतर करीता पत्र देण्यात आले. तद्नंतर दि.१५/०२/२०२४ रोजी राज्य शासनाकडे मा.जिल्हाधिकारी यांनी प्रस्ताव मान्यतेस पाठविला. तसेच अमरावती महानगरपालिकेने सुद्धा

दि. २८/०२/२०२४, १४/०५/२०२४ व २१/०६/२०२४ रोजी राज्य शासनास जागा उपलब्ध करून देणेबाबत पाठपुरावा करण्यात आला.सद्यस्थितीत सदर जागेचा दि.०९/०५/२०२५ नुसार दि.१३/०५/२०२५ चे प्राप्त आदेशानुसार आगाऊ ताबा अमरावती महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. सदर जागेचा आगाऊ ताबा अमरावती महानगरपालिकेस प्राप्त झाल्यामुळे त्या ठिकाणी ई-बस चार्जिंग डेपो बांधकाम करणे करीता विद्युत कामाकरिता निविदा प्रक्रिया राबवुन डेपो विकसित करण्यात येणार आहे.

केंद्र शासनामार्फत नियुक्त M/s. JBM Ecolife Mobility Private Ltd. कंपनीद्वारे ९ मिटर बसेसचा पुरवठा व कार्यान्वयन करणेकरीताचा उपक्रम GCC (Gross Cost Contract ) या तत्वावर चालविण्यात येणार आहे.

GCC (Gross Cost Contract ) – यामध्ये शहर बसेस कंत्राटदाराचे मालकीचे राहत असून त्यांचेद्वारेच चालविण्यात येतात. परंतु त्यावर वाहक यांची नियुक्ती संबंधित प्राधिकरण यांना करावी लागत असून त्यांचे दरमहा वेतन तसेच कंत्राटदाराला केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या प्रतिमाह प्रति की.मी. दराप्रमाणे रॉयल्टी अदा करावी लागते.

त्यानुसार ई- बसचे विस्तृत प्रकल्प अहवालानुसार ५० ई- बसेस चालविणेकरिता प्रस्तावित ३५ मार्ग गृहीत धरल्यास दैनंदिन ११,८८५ की.मी. धाव अपेक्षित आहे. त्यानुसार प्राप्त अंदाजित उत्पन्न व खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

**<u>अपेक्षित उत्पन्नाचा गोषवारा</u>**

| अनु.क्र. | विवरण | प्रतिमाह अपेक्षित उत्पन्न | प्रतिवर्ष अपेक्षित उत्पन्न |
|---|---|---|---|
| १. | अंदाजे लोकसंख्येच्या १% अनुसार दैनंदिन ११,००० प्रवासी करीता महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २०/१२/२००५ नुसार तिकिटाचे सरासरी दर रु. १५/- प्रति की.मी प्रमाणे | ४९,५०,०००/- | ५,९४,००,०००/- |
| २. | दैनंदिन ११,८८५ कि.मी. करीता केंद्रीय अर्थसहाय्य रु.२२/- प्रति कि.मी. नुसार | ७८,५०,०००/- | ९,४१,००,०००/- |
| | **एकुण** | **१,२८,००,०००/-** | **१५,३५,००,०००/-** |

**<u>अपेक्षित खर्चाचा गोषवारा</u>**

| अनु.क्र. | विवरण | प्रतिमाह अपेक्षित खर्च | प्रतिवर्ष अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| १. | दैनंदिन ११,८८५ कि.मी.धाव गृहीत धरल्यास शहर बस अभिकर्त्यास द्यावयाची टिपिंग फी. (प्रति कि.मी. रु.६३.४५/- प्रमाणे) | २,२६,००,०००/- | २७,१५,००,०००/- |
| २. | मासिक टिपिंग फी (रु.२.२६ कोटी) यावरील १८% नुसार GST करीता अंदाजित रक्कम. | ४०,७०,०००/- | ४,८८,४०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | एकुण ५० बसेस वर नियुक्त करावयाचे १०५ वाहक यांचे किमान वेतन कायद्यानुसार वेतन व त्यावरील १८% GST. (रु.२८,०००/- प्रतिमाह प्रमाणे) | वेतन- २९,४०,०००/- GST- ५,३०,०००/- ३४,७०,०००/- | ४,१७,००,०००/- |
| ४. | नियुक्त करावयाचे ५-नियंत्रक,१-लिपिक,१-शिपाई, १-संगणक चालक यांचे किमान वेतन कायद्यानुसार वेतन व त्यावरील १८% GST. (रु.२८,०००/- प्रतिमाह प्रमाणे) | वेतन - २,२५,०००/- GST- ४०,०००/- २,६५,०००/- | ३१,८०,०००/- |
| ५. | नियुक्त करावयाचे परिवहन व्यवस्थापक यांचे वेतन व त्यावरील १८% GST.(रु.४०,०००/- प्रतिमाह प्रमाणे) | वेतन -४०,०००/- GST- ७,०००/- ४७,०००/- | ५,६५,०००/- |
| ६. | अभिकर्ता वापरात असलेल्या विजेमुळे प्राप्त होणारे देयकामध्ये विजेचे दर, Cess, कर यामध्ये उपक्रम सुरु झाल्याचे तारखेनंतर वाढ झाल्यास सदर वाढ अमनपास लागू राहणार आहे. त्याप्रमाणात अमनपाद्वारे अभिकर्ता यास अदा करावयाची अंदाजित रक्कम. | ५०,०००/- | ६,००,०००/- |
| ७. | RTO यांचेकडील प्रवासी कर (३.५०%), बाल पोषण अधिभार (०.१५/- प्रति तिकीट) व टोल करीता लागणारे अंदाजित शुल्क. | २,४०,०००/- | २८,८०,०००/- |
| ८. | शहर बस उपक्रमामध्ये अमनपा शाळेतील विद्यार्थी, अंध व दिव्यांग व्यक्तींना १००% सवलतीची अंदाजित रक्कम. | २५,०००/- | ३,००,०००/- |
| ९. | शहर बस उपक्रमामध्ये वाहक यांची नियुक्ती अमनपास करावयाची असल्यामुळे त्यांना गणवेश (१५००/- प्रति वाहक) व त्यांचे ग्रुप विमा करीताचा अंदाजित खर्च. | ---- | २,५०,०००/- |
| | एकुण | ३,०७,६७,०००/- | ३६,९८,१५,०००/- |

वरील पी.एम.ई- बस सेवा प्रकल्प मधील अपेक्षित उत्पन्नाचा व खर्चाचा गोषवारा लक्षात घेता असे लक्षात येते की, अमरावती महानगरपालिकेस सदर प्रकल्पामधून प्रतिमाह रु.१.२८ कोटी म्हणजेच वार्षिक रु.१५.३५ कोटी उत्पन्न प्राप्त होणार आहे.त्या तुलनेत खर्च प्रतिमाह रु.३.०८कोटी म्हणजेच वार्षिक रु.३६.९८कोटी खर्च होणार आहे. सदर प्रकल्प ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणे अपेक्षित आहे. परंतु वरील हिशोबावरून तसे होत असल्याचे दिसून येत नाही. कारण वरील सर्व बाबीचा विचार करता, अमरावती महानगरपालिकेस सदर उपक्रमापासून प्रतिमाह रु.१.८ कोटी म्हणजेच वार्षिक रु.२१.६३ कोटी तोटा होण्याचे दिसून येते. तसेच अमरावती महानगरपालिकेने शहर बस अभिकर्ता यास अदा करावयाचे टिपिंग फी मध्ये प्रतिवर्ष ५% वाढ द्यावयाची असून त्याबाबतचा हिशोब वरील गोषवारा मध्ये घेण्यात आलेला नाही. अमरावती महानगरपालिका वगळता ईतर महानगरपालिका येथे सदर तुट कमी करणेबाबत केलेल्या उपाययोजना बाबत चौकशी केली असता तेथे स्वतंत्र परिवहन विभाग स्थापन करून उपक्रमावर नियंत्रण ठेवणेकरीता परिवहन क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करण्यात आलेली असून सदर व्यक्तीच पी.एम.ई- बस सेवा प्रकल्पाबाबतची संपुर्ण कार्यवाही करीत आहे.

त्याच धर्तीवर तसेच पी.एम.ई- बस सेवाचे मार्गदर्शक तत्वानुसार अमरावती महानगरपालिकेची वरीलप्रमाणे तुट कमी करणेकरीता तसेच प्रकल्पाचे सनियंत्रण करणेकरीता स्वतंत्र परिवहन विभागाची स्थापना करणे आवश्यक आहे.

तसेच सदर प्रकल्पाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ४० अन्वये तज्ञ व अनुभवी व्यक्तीची परिवहन व्यवस्थापक या पदावर नियुक्ती करणे आवश्यक असल्याबाबतची कारणे खालीलप्रमाणे.

१. पी.एम.ई- बस सेवा प्रकल्प याची व्याप्ती मोठी असून यामुळे अमरावती शहरातील पर्यावरण व नागरिक सुविधेत मोलाचे पाऊल अमरावती महानगरपालिकेमार्फत उचलल्या जाणार आहे.

२. परिवहन व्यवस्थापक यांची नेमणूक भारतातील इतर शहरातील शहर बस सेवेचा अभ्यास करून व तांत्रिक बाबी तसेच अनुभव अंमलात आणून मनपाची शहर बस सेवा फायद्यात कशी आणता येईल याचा अभ्यास करणारी व्यक्ती असणे अपेक्षित आहे.

३. सद्यस्थितीत कार्यशाळा विभागात कार्यरत १- उपअभियंता(प्रभारी), १- सहा.अभियंता(स्थायी), १- कनिष्ठ अभियंता(कंत्राटी), १- लिपिक (कंत्राटी), १- संगणक चालक(कंत्राटी) व १- शिपाई (कंत्राटी) यांच्या अधिनिस्त चालत असून यातील परिवहन तज्ञ कोणीही नाही.

४. नवीन प्रस्तावित पी.एम.ई- बस सेवा प्रकल्पामधील वरीलप्रमाणे तुट जास्त असल्यामुळे परिवहन व्यवस्थापक यांची नेमणूक न केल्यास सदर तोटा भविष्यात वाढत जाईल व पर्यायाने अमरावती महानगरपालिकेस सदर प्रकल्पाद्वारे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

५. परिवहन विभागामध्ये Traffic Rules, Transportation System, व Finance याचा अभ्यास असणारा व्यक्ती असणे अपेक्षित आहे.

अमरावती महानगरपालिकेतील शहर अभियंता हे पद सर्व तांत्रिक विभागाचे मुख्य असल्याने तसेच परिवहन विभाग हे तांत्रिक विभाग असल्याने मा.शहर अभियंता यांचे अधिपत्याखाली असणे आवश्यक आहे.

सदर प्रकल्पाकरिता लागणारी जागा मा.जिल्हाधिकारी यांचे दिनांक ०९.०५.२०२५ रोजीचे पत्रानुसार दिनांक १३.०५.२०२५ चे प्राप्त आदेशानुसार आगाऊ ताबा अमरावती महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. त्यामुळे केंद्र शासन नियुक्त कंपनीस LOA (Letter of Award) देणेबाबत तसेच स्थापत्य व विद्युत कामाबाबतची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहेत. तसेच सदर प्रकल्प GCC तत्वावर चालविण्यात येत असल्यामुळे त्याकरीता आवश्यक वाहन चालक,

Controller, लिपीक , संगणक चालक, शिपाई यांची नेमणुक करुन त्यांचे वेतनावर होणारा खर्च मनपाचे अंदाजपत्रकामधील लेखाशिर्षातुन होणे अपेक्षित आहे.

सबब, पी.एम.ई- बस सेवा प्रकल्प राबविणेकरीता मा.शहर अभियंता, महानगरपालिका, अमरावती यांचे नियंत्रणाखाली स्वतंत्र परिवहन विभाग स्थापन करणे व तद्नंतर सदर प्रकल्पाकरिता आवश्यक परिवहन व्यवस्थापक या पदावर तज्ञ व अनुभवी व्यक्ती यांची नेमणुक करणेकरीता मा.आयुक्त यांनी दि.३०.०५.२०२५ रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

परंतु उक्त काम करण्याकरीता सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासक स्थायी समिती मंजुरी प्रदान करीत असुन सदर ठराव सर्वसाधारण सभेचे मान्यतेकरीता पाठविण्यात येत आहे.

**विषय क्रमांक 581**- दि. १९/०५/२०२५ ते दि. ३०/०५/२०२५ या कालावधी मध्ये लेखापरिक्षण विभागाने अमरावती महानगरपालीका मधील लेख्याची साप्ताहीक छाननीबाबत चे साप्ताहीक अहवाल सादर करणेबाबत.

मुख्यलेखापरिक्षक – साप्ताहीक लेखापरिक्षण अहवाल तयार करण्यात आलेला असुन त्यामध्ये ज्या विभागाचे पॅरे आलेले असते त्या संबंधीत विभागाकडुन अनुपालन अहवाल मागविण्यात येतो. मा.प्रशासक तथा आयुक्त – संबंधीत विभागाकडुन अनुपालन अहवाल मागविण्यात यावा. सदर विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 581** - उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ (सुधारीत २०१६) चे कलम १०५ व १०६ अन्वये महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरिक्षक यांनी लेख्यांची साप्ताहीक छाननी व तपासणी करुन साप्ताहीक अहवाल स्थायी समीती समक्ष सादर करण्याबाबत नमुद आहे.

| अनु क्र. | साप्ताहीक अहवालाचा कालावधी |
|---|---|
| ०१ | दि. १९/०५/२०२५ ते दि. २३/०५/२०२५ |
| ०२ | दि. २६/०५/२०२५ ते दि. ३०/०५/२०२५ |

त्यास अनुसरुन लेखापरिक्षण विभागाने दि. १९/०५/२०२५ ते दि. ३०/०५/२०२५ रोजी केलेल्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी बाबतचा अहवाल सोबत संलग्न आहे. उपरोक्त प्रमाणे उल्लेखीत सदर अहवाल मुख्यलेखापरिखक यांनी प्रशासक स्थायी समितींचे अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला असुन सदर साप्ताहीक लेख्यांचे लेखापरिक्षण परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासनाने संबंधित विभागाकडे अनुपालन अहवालाची मागणी करण्यास्तव नियमानुसार कारवाई करावी असे प्रशासक स्थायी समिती अहवालाचे अवलोकन करुन निर्देशीत करीत केले आहे.

**विषय क्रमांक 583** – वयोवृध्द दिव्यागांना देण्यात येणा-या लाभार्थ्यांच्या वयोमयादेत ठरवण्यात आलेल्या धोरणात बदल करणेबाबत.

समाज विकास अधिकारी यांनी टिपणी वाचुन दाखविली. मा.प्रशासक तथा आयुक्त – या विषयासंबंधीची सविस्तर माहिती पुढील सभेचे अगोदर देण्यात यावी. विषय स्थगीत ठेवण्यात येत असल्याचे प्रशासक तथा आयुक्त यांनी सांगितले.

**विषय क्रमांक 584**- दि.०२/०६/२०२५ ते दि.१३/०६/२०२५ या कालावधी मध्ये लेखापरिक्षण विभागाने अमरावती महानगरपालीका मधील लेख्यांची साप्ताहीक छाननी बाबतचे साप्ताहीक अहवाल सादर करणे बाबत.

मुख्यलेखापरिक्षक – साप्ताहीक लेखापरिक्षण अहवाल तयार करण्यात आलेला असुन त्यामध्ये ज्या विभागाचे पॅरे आलेले असते त्या संबंधीत विभागाकडुन अनुपालन अहवाल मागविण्यात येतो. मा.प्रशासक तथा आयुक्त – संबंधीत विभागाकडुन अनुपालन अहवाल मागविण्यात यावा. विषय मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक 584 -** उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ (सुधारीत २०१६) चे कलम १०५ व १०६ अन्वये महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरिक्षक यांनी लेख्यांची साप्ताहीक छाननी व तपासणी करुन साप्ताहीक अहवाल स्थायी समीती समक्ष सादर करण्याबाबत नमुद आहे.

| अनु क्र. | साप्ताहीक अहवालाचा कालावधी |
|---|---|
| ०१ | दि.०२/०६/२०२५ ते दि.०६/०६/२०२५ |
| ०२ | दि. ०९/०६/२०२५ ते दि. १३/०६/२०२५ |

त्यास अनुसरुन लेखापरिक्षण विभागाने दि.०२/०६/२०२५ ते दि.१३/०६/२०२५ रोजी केलेल्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी बाबतचा अहवाल सोबत संलग्न आहे. उपरोक्त प्रमाणे उल्लेखीत सदर अहवाल मुख्यलेखापरिखक यांनी प्रशासक स्थायी समितींचे अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला असुन सदर साप्ताहीक लेख्यांचे लेखापरिक्षण परंतु सद्यास्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने उपरोक्त विषयांकित टिपणीन्वये, प्रशासनाने संबंधित विभागाकडे अनुपालन अहवालाची मागणी करण्यास्तव नियमानुसार कारवाई करावी असे प्रशासक स्थायी समिती अहवालाचे अवलोकन करुन निर्देशीत करीत केले आहे.

**-स्वा-**

**(सौम्या शर्मा-चांडक,भा.प्र.से.)**

**आयुक्त तथा प्रशासक,**

**महानगरपालिका अमरावती**